सोलापूर तरुण भारत
आसमंत

आईचा जोगवा मागेन...

जोगवा हा केवळ पिठा-मिठाचा नाही तर वेळ पडल्यास अस्त्र-शस्त्रांचाही जोगवा आहे. स्त्रीशक्तीचा संकोच करू पाहणाऱ्यांना समूळ नष्ट करण्याचा तो ताकदवान विचार आहे. स्त्रीशक्तीपुढे आव्हानं निर्माण करणाऱ्यांना धारदार कृतीतून मिळालेलं हे चोख उत्तर आहे आणि काळानुरूप प्रश्न बदलले असले, तरी स्त्रीविषयक प्रश्नांचा परामर्ष घेता हाच त्या सर्वांवरचा अंतिम इलाज आहे. नवरात्रीच्या निमित्ताने घडवलेला विचारांचा जागर...

प्रासंगिक
स्वाती पेशवे

समाजातली चेतना, संवेदना, वीरता जागृत ठेवण्यासाठी योजल्या जाणाऱ्या अनेक उपायांमध्ये सण-उत्सवांचा समावेश केला तर चुकीचं ठरणार नाही. दरवर्षी काही विशेष सणांच्या, दिवसांच्या निमित्ताने पौराणिक, ऐतिहासिक काळातल्या घटनांची आठवण जपली जाते आणि त्यातला मथितार्थ, बोध अथवा सत्व नवीन पिढीपर्यंत पोहोचवलं जातं. एखादा रहाट फिरावा तसंच कालचक्रही या विचारांच्या जलाचं शिंपण नव्या काळावर करत राहतं. वर्तमानाच्या कुशीत ते विचार, त्यातली भव्यता, ते संस्कार पेरण्याचं काम आपसूक होत राहतं. या अर्थाने नवरात्रोत्सवाकडे पाहता एक वेगळी दृष्टी मिळणं अशक्य नाही. कुळधर्म, कुळाचार म्हणून घराघरांत घटस्थापना होणं, नऊ दिवस आणि नऊ रात्री आदिमायाशक्तीचं अधिष्ठान असणं, मनोभावे आणि यथाशक्ती तिची पूजा-आराधना करणं आणि नऊ दिवसांनंतर दसऱ्याच्या दिवशी उत्सवाची सांगता करणं ही वर्षानुवर्षे पार पाडली जाणारी प्रथा.

नवरात्र ही स्त्रीशक्तीची, तिच्या झुंजार वृत्तीची, तिच्या अफाट सामर्थ्याची, बळाची पूजा आहे. एकीकडे सर्जनशील असणारं देवीचं हे रूप प्रसंगी संहारकही होऊ शकतं, हे समाजमनावर बिंबवण्याचं काम या नऊ दिवसांच्या जागराने नेहमीच केलं आहे. सर्जन आणि संहार ही दोन्ही टोकं यात बघायला मिळतात. यात देवीच्या सौम्य रूपाचं स्मरण आणि आराधना होते तसंच तिच्या रौद्र रूपालाही आवाहन केलं जातं. उपवासाच्या सात्विक आणि सौम्य अन्नाच्या सेवनाबरोबरच अखेरच्या दिवशी तिच्यापुढे पशुबळी देण्याची पद्धतही अनेक वर्षे अस्तित्वात होती. एकीकडे खणानारळाने तिची ओटी भरायची, तिला अलंकारानं सजवायचं, तिच्यापुढे घागरी फुंकण्यासारखे खेळ खेळायचे, सकाळ- संध्याकाळ आरती करून तिची स्तुती करायची तर दुसरीकडे राक्षसाचा संहार करणाऱ्या तिच्या रुद्र रूपाचंही स्मरण करायचं... थोडक्यात, हा केवळ पिठा-मिठाचा जोगवा नाही तर वेळ पडल्यास अस्त्र-शस्त्रांचाही जोगवा आहे. स्त्रीशक्तीचा संकोच करू पाहणाऱ्यांना समूळ नष्ट करण्याचा तो ताकदवान विचार आहे. स्त्रीशक्तीपुढे आव्हानं निर्माण करणाऱ्यांना धारदार कृतीतून मिळालेलं हे चोख उत्तर आहे आणि काळानुरूप प्रश्न बदलले असले, तरी स्त्रीविषयक प्रश्नांचा परामर्ष घेता हाच त्या सर्वांवरचा अंतिम इलाज आहे. म्हणूनच पारंपरिक पद्धतीने नवरात्रौत्सव साजरा करताना नवविचारांचं भान राखणं गरजेचं आहे. दरवर्षी आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत दुर्गेचा हा उत्सव साजरा केला जातो. काही भागात त्याची सुरुवात लवकर म्हणजे भाद्रपद वद्य नवमीपासूनही होते. बंगालमध्ये दुर्गापूजेला फार महत्त्व आहे. नवरात्रीनिमित्त घरोघरी घटस्थापना केली जाते. कुंभाभोवती मातीचं वर्तुळ करून सप्तधान्य पेरलं जातं, सलग नऊ दिवस कुंभ जलाने भरलेला राहतो. या कुंभातून पाझरणाऱ्या जलाचं सिंचन झाल्यामुळे मातीत मिसळलेली बीजं अंकुरित होतात. कुंभाभोवती या नवांकुरांचं हिरवंगार कुंपण उभं राहतं. विजयादशमीला हेच नवे अंकुरित कोंब बरोबर घेऊन सीमोल्लंघनाला बाहेर पडतात आणि देवीच्या चरणी हे धन अर्पण करून आशीर्वाद मागितले जातात. वर्षानुवर्षे घटस्थापनेची ही परंपरा पाळली जाते. कृषिप्रधान संस्कृतीमध्ये मनोभावे पाळल्या जाणाऱ्या या परंपरेमागे दडलेलं कृषिभान अथवा संशोधनात्मक विचार दडून राहात नाही. या निमित्ताने शेतातल्या मातीचा कस आजमावण्याबरोबरच मातीमध्ये कोणतं धान्यबीज चांगल्या पद्धतीनं अंकुरतं, हे पाहण्याचा विचारही स्पष्ट दिसून येतो. या महिन्यात पाऊस शेवटच्या चरणात असतो. हस्ताचा जोर ओसरल्यानंतर धान्य हाती लागणार असते. त्यानंतर दुसऱ्या हंगामातल्या पेरणीची लगबग सुरू होणार असते. हा हंगाम जमिनीत मुरलेल्या पाण्यावर आणि उपलब्ध जलसिंचनावर पिकाला जीवदान देणारा असतो. अशा वेळी मातीमध्ये नेमकं कोणत्या बीजांचं रोपण करावं, याचा अदमास नवरात्रीमध्ये घटाभोवती अंकुरलेल्या धान्यातून येऊ शकतो. मातीचा कस जाणून घेण्याच्या, बीजांची गुणवत्ता जोखण्याच्या या पारंपरिक पद्धतीमध्ये दडलेल्या शास्त्रीय दृष्टिकोनाचा विचारही व्हायला हवा. चरितार्थाचं एकमेव साधन असणाऱ्या त्या काळामध्ये पेरणीपूर्वी देवीला कौल लावायचा, तिच्या साक्षीने एक प्रयोग करून बघायचा आणि समोर येणाऱ्या निष्कर्षानुसार उचित निर्णय घ्यायचा इतका साधासुधा विचार श्रद्धामार्गाने अवलंबण्याचं भान पूर्वीच्या भोळ्याभाबड्या समाजाला होतं. घटस्थापना हे त्याचं मूर्तिमंत उदाहरण ठरतं. मात्र, विज्ञानाच्या प्रगतीमुळे लोकधारणेमध्ये आणि लोकव्यवहारामध्ये आमूलाग्र बदल घडून आला आहे. आताचा समाज प्रगत आहे, शिक्षित आहे; मात्र तांत्रिक प्रगतीच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचलेला समाज भावनिक उंचीचे प्राथमिक निकष तरी पाळतो का हा प्रश्न पडावा, अशी परिस्थिती आहे. मुख्य म्हणजे दिवसागणीक अधिकाधिक उत्साह आणि उन्मादात सण-उत्सव साजरा करणारा हा समाज मानवतेची मूलभूत संकल्पनाच पायदळी तुडवताना दिसतो. तेव्हा आश्चर्य आणि खेद वाटल्याशिवाय राहात नाही.

(पान ४ वर)

... तर होईल शक्तीची पूजा

नऊ दिवस आणि नऊ रात्रींचा नवरात्रौत्सव साजरा करताना आपण स्त्रीशक्तीचा, तिच्या सामर्थ्याचा आणि तिच्यातल्या सर्जनशक्तीचा गौरव करीत असतो. मात्र, गृहलक्ष्मीच्या रूपात घराघरांत वावरणाऱ्या देवीच्या शक्तिरूपाला समाज कशी वागणूक देतो, हेदेखील यानिमित्ताने पाहायला हवे. स्त्रीविषयक प्रश्नांची व्याप्ती खूप मोठी आहे. त्यांना योग्य व्यासपीठ मिळून त्यावर तोडगा निघायला हवा. हे खरे शक्तिपूजन असेल, असे वाटते.

निमित्त
मृण्मयी गोडबोले
प्रसिद्ध अभिनेत्री

यंदाच्या नवरात्रोत्सवाला सुरूवात झाली आहे. कुळाचाराबरोबरच विविध भावना आणि विचारांचे कंगोरे या नवरात्रोत्सवाला आहेत. आज शहरी भागांबरोबरच कोणत्याही गावखेड्यातली स्त्री स्वत:ला सुरक्षित समजते का, हा प्रश्नही विचारात घेण्याजोगा आहे. घरातून बाहेर पडताना प्रत्येकीला अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. एकटीने प्रवास करताना तिला अनेक गोष्टींची भीती असते, अनेक व्यवधानं सांभाळावी लागतात. तेच एखाद्या पुरुषाला त्यातल्या दहापैकी आठ गोष्टींचा विचारही करावा लागत नाही. महिलांना कायम सतर्क राहावं लागतं. ती कायमच पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनाची सोपी शिकार असते. म्हणूनच स्त्रीशक्तीविषयी बोलताना हे वास्तव दु:खी आणि निराश करून जातं. कारण केवळ स्त्रीशक्तीचा, सक्षमीकरणाचा नारा देऊन उपयोग नाही तर मुळात ती सक्षम होण्यासाठी समाजरचना तशी घडवायला हवी.

अनेकींना अतिशय कठीण स्थितीतून वाट काढावी लागते. अजूनही आपला समाज जुन्या, अन्याय्य परंपरा सांभाळणारा आहे. आजही स्त्रीला पुरुषप्रधान समाजात राहण्याखेरीज तरणोपाय नाही. म्हणूनच स्त्री-पुरुष समानता कशी येऊ शकेल, याचा विचार नवरात्रोत्सवाच्या या काळात तरी व्हायला हवा, असं मला वाटतं. स्त्री वरचढ व्हावी अशी माझी इच्छा नाही, पण समानता असावी, हे मात्र नक्की.

सध्याच्या मुली स्वावलंबी आहेत. कारकीर्दीचा गांभीर्याने विचार करणाऱ्या आहेत. आलेल्या प्रत्येक संधीचं सोनं करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. पण त्याच वेळी हेही दिसतं की, तिने बेधडक वृत्ती ठेवली तरी तिच्या मनात शंभर प्रश्न येऊन जातच असतात. तिच्याभोवतीचं प्रश्नांचं हे मोहोळ कसं कमी करता येईल, यावर विचार होण्याची गरज आहे. त्यासाठी या सणकाळाचा रास्त उपयोग करून घ्यायला हवा. नऊ दिवस आणि नऊ रात्री देवीने एक युद्ध खेळलं आणि त्यात विजय मिळवला. असंच वैचारिक युद्ध संपूर्ण समाजाने एकत्र येऊन खेळलं तर कदाचित स्त्रीशक्तीचा विजय फारसा दूर राहणार नाही. महिलांच्या पिछाडीला, दुय्यम स्थानाला केवळ पुरुषच जबाबदार आहेत, असं म्हणायचं नाही. मुलींना वाढवताना त्यांच्यावर होणारे संस्कार, लादले जाणारे विचार यांचाही मोठा प्रभाव त्यांच्या विचार आणि व्यक्तिमत्त्वावर झालेला दिसतो. बऱ्याचदा एखाद्या महिलेच्या क्षमतेवर पुरुष संशय घेतातच; पण महिलाही त्यात मागे नसतात. मुलींना मर्यादित स्वातंत्र्य देणं, मुलीचा जन्म नाकारणं, मुलीने आधी घर सांभाळावं असा विचार करणाऱ्या आया, आज्या आजही अनेक घरांमध्ये पाहायला मिळतील. अगदी आमच्या क्षेत्रातही हा दुटप्पीपणा पाहायला मिळतो.

(पान ४ वर)

चिनी सीमेवरील धुमसणारी शांतता!

भारत आणि चीन यांचे संबंध वरकरणी सलोख्याचे दिसत असले, तरी या दोन देशांमध्ये आणखी एक युद्ध होणार आहे, हे निश्चित. असे असले, तरी या दोन देशांमध्ये पुन्हा एकदा युद्ध होईल. त्याची रणभूमी कदाचित हिंदी महासागर असेल. कारण, चीनला हिंदी महासागरात प्रवेशच नसल्याने ती त्याची सर्वात कमकुवत बाजू आहे. पहिल्या महायुद्धात सुरुवातीच्या हल्ल्यानंतर दोन्ही फौजांनी सरहद्दीवर खंदक खोदून एकमेकांवर टेहळणी करण्याची रणनीती अवलंबिली. अनेक महिने प्रत्यक्ष चढाई किंवा लढाई होतच नव्हती. तेव्हा दोस्त पक्षाकडून आपल्या मुख्यालयाला जाणारा एक संदेश खूपच लोकप्रिय झाला होता. तो म्हणजे, 'ऑल क्वाएट ऑन द वेस्टर्न फ्रंट!' म्हणजे पश्चिम सरहद्दीवर शांतता आहे. म्हणजे पश्चिम सरहद्दीवर प्रत्यक्ष युद्ध होत नसले आणि शांतता असली, तरी ती धुमसणारी शांतता आहे..

लक्ष्यवेध
राहुल बोरगांवकर

भारत-चीन सरहद्दीवर सध्या अशीच धुमसणारी शांतता पसरली आहे. २०२० मध्ये चिनी सैन्याने लडाखमधील गलवान खोऱ्यात घुसखोरी करण्याचा जो उद्दामपणा केला होता, त्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर देत चीनचा भूमी व्यापण्याचा प्रयत्न उधळून लावला. भारतीय सैन्याकडून अशा प्रकाच्या प्रतिक्रियेची अपेक्षाच चीनने केलेली नसल्याने, त्याच्या सैन्याच्या मनोधैर्यावर झालेला तो सर्वात मोठा आघात होता. त्यातून सावरण्यासाठी चीनने वेगळेच धोरण अवलंबिले. चीनने आपले हजारो सैनिक प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरच तैनात करून ठेवले. तसेच, सरहद्दीलगत नवी गावे वसविण्यास प्रारंभ केला. चीनने सरहद्दीलगतच्या भागात अनेक पायाभूत सोयीसुविधा उभारल्या आहेत. असे करून तो भारतावर मानसिक दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. भारताला चीनचे हे सारे कावे चांगलेच ठाऊक आहे. पण भारतीय सैन्याकडे योग्य परिस्थितीची वाट बघत मनावर संयम ठेण्याचा जो गुण आहे, त्याची चीनला कल्पना नाही.

भारत गेली ४० वर्षे सियाचीनसारख्या जगातील सर्वात उंच जागी असलेल्या रणभूमीचे रक्षण अशाच प्रकारे संयमाने करीत आहे. मानवी जीवनाला पूर्णपणे प्रतिकूल असलेल्या वातावरणात जर भारताचे सैनिक इतकी वर्षे तग धरून भारतीय भूमीचे रक्षण करीत असतील, तर तुलनेने कमी प्रतिकूल असलेल्या लडाखच्या रणभूमीवर त्यांना पहारा देण्यास फारशी अडचण होणार नाही.

अर्थात सरहद्दीवर लाखभर सैन्य सदैव सज्ज स्थितीत तैनात करून ठेवणे, ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हे. लडाखसारख्या वैराण भूमीवर अहोरात्र सज्ज मन:स्थितीत पहारा देणे, हेही मनाला थकविणारे काम आहे. त्यात तेथील हवामान हे थंडीत अधिकच खडतर बनते. ही गोष्ट भारताप्रमाणेच चिनी सैन्यालाही लागू होते म्हणा. म्हणूनच युद्ध होणार नसेल, तर परिस्थिती पुन्हा पहिल्यासारखी करण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे. पण खरा प्रश्न चीनबद्दल वाटणाऱ्या अविश्वासाचा आहे. भारताचे लष्करप्रमुख जनरल उपेन्द्र द्विवेदी यांनी नुकताच लडाखचा दौरा केला, आणि सरहद्दीवरील युद्धसज्जतेची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी हीच भावना बोलून दाखविली.

सरहद्दीवरील स्थिती सध्या तरी स्थिर असली, तरी ती संवेदनशील असून चीनबद्दल वाटणारा अविश्वास त्यास कारणीभूत आहे. भारताला प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर २०२० सालापूर्वीची स्थिती पुन्हा निर्माण करायची असली, तरी चीनच्या खड्या सैन्यामुळे आम्हालाही आपले सैन्य तैनात करावे लागते, असे ते म्हणाले. थोडक्यात सरहद्दीवर सध्या असलेली शांतता ही आतून धुमसत आहे, असेच दिसते.

चीनलाही आपले इतके मोठे सैन्य आणि अन्य जामानिमा कायम ठेवणे जड जात आहे. तरीही मोदींचा भारत हा मागे हटणारा नव्हे, आणि तो येईल त्या संकटाला तोंड देत आपल्या भूमीचे रक्षण करीत राहील, ही गोष्ट चीनने ओळखली आहे. म्हणूनच गेल्या महिन्यात चीननेही काहीसे नरमाईचे धोरण स्वीकारले. लडाखमधील सरहद्दीवरील काही ठिकाणांवरील सैन्यात चीनने कपात केली आहे. पण खरा प्रश्न डेप्सांग आणि डेमचोक या दोन महत्त्वपूर्ण ठिकाणांचा आहे. या दोन ठिकाणांवर असलेली पकड ढिली करण्यास, कोणताच देश तयार नाही.

(पान ४ वर)

'भारतमाता की जय' घोषणेस आक्षेप घेणाऱ्यांना चपराक!

'भारतमाता की जय' या घोषणेस जाणूनबुजून आक्षेप घेणाऱ्या धर्मांध शक्तींना न्यायालयाच्या निकालाने सणसणीत चपराक बसली आहे. 'भारतमाता की जय'ही घोषणा देशभक्तीची भावना अधिक बळकट करणारी आहे. पण, आपल्या देशातील काहींना ही घोषणा समाजामध्ये मतभेद निर्माण करणारी, द्वेष पसरविणारी आहे, असे वाटत आले आहे. आपल्या देशातील धर्मांध मुस्लीम समाजाचा तर या घोषणेस आक्षेप आहे. त्यामुळे अशी घोषणा दिली की, अशा धर्मांध व्यक्तींच्या म्हणे भावना दुखवतात! कर्नाटक राज्यातील मंगळुरुमध्ये घडलेल्या अशा एका घटनेसंदर्भात कर्नाटक उच्च न्यायालयाने जो निकाल दिला, तो लक्षात घेतल्यानंतर तरी 'भारतमाता की जय' या देशभावना जागृत करणाऱ्या घोषणेस आक्षेप घेणाऱ्यांचे डोळे उघडावेत!

वेधक
दत्ता पंचवाघ

या घटनेची पार्श्वभूमी अशी... पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी ९ जून रोजी शपथ घेतली. मंगळुरुमधील जनतेनेही दूरचित्रवाणीवर हा समारंभ पाहिला. या समारंभाचे थेट प्रक्षेपण पाहून झाल्यानंतर काही कार्यकर्ते 'भारतमाता की जय' अशा घोषणा देत घरी निघाले होते. घोषणा देत चाललेले कार्यकर्ते एका मशिदीजवळ आले असताना २५ जणांच्या एका जमावाने घोषणा देणाऱ्या कार्यकर्त्यांना अडविले. मशिदीच्या समोर 'भारतमाता की जय' अशा घोषणा का देत आहात, अशी विचारणा त्या जमावाने केली. त्यावरून परिस्थिती चिघळली. त्या जमावातील एकाने घोषणा देणाऱ्या एकाला भोसकले. या प्रकरणी पोलिसामध्ये तक्रार दाखल झाली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी पी. के. अब्दुल्ला नावाच्या एका मुस्लिमाने घोषणा देणाऱ्यांच्या विरुद्ध तक्रार केली. हा गट मशिदीच्या समोर भडक घोषणा देत होता, तसेच स्थानिक मुस्लीम समाजास अशा घोषणा देऊन त्या गटाने धमकावले, असेही अब्दुल्ला याने तक्रारीत म्हटले होते. अब्दुल्ला याची तक्रार लक्षात घेऊन, पोलिसांनी घोषणा देणाऱ्यांच्या विरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ (अ) खाली गुन्हा नोंदविला. पण, पोलिसांनी दाखल केलेल्या त्या 'एफआयआर'ला, घोषणा देणाऱ्या कार्यकर्त्यांनी

(पान ४ वर)

नावीन्यपूर्ण युद्ध पद्धतीचा वापर

इस्रायलने मारले हिजबुल्लाचे ५० टक्के नेतृत्व

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

पेजर हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हिजबुल्ला दहशतवादी संघटना इस्रायलवर हल्ला करणार होती. मात्र त्याआधी १९ सप्टेंबरला इस्रायलने लेबनॉनमध्ये हवाई हल्ले केले. यावेळी हिजबुल्लाची १००० रॉकेट्स भुईसपाट केली गेली. रॉकेटच्या माध्यमातून हिजबुल्लाला इस्रायलवर निशाणा साधायचा होता. हिजबुल्ला हमासला पाठिंबा देणारी दहशतवादी संघटना आहे. हमासला पाठिंबा देत हिजबुल्ला लेबनॉनमधुन इस्रायलवर रॉकेट फायर करण्याचे काम करत आहे.

हिजबुल्लाच्या ८७९ सदस्यांचा मृत्यू

लेबनॉन येथे पेजर स्फोट आणि वॉकीटॉकी स्फोटात हिजबुल्लाच्या गुप्त लष्करी दस्तऐवजांवरून एकूण ८७९ सदस्य मारले गेले आहेत; ज्यात १३१ इराणी आणि ७९ येमेनचा समावेश असून यामध्ये एकूण २९१ वरिष्ठ अधिकारी आहेत. हल्ल्यात दळणवळण संसाधनांचे लक्षणीय नुकसान झाले आहे. पेजर स्फोटात सुमारे ९ जण मारले गेले तर तीन हजार जखमी झाले आहेत.

हिजबुल्लाकडून पेजरची निवड का?

हिजबुल्लाच्या दृष्टीने विचार करता पेजर हे सुरक्षेच्या दृष्टीने इतर कोणत्याही संपर्कासाठीच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांपेक्षा अधिक सुरक्षित होते. पेजरच्या वापरामुळे अत्याधुनिक कम्युनिकेशन ट्रेसिंग यंत्रणांना या दहशतवाद्यांच्या हालचालींवर नजर ठेवणं कठीण झाले, म्हणून हिजबुल्लाकडून पेजरची निवड. मोबाईल संपर्क केल्याने शत्रू आपल्या मोबाईलमधील माहिती काढून घेतात. अनेकदा मोबाईल हॅक होण्याच्या घटना घडतात. मात्र पेजर वापरले गेले. हे उपकरण वापरण्यास सोपे असून हॅक करणे सोपे नाही, म्हणून पेजरचा वापर केला जात होता. इस्रायलयच्या दृष्टीने विचार केला, तर पेजर हे एकाच वेळी मोठ्या संख्येनं हिजबुल्लाच्या दहशतवाद्यांना लक्ष्य करण्याचं एक प्रभावी माध्यम ठरलं. कारण पेजर वैयक्तिक वापरासाठी असल्यामुळे त्या त्या व्यक्तीलाच लक्ष्य करणं सोपं होतं. यामुळे लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या नेटवर्कलाच एक मोठं भगदाड पाडण्याची आणि त्यातून कमकुवत करण्याची संधी मोसादला उपलब्ध झाली. हेझबोलाकडून पेजर खरेदी केले जाणार असल्याचा सुगावा मोसादला आधीच लागल्यामुळे त्यांना पेजरमध्ये स्फोटकं आधीच फिट करणं शक्य झालं. त्यांनी पेजर बनवणाऱ्या कंपनीशी संगनमत करून या पेजरमध्ये विशिष्ट स्फोटकांची क्षमता असणाऱ्या मिनी चिप बसवल्या. या रिमोट ट्रिगर प्रणालीनं सज्ज होत्या. पेजर्सचा पुरवठा करताना हिजबुल्लाने तैवानमधून ५,००० पेजर्स मागवले होते. ते वर्षाच्या सुरुवातीला हिजबुल्लापर्यंत पोहोचले होते. पेजरमध्ये स्फोटके भरण्यात आली. पेजरचे वाटप हिजबुल्लामध्ये करण्यात आले होते. यावेळी इस्रायलने योग्य संधी पाहून धमाका केला. लिथियम बॅटरी बहुतेक आधुनिक उपकरणांमध्ये वापरले जाते आणि उच्च उष्णतेमध्येही त्यांचा स्फोट होत नाही म्हणून लिथियम बॅटरी सुरक्षित मानली जाते. तरीही पद्धतशीरपणे ज्या प्रकारे स्फोट झाले, तो इलेक्ट्रॉनिक युद्धाचा प्रकार होता.

प्रत्येक पेजरमध्ये तीन ग्राम विस्फोटक

प्रत्येक पेजरमध्ये तीन ग्राम विस्फोटक असल्याचा दावा हिजबुल्लाने केला आहे. पेजर हे संदेश प्राप्त करण्यासाठी आणि पाठवण्यासाठी वापरले जाणारे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. लेबनॉन आणि शेजारी देशांपैकी सीरियात एकाच वेळी हजारो पेजर्सचा स्फोट झाला. हा स्फोट आहे की घातपात? जखमींपैकी अनेक हिजबुल्लाशी संबंधित होते. हा स्फोट पेजर अधिक गरम झाल्याने झाला. पेजर ठेवणाऱ्या हिजबुल्लामुळे इतर आजूबाजूच्या लोकांना याचा फटका बसला. हिजबुल्लाने म्हटले की, इस्रायलने हजारो पेजर्समधील सिग्नल हॅक केले. इतक्या वारंवारतेने मेसेज पाठवले की, ज्यामुळे बॅटरी गरम झाल्याने स्फोट झाला.

इस्रायल-लेबनॉनचे एकमेकांवर हल्ले

इस्रायलच्या सैन्य दलाने शुक्रवारी बैरूतवर केलेल्या हवाई हल्ल्यात हिजबुल्लाचा प्रमुख कमांडर इब्राहिम अकील ठार झाला. अकीलने हिजबुल्लाच्या रडवान फोर्स आणि जिहाद कौन्सिल या लष्करी गटांचा प्रमुख म्हणून काम केले आहे. बैरूतमधील अमेरिकी दूतावासावर १९८३ मध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्यात अकिलचा हात होता. इस्रायल आणि लेबनॉन या देशांनी शुक्रवारी एकमेकांवर हल्ले केले. हिजबुल्लाने उत्तर इस्रायलवर तीन हल्ले केले असून त्यात १४० क्षेपणास्त्रे डागली. त्याला प्रत्युत्तर देत इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरूतमध्ये हवाई हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये किमान आठ जण ठार झाले तर ६० जखमी झाले. या हल्ल्यांत बैरूतमध्ये अनेक इमारती, वाहनांचे नुकसान झाले. हिजबुल्लाने इस्रायलच्या उत्तर भागांत क्षेपणास्त्रांचा मरा केला. त्यापैकी बहुतेक क्षेपणास्त्रं मोकळ्या भागात पडली. लेबनॉनमध्ये १७ सप्टेंबर रोजी एकाच वेळी जवळपास २८०० पेजरमध्ये छुप्या अप्रत्यक्ष हल्ल्यामध्ये इस्रायलनं २८०० हेझबोला सदस्यांना एकाच वेळी लक्ष्य केलं.

वॉकीटॉकींचा स्फोट

१८ सप्टेंबर रोजी दक्षिण लेबनॉन आणि उपनगरात हेझबोलाने वापरलेल्या रेडिओचा आणि काही वॉकीटॉकीचा स्फोट झाल्याची घटना घडली. या स्फोटात २० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला. ज्या वॉकीटॉकींचा स्फोट झाला आहे, ते वॉकीटॉकी जपानच्या आयकॉम कंपनीचे आहेत. ज्या वॉकीटॉकींचा स्फोट झाला आहे, त्या मॉडेलची निर्मिती कंपनीने दशकभरापूर्वीच बंद केली होती, असं कंपनीने स्पष्ट केलं आहे. तरीही आम्ही यासंदर्भात तपास करत आहोत, असं कंपनीने म्हटलं आहे. सायबर युद्धांमध्ये इस्रायलचा मोर्चा सांभाळणारी गुप्तचर यंत्रणा

सायबर युद्धांमध्ये इस्रायलचा मोर्चा सांभाळणारी गुप्तचर यंत्रणा

युनिट-८२०० ने हिजबुल्लावर हल्ले सुरू केले आहेत. युनिट-८२०० ही सायबर संस्था पेजर्स व इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या उत्पादन प्रक्रियेत सहभागी झाली होती. सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये स्फोटकं बसवणे, रिमोट कंट्रोलद्वारे त्यांचं नियंत्रण मिळवणे व एकाच वेळी त्यांचा स्फोट घडवून आणणे या तिन्ही गोष्टींवर 'युनिट-८२००' ने अनेक महिने काम केलं होतं. युनिट-८२०० मधील सदस्य हे त्यांच्या क्षेत्रातले गुणी कर्मचारी आहेत. इस्रायलची संरक्षण क्षमता, सायबर सुरक्षा वाढवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. युनिट-८२०० व या संस्थेतील कर्मचारी शत्रुराष्ट्रांची माहिती गोळा करणे, ती माहिती गुप्तचर यंत्रणा व संरक्षण यंत्रणांना पुरवणे; त्या माहितीचं विश्लेषण करणे, सायबर सुरक्षा पुरविणे यांसारखी कामे करतात. या युनिटची थेट यूएस नॅशनल सिक्यूरिटी एजन्सीशी तुलना केली जाते. इस्रायली सरकार युनिट-८२०० च्या कारवाया व मोहिमांबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती बाहेर येऊ देत नाही.

स्फोटासाठी पेजरचाच पर्याय का?

इस्रायलकडे संहारक अस्त्र असूनही त्यांनी पेजरचाच पर्याय का निवडला? इस्रायल मोठ्या प्रमाणात हमास, हिजबुल्ला दहशतवाद्यांच्या विरुद्ध हवाई हल्ले करत आहे. याचा मुख्य उद्देश आहे की, त्यांच्या महत्त्वाच्या नेतृत्वाला मारावे. यामुळे या संघटनांची शक्ती कमी होईल. आजूबाजूच्या लोकांना कमीत कमी त्रास व्हावा. कारण ज्या वेळेला निर्दोष नागरिक मारले जातात, त्यामुळे त्या समाजामध्ये इस्रायलच्या विरुद्ध अजून रागाची भावना निर्माण होते. नेतृत्व मारणे इतके सोपे नाही. कारण नेतृत्व वेगवेगळ्या ठिकाणी पसरलेले असते. त्यावेळेला इस्रायलला माहिती मिळते की, नेतृत्व या घरांमध्ये लपले आहे, ज्या वेळेला हवाई हल्ले केले जातात. परंतु अनेक वेळा मिळालेली गुप्तहेर माहिती चुकीची ठरते. याउलट पेजर हल्ल्यामध्ये इस्रायलने २० मिनिटांच्या आत जुनाट तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण युद्ध पद्धतीचा वापर करून ४० ते ५० टक्के हिजबुल्ला नेतृत्व खतम केले; जे एक मोठे यश आहे. म्हणजेच जे हवाई दलाच्या हल्ल्यातून शक्य होत नव्हते ते केवळ नावीन्यपूर्ण युद्ध कल्पना वापरून इस्रायलने केले.

युनिट-८२०० सारखी संस्था आपण भारताच्या सायबर कमांडमध्ये निर्माण करू शकतो का? भारतामध्ये अजूनही ३० ते ४० टक्के मोबाईल आणि इतर इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट ही चीनमधून आयात होत आहे. त्याचा भारताच्या विरोधात शस्त्र म्हणून वापर केला जाऊ शकतो का? वेगवेगळ्या ठिकाणी चालू असलेल्या युद्धामुळे आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात म्हणून भारतानेसुद्धा अशा युद्ध पद्धतीचा विचार करावा आणि अशा नावीन्यपूर्ण संकल्पना पाकिस्तान, चीन, दहशतवादी, नक्षलवाद्यांच्या विरोधात कशा वापरता येतील, यावर संशोधन करावे; ज्यामुळे देश जास्त सुरक्षित होईल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

आता तरी पुढे हाची उपदेश । नका करू नाश आयुष्याचा ।

संतांनी आपल्या अभंग वाङ्मयातून सातत्याने समाजातील सर्वांच्या कल्याणाची आर्त तळमळ मांडली आहे.

बुडती हे जन न देखवे डोळा ।
म्हणूनही कळवळा येतसे ।।

त्या तळमळीतून सर्वांना शाश्वत सुख मिळावे; सर्वांचा संसार सुखाचा व्हावा, असा भाव प्रकट होतो. त्यासाठी त्यांनी समाजातील लोकांना कर्तव्यकर्म व सदाचाराचा जो उपदेश केला आहे तो सर्वच काळातील समाजाला संबद्ध आहे. म्हणून संतांचे जगावर सानंत उपकार आहेत.

काय सांगू आता संतांचे उपकार ।
माझा निरंतर जगविती ।।

मानवी संसार जरी दुःखमय असला, तरी मनामध्ये सतत परमेश्वराचे नामस्मरण व हातामध्ये सदाचारयुक्त कर्तव्यकर्म असेल तर संसाराची भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही.

आता तरी पुढे हाची उपदेश ।
नका करू नाश आयुष्याचा ।।

या प्रपंचामध्ये कोणीही उच्च-नीच नाही. संसारामध्ये परमेश्वराचे नामस्मरण करण्याचा अधिकार सर्वांना आहे. भक्तिरस हा ईश्वरी प्रसाद आहे. तो ब्राह्मण, वैश्य, शूद्र, चांडाळ, वेश्यांचाही अधिकार आहे.

आचारधर्माचा संपूर्ण सारांशच प्रस्तुत अभंगातून मांडला-

पुण्य परउपकार पाप ते परपीडा।
आणीक नाही जोडा दुजा यांसी।।
सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म।
आणीक हे वर्म नाही दुजे।।
गति ते चि मुखी नामाचे स्मरण।
अधोगति जाण विन्मुखता।।
संतांचा संग तो चि स्वर्गवास।
नरक तो उदास अनर्गळा।।
तुका म्हणे उघडे आहे हित घात।
जयाचे उचित करा तैसे ।। (तु. गा. १०२१)

संत तुकारामांनी पाप आणि पुण्याची अगदी साधी- सोपी असणारी व्याख्या सांगितली आहे. काया, वाचा आणि मन याद्वारा एखाद्या असहायाला साहाय्य करणे म्हणजे परोपकार होय. परोकारासारखे पुण्य जगात दुसरे कोणतेही नाही. साध्या-भोळ्या, निरपराध लोकांना विनाकारण त्रास देणे, छळणे म्हणजेच परपीडा, ते पाप होय. नीतिशास्त्रातसुद्धा पाप-पुण्याच्या संकल्पनेला अवर्णनीय असे महत्त्व आहे. वेदविहित सत्य आचरण हा स्वधर्म मानावा. जीवनामध्ये नीतिशास्त्राविरुद्ध असत्य आचरण करणे हा अधर्म आहे. पूर्व मीमांसाशास्त्रात याचे दाखले आढळतात.

संतांचा सहवास म्हणजेच स्वर्गसुख तर दुर्जनांशी सख्य म्हणजे नरकवास होय. आपले हित व अहित कशामध्ये आहे, हे आपण स्वतः ओळखणे आवश्यक आहे.

पाप आणि पुण्य दुसरीकडे नसून ते आपल्या वर्तणुकीमध्ये आहे. त्यांच्या शिकवणुकीमध्ये- १) ज्ञानातील डोळसपणा आहे. २) कर्मातील शुचिता पाळणे आवश्यक मानतात. ३) भक्तीतील समर्पणता जीवनामध्ये महत्त्वपूर्ण आहे.

मनुष्याने याचकाला यथाशक्ती दान करावे. परमेश्वराशी नाते जोडण्यासाठी दया आणि दान हे दोन महत्त्वपूर्ण टप्पे आहेत. आतिथ्य आणि परोपकार यांसोबतच दया व दान ही सर्वोत्तम जीवनमूल्ये आहेत. जीवनातील सर्वात्मभाव वाढविणारे ते संस्कारमोती आहेत.

समाजाच्या उत्थानाकरिता, उन्नतीकरिता प्रत्येकाने या सामाजिक सद्गुणरूपी जीवनमूल्यांचे पालन करून भक्तिमार्गाने जीवन जगावे, असा महत्त्वपूर्ण संदेश संत तुकारामांनी आपल्या आचारधर्मामध्ये सांगितला आहे

तुका म्हणे तुम्ही चला या चि वाटे ।
भरवशाने भेटे पांडुरंग ।। (तु. गा. ३७२८)

संतांचा जीवन कल्याणाचा उपदेश वेद, पुराण, श्रुती या सर्व ग्रंथांचा मूळ उद्देश मानवास योग्य आचाराची संहिता दाखवणे हा आहे. संत आपल्या वाङ्मयात वेदमार्गाचा पुरस्कार केला आहे. आजच्या काळात वेदाचीच आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण नीतिमत्ता ढासळलेल्या अस्थिर समाजाला फक्त वेदांचे विचारच सन्मार्गाची दिशा दाखवू शकतात. संतांनी केलेला कर्तव्योपदेश जर शासन स्तरावर अंगीकारला गेला, तर प्रत्येक व्यक्तीला सात्त्विक जीवन जगण्याचा एक आदर्श वस्तुपाठच प्राप्त होईल.

कर्माचे तीन प्रकार आहेतनित्य, नैमित्तिक आणि काम्य. या कर्मांची व्याप्ती फार गहन असून सर्व जगच कर्माच्या अधीन आहे. गतिमान विज्ञानयुगाला स्थैर्यप्राप्तीसाठी, अखिल मनुष्यमात्रांच्या कल्याणाकरिता संतांचा कर्तव्योपदेश आजही ४०० वर्षांनंतर तंतोतंत लागू पडतो तसेच नंतरही तो लागू पडेल, अशी चिरंतन जीवनमूल्ये त्यामध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळेच संत अभंग वाङ्मय हे अक्षर वाङ्मःय ठरले आहे.

आचरणाचे सर्व सिद्धांत संत स्वतःच्या आचरणातून व काळाच्या कसोटीवर तपासून पाहिले, तेव्हाच त्यांनी ते जगासमोर मांडले.

लोककल्याणाची आंतरिक तळमळ असल्यामुळेच संतांनी ही आचारसंहिता मांडली.

आपुलिया हिता जो असे जागता ।
धन्य माता पिता तयाचिया ।।

संतांचे योग्य दिशा दर्शन भरकटलेल्या दिशाहीन समाजाला, जीवनमूल्ये हरवून बसलेल्या युवा पिढीला व आगामी असंख्य पिढ्यांना हा कर्तव्योपदेशाचा उपदेश निश्चितच मार्गदर्शक ठरेल. संतविचारांच्या आचाराशिवाय आजच्या नीतिमत्ताहीन समाजाला त्रिकालातही शांती मिळणे शक्य नाही.

संत साहित्यात सांगितलेली मूल्ये घराघरांतून, विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून समाजामध्ये रुजविली गेली तर समाजाची झालेली नीतिमूल्यांची हानी भरून निघण्यास मदत होईल.

संताच्या उपदेशाचे पालन केल्यास विज्ञानयुगातील अस्थिर व तणावग्रस्त मानवी जीवनाला चिरंतन शांती तद्वतच समाधान प्राप्त होईल.

एका हौसिंग सोसायटीची शंभरी

घरकुल

रविंद्र देशपांडे

अरे, हो खरंय हे. नुकतेच सोलापूर को- ऑपरेटीव्ह हैसिंग सोसायटीला शंभर वर्ष पूर्ण झालीतं. बरोब्बर शंभर वर्षापूर्वी म्हणजे २४ सप्टेंबर १९२४ साली सोलापूर शहरात या संस्थेची नोंदणी सरकार दरबारी झाली. सोसायटीचे पहिले अध्यक्ष होते एन. आर. गोडबोले. पुढे गोडबोले, पां. के. येवलेकर, रा. का. जेऊरकर, रं. वि. लळीत यांनी मिळून ग. वि. रानडे यांच्या अध्यक्षतेखाली सोसायटीने सरकारकडून आठ एकर सत्तावीस गुंठे आणि एक्यांशी चौरस यार्ड एवढी जमीन कबुलायत करून घेतली. महापालिका प्लॉट नंबर ५६०. या जागेत एकूण ५६ निवासी प्लॉट तयार करण्यात आले. सर्वात पहिला बंगला तयार झाला तो कुर्लेकर यांचा, हा बंगला त्यावेळी अवघ्या तीनशे रुपायात बांधला गेला (जागेसाहित). अशा या सोसायटीने आज आपली शंभरी पार केली आहे. या जागेवर आज तीन पिढ्यांचे संसार पूर्णत्वास जाऊन चौथ्या पिढीचे संसार सुरु झाले आहेत. हो, हे मी का लिहितोय? अहो, माझ्या जन्मापासून वयाची सत्तावीस-अठ्ठावीस वर्षे माझा पत्ता होता, आनंदी भुवन, ५६०/१० दक्षिण सदर बझार, सोलापूर. मदनराव डंके यांच्या बंगल्यात आमचे कुटुंब वास्तव्यास होते. या सोसायटीमध्ये ५६ बंगले होते. घरमालक आणि बिर्हाडे मिळून शंभर कुटुंबे नांदत होती. या सोसायटीत उच्चविद्याविभूषित, सुसंस्कृत व्यक्तिमत्वांची मांदियाळी आहे. काही नावे इथे आर्वजून नमूद करावीशी वाटतात. पहिल्या पिढीतील मेघश्याम कुलकर्णी, एक प्रख्यात शिक्षक होते. निवृत्तीनंतरदेखील ते घरातच मुलांना शिकवायचे. हणमंतराव कुलकर्णी बोळकुटकर हे शिक्षक आणि संस्कृत आणि संत साहित्याचे अभ्यासक होते, नामवंत वकील लळीत, वळसंगकर, असे अनेक ज्येष्ठ वकील सोसायटीत राहायचे. शिक्षण आणि संस्कृतीचा प्रसार व्हावा अशी तळमळ असणारी ही मंडळी. अगदी आजची चेवशीप कळसह ीलहेश्र या शाळेची सुरुवात नीलकंठ रानडे यांच्या बंगल्यातूनच झाली.

पुढच्या पिढीतही सोलापुरातील गुणवंत, नामवंत मंडळी सोसायटीमध्ये वास्तव्यास होती. वाडिया हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. गोडबोले, डॉ. मेहता, बालरोगतज्ञ डॉ. ए. व्ही. कुलकर्णी, डॉ. नेने प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. मोहोळकर, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. किर्लोस्कर, डॉ. आपटे. सर्जन डॉ. जी. आर. कुलकर्णी, डॉ. झांबरे, डॉ. येवलेकर असे वीस एक डॉक्टर्स, पोलीस प्रोसिक्यूटर वढावकर, ह. दे. प्रशालेचे शिक्षक जेऊरकर, पी. जी. कुलकर्णी, प्रा. बनकर , प्रसिध्द व्यावसायिक कृष्णस्वामी आयंगार, काकडे, सोहोनी, करवा, समाजसेवक हरिनारायण सोनी, सुप्रसिध्द चित्रकार सपार बंधू, वढावकर बंधू, श्रीकांत कुलकर्णी, येवलेकर अशी अनेक नावे इथे नमूद करता येतील. याच सोसायटीत महिला उद्योजिकाही तयार झाल्या. सोलापुरातील पहिले ब्युटीपार्लर सोसायटीतच सुरु झाले. वढावकर काकूंनी ते सुरु केले आणि अनेक वर्षे उत्तमरीतीने चालवून मोठा नावलौकिक मिळविला. हे सांगायचे कारण असे की, अशा सृजनशील, विद्वान मंडळींमुळे सोसायटीमधील वातावरण फार संस्कारक्षम असे होते. मुलांवर जसे पालकांचे संस्कार होतात तसेच आजूबाजूच्या सामाजिक वातावरणाचे हि संस्कार होतात आणि याच वातावरणातून, एका अर्थाने सत्संगातून पुढची पिढी घडली, त्यांच्या जीवनावर या संस्कारांचा निश्चित प्रभाव पडला असणार. सोसायटीत घरमालक आणि भाडेकरू असा भेदभाव कधी दिसला नाही. सणवार, उत्सव सगळं काही एकत्रित साजरे होत होते.

सोसायटीचे स्वतःचे मैदान होते, बाग होती, १९६१ साली सोसायटीच्या बागेच्या जागेत मध्यभागी गणेश मंदिर उभे केले गेले, पुढे १९७२ मध्ये सोसायटीने मैदानाच्या एका बाजूस एका सभागृहाची उभारणी केली, आज ते 'विनायक सभागृह या नावाने ओळखले जाते. मैदान, देऊळ, बाग, सभागृह आणि अर्थात उत्साही सभासद मंडळी, यामुळे सोसायटीत अनेक खेळ, उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम एकदम उत्साहात साजरे केले जायचे. यातून मुलांची जडण घडण होत होती. सोसायटीत अनेक मैदानी खेळ होत असत, विटी दांडू, भोवरा, क्रिकेट, लिगोरी, बकाम्बुक्की, काठीपाणी, गोट्या असे अनेक.. आम्ही दरवर्षी पतंगही खूप उडविला, यात सपार यांच्या घरून फक्त एक दिवस पतंग उडविला जायचा, तो ते घरी बनवायचे, एवढा मोठ्ठा पतंग असायचा बापरे, खूप भारी वाटायचं बघताना. पतंगाचा हंगाम सुरु झाला की, या दिवसाची आम्ही वाट पहायचो. तसेच विनायक सभागृहात खेळाच्या स्पर्धाही व्हायच्या. मला आठवते मी स्वतः एकदा बुद्धिबळ स्पर्धेत सकाळी दहापासून रात्री आठपर्यंत सलग खेळत होतो. विनायक सभागृह अनेक प्रसंगाचे साक्षीदार आहे, कला, संस्कृती, घरघुती कार्यक्रम असे अनेक समारंभ या सभागृहात होत असत. अभ्यास, खेळ, सणवार याबरोबरच थोडी मस्तीही असायची. झांबरेंच्या बंगल्यातील आवळे खाल्ले नाहीत अशी एकही व्यक्ती या तीन पिढ्यात नाही सापडणार. रंगपंचमीचा सण हा खास असायचा. आम्ही रहायचो त्या डंके बंगल्यात समोरील जागेत एक कारंज्याचा हौद होता. रंगपंचमीच्या आदल्या दिवशी तो आम्ही घासून पुसून स्वच्छ करायचो, रात्री जागून तो पाण्याने भरायचो आणि सणादिवशी त्यात रंग केला जायचा, मग.. काय फुल धमाल... मडडम ग्राउंडवर (आताचे प्रथम हॉटेल आहे ती जागा) दोन दोन दिवस क्रिकेटच्या मॅचेस चालायच्या. खूप मजा चालायची. त्याच मैदानावर शाखा भरायची. तिथेच अनेक मुलांवर नमस्ते सदा वत्सले... चे संस्कार झाले असावेत. उन्हात, मातीत अगदी बिनधास्त खेळत होतो. फार बंधने नव्हती, बंधन होते ते म्हणजे दिवेलागणीला घरात आले पाहिजे. घरी आलो कि मग 'शुभंकरोती, शांताकारं असे पाठ होत असत. हे सगळ चालू असताना खोड्या करणार्या मुलाला रागवायचा अधिकार सगळ्यांनाच होता बरं का? मित्राचे वडील, मोठा भाऊ, ताई कोणीही मुलांना रागावू शकत होते. 'माझ्या मुलाला/ मुलीला बोलायचा तुझा काय संबंध' अशी विचारणा पालकांकडून कधी झाली नाही. कारण 'वाङमय', साहित्य, संस्कार केवळ पुस्तकांपुरते नव्हते, आचरणातही होते. यामुळे इथे मुलांवर अतिशय उत्तम संस्कार झाले (पान ६ वर)

प्रसंगावधान देई, यश-सन्मान!

यशाकाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१ सीतेने लक्ष्मणरेषा पार केली आणि क्षणात रावणाने सीतेचे हरण करून पुष्पक विमानातून लंकेकडे निघाला. जटायूचे पंख कापून त्याला धराशायी केले. त्या कठीण प्रसंगी सीतेने प्रसंगावधान राखून आपले काही अलंकार खाली ऋष्यमूक पर्वतावर टाकले. त्यामुळेच सीतेला शोधताना मदत झाली.

२. श्रीहनुमान सीतामातेच्या शोधार्थ जेव्हा लंकेकडे उड्डाण करते झाले तेव्हा सुरसाने हनुमानाला गिळण्यासाठी आपला मोठा जबडा उघडला. हनुमानाने प्रसंगावधान राखून आधी आपले शरीर मोठे केले तेव्हा तिनेही आपला आकार वाढवला; मग क्षणात हनुमानाने आपले शरीर एकदम लहान करून तिच्या तोंडातून प्रवेश करून तिने जबडा बंद करण्याच्या आधी बाहेरही निघाला व लंका गाठली. रावणाचे गर्वहरण करण्यासाठी रावणाच्या सिंहासनापेक्षा उंच आपल्या शेपटीचे सिंहासन तयार केले. शेपटीला आग लावताना शेपटी वाढवत नेली व आग लावल्यावर लंकादहन केले. पुढे युद्धात रावण रथावर स्वार आहे हे बघून श्रीराम व लक्ष्मण यांना आपल्या दोन्ही खांद्यावर बसवून आपल्या शरीराचाच रथ म्हणून उपयोग केला. संजीवनी बुटी नेमकी कोणती, याचा निर्णय घेणे कठीण आहे, हे कळल्यावर हिमालयातून अख्खा पर्वतच उचलून आणला व लक्ष्मणाचे प्राण वाचवले. याप्रकारे श्रीहनुमान यांनी अनेकदा प्रसंगावधान वापरले.

३. कुरुक्षेत्रावर महायुद्ध सुरू असताना सगळीकडे रक्तमांसाचा चिखल झाला होता. कर्णासोबत अर्जुनाचे निर्णायक युद्ध सुरू होणार त्यावेळी श्रीकृष्णाने प्रसंगावधान राखून रथाची चाके चिखलात फसू नये म्हणून चाकांच्या भोवती वंगण लावले. हीच काळजी कर्णाचा सारथी शल्यराजाने न घेतल्यामुळे अर्जुनाशी तासन्तास युद्ध करताना त्याच्या रथाचे चाक वाळलेल्या चिखलात रुतून बसले व त्याचा वध करता आला. संपूर्ण महाभारत अनेक वेळा प्रसंगावधान वापरून श्रीकृष्णाने पांडवांचे रक्षण केले.

४. अफजल खान अत्यंत दगाबाज आहे, हे ध्यानात ठेवून शिवाजी महाराजांनी अंगात चिलखत घालून त्यावर अंगरखा परिधान केला. अफजल खानाने दगा करण्याचा प्रयत्न करताच प्रसंगावधानाने बंद मुठीत लपवलेली वाघनखं वापरून अफजल खानाचा कोथळा बाहेर काढून त्याचा डाव हाणून पाडला.

५. आग्र्याला औरंगजेबाच्या कैदेत असताना शिवाजी महाराजांनी अत्यंत धैर्याने मन शांत ठेवून आधी आपले विश्वासू सैनिक त्यांची मला आता गरज नाही असे म्हणून पुढच्या योजनेची तयारी करायला रवाना केलेत. सैनिक कमी करून शिवाजी आपली ताकद कमीच करतोय, असे समजून औरंगजेब फसला. नंतर शिवाजी महाराजांनी आजारपणाचे निमित्त करून साधूंना व देवळांना मिठाई पाठवायची आहे, असे भासवून मिठाईच्या पेटाऱ्यात बसून प्रसंगावधानाने स्वत:ची व संभाजीची सुटका करून घेतली.

६. प्रचंड लोकसंख्येमुळे भारत हा अनेक प्रकारच्या वस्तूंसाठी संपूर्ण जगात मोठी बाजारपेठ आहे. आधी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, कार व बाईक बनवणाऱ्या मोठ्या कंपन्या, अमेरिका, चीन व फिलिपाईन्ससारख्या देशात स्वस्तात माल बनवून भारतात विकत असत. बाहेरदेशातील कंपन्यांना २०१३ पर्यंत भारतातील कारखान्यात निर्मिती करणे निर्मितीला लागणाऱ्या व्यवस्थेच्या अभावामुळे कठीण होते. पण २०१४ मध्ये केंद्र सरकार स्थापन केल्यावर मोदीजींनी राजनैतिक प्रसंगावधान राखून अनेक सुधारणा केल्यात व 'मेक इन इंडिया' मोहीम सुरू केली. अनेक देशांचे दौरे केलेत व जगभरातील कंपन्यांना भारतात आमंत्रित केले. त्यांच्या चमूच्या अथक प्रयत्नांना फळ आले. बोस्टन कन्सल्टिंग ग्रुप या जागतिक व्यापाराचे निरीक्षण व संशोधन करणाऱ्या कंपनीच्या

रिपोर्टनुसार भारताने गेल्या १० वर्षांत प्रचंड प्रगती केली आहे. भारतात उत्पादन करून अमेरिकेत मिळणाऱ्या मालाची उत्पादन किंमत सर्व खर्च धरून प्रत्यक्ष अमेरिकेतच उत्पादित किमतीपेक्षा १५ टक्के स्वस्त आहे. त्यामानाने चीनमधील मालाची किंमत ११ टक्के महाग आहे. त्यामुळे भारतात निर्मित वस्तूंची मागणी वाढत आहे व भारतात रोजगार वाढतो आहे. काही वर्षांतच भारतीय अर्थव्यवस्था प्रथम क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊ शकते.

२०१४ पूर्वी काँग्रेस शासनाने नेहमी शस्त्रात्रे बाहेरदेशातूनच खरेदी करणे पसंत केले व दलालीद्वारे करोडो-अब्जो रुपये भ्रष्ट लोकांनी कमावले. पण २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकार स्थापन केल्यावर, 'मेक इन इंडिया' उपक्रम राबवला. भारतात माल विकायचा असेल तर त्या मालाची निर्मिती भारतातच करावी लागेल, अशी विदेशी कंपन्यांना ताकीद दिली. सोबतच त्या कंपन्यांना भारतात कारखाने काढण्यासाठी सोयी उपलब्ध करून दिल्या. यामुळे भारतीय तरुणांना रोजगार मिळाला. देशात हजारो नवीन कारखाने सुरू झाले व होत आहेत. देशात जीएसटी सुरू करून सरकारचे उत्पन्न वाढवले; ज्यामुळे देशासाठी आधुनिक शस्त्र निर्मिती व खरेदी शक्य झाली. मोदीजींनी केलेल्या अशा शेकडो सुधारणांमुळे व भ्रष्टाचारी कमाईचे काही मार्ग बंद झाल्यामुळे देशद्रोही भ्रष्टराजनेते चिडलेले आहेत. त्यांनीच पूर्वी संविधानात अनेक देशविरोधी बदल करून हिंदूंचे हक्क हिसकावले. आता बळजबरीने अराजकता माजवून सत्ता हस्तगत करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

राष्ट्रीय स्तरावर प्रसंगावधान हवंय

कठीण क्षणी योग्य व नेमकी कृती अचूक करण्याची क्षमता म्हणजे प्रसंगावधान! अखंड सावधानता असेल, तरच ते साधेल! तेव्हाच मिळेल अपेक्षित यश किंवा संकटातून मुक्ती! आज राष्ट्रीय स्तरावर सर्व हिंदूंनी असेच प्रसंगावधान ठेवण्याची वेळ येऊन ठेपली आहे. देवळांच्या उत्पन्नावर हिंदूंचे शत्रू पोसले आहेत. शत्रूने खूप शिस्तबद्ध व कावेबाजपणे हिंदूंची घरे व व्यापार हस्तगत केले. जेथे हिंदूंची संख्या कमी झाली, तेथील हिंदूंना पलायन करावे लागतेय. दारावर व बाजारात मिळणारी भाजी, फळे, रस्त्यावरील, फूटपाथवरील खाद्यपदार्थांची दुकाने यात घातक रसायने मिसळून लोकांना वांझ व आजारी करताहेत. हायवेवर वाहनात मुद्दाम जास्त हवा भरून, रेल्वेच्या रुळावर स्फोटके ठेवून अपघातांमुळे जास्तीत जास्त हिंदू मरतील, असे प्रयत्न केले जात आहेत. मिरवणुकी व शोभायात्रांवर दगडफेक व हल्ले होत आहेत. हिंदूंच्याच देशात देवळात सुरक्षा व्यवस्था ठेवावी लागतेय. पण चर्च, मशीद व त्यांच्या मिरवणुकी यांना मात्र सुरक्षेची गरज नाही. मग सावध राहण्याची गरज कुणाला आहे? आपल्याला आहे! हिंदू वस्ती, व्यापार व देवळे यांना शक्तिस्थाने बनवा. यात्रास्थळांवर हॉटेल, हॉस्पिटल, दुकानदार, वाहनचालक हे हिंदूच आहेत, याची खात्री करा.

प्रसंगावधानता वाढवण्यासाठी...

१. ध्येयपूर्तीसाठी आवश्यक ज्ञान व तयारी : ध्येयाबद्दल, कार्याबद्दल पूर्ण ज्ञान असावे. ते कसे पूर्ण करता येईल? काय काय पूर्वतयारी असावी? ध्येयपूर्तीसाठी आपण सक्षम आहोत का? ध्येयपूर्तीच्या दृष्टीने आपल्या वेळेच्या, संसाधनांच्या व साधनांच्या मर्यादा कोणत्या आहेत? ध्येयपूर्तीमध्ये कोणते अडथळे येऊ शकतात? कुणाशी स्पर्धा आहे? स्पर्धकांची शक्तिस्थाने व कमजोरी कोणती? स्पर्धा कशी जिंकता येईल? कुठल्या कमजोरीला विशिष्ट परिस्थितीत परिवर्तित करता येईल? कोणत्या कामासाठी कोणत्या व्यक्तीचा व कसा उपयोग होऊ शकतो? या व अशा अनेक मुद्यांवर सखोल विचारमंथन केलेलं असावं आणि ध्येयाशी पूर्ण समर्पित राहिल्यामुळे या सगळ्या गोष्टींचे मनात सतत भान असायलाच हवे. तेव्हाच नेमक्या वेळी काय आणि कसं करायचं ते सुचतं म्हणजेच प्रसंगावधान राखता येतं.

२. जिद्द, ध्येय-समर्पितता, प्राथमिकता: जगात जिद्द असल्याशिवाय कुठलेच कार्य पूर्णत्वाला जात नाही. कुठल्याही कार्यासाठी कधीच परफेक्ट किंवा आदर्श वेळ नसते. जिद्दीनेच परिस्थिती बदलावी लागते. कम्फर्ट झोन, आळस सोडावा लागतो. प्रत्येक गोष्ट प्रत्येक वेळी हवीच किंवा मिळेलच, याची खात्री देता येत नाही तसेच वेळेनुसार गरजा व प्राथमिकता बदलतात. पण ज्या व्यक्ती प्राथमिकता नीट समजून घेत नाहीत व कोणत्या वेळी कशाला प्राथमिकता द्यायला हवी ते कळत नाही किंवा कळूनही वळत नाही त्यांना यश हुलकावण्या देत राहतं. प्रसंगावधानता अंगी बाणण्यासाठी योग्यवेळी किंवा अगदी नेमक्या क्षणाला बिनचूक नेमके कार्य किंवा निर्णय घेऊन तो निर्णय क्षणात अंमलात आणता यायला हवा. पण अशी क्षमता अपघाताने तयार होत नसते. त्यासाठी आपल्या मनात सदैव ध्येयाबद्दल संपूर्ण समर्पितता हवी. मनाने व शरीराने आळसाचा, ध्येयापासून दूर नेणाऱ्या गोष्टींचा त्याग करून आपले मन, शारीरिक शक्ती, वेळ, संसाधने, साधने फक्त आणि फक्त आपल्या ध्येयावरच केंद्रित व्हायला हव्यात. मग त्यासाठी गरज पडल्यास आपले पूर्वग्रह, अहंकार-गर्व, दुराभिमान, वैयक्तिक मतभेद, मोह या सगळ्या गोष्टी बाजूला सारून ध्येयकेंद्रित कृती करण्यासाठी जो सदैव तयार असेल फक्त त्यालाच प्रसंगावधान राखण्याची क्षमता विकसित करता येते.

३. निरीक्षण, विश्लेषण व आकलन शक्ती : कुठल्याक्षणी किंवा कुठल्या परिस्थितीत काय करायचे हे फक्त तेव्हाच करता येईल जेव्हा आपल्या समोरच्या परिस्थितीचे आकलन करता येईल आणि योग्य आकलन करण्यासाठी प्राप्त परिस्थितीचे सखोल निरीक्षण करणे अत्यावश्यक आहे.

४. अचूक निर्णय क्षमता : परिस्थितीचे आकलन झाल्यावर त्यानुरूप वेळेच्या मर्यादेतच निर्णय घेता आला पाहिजे. अचूक निर्णय घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांचा अभ्यास करून सर्वोत्तम पर्याय निवडणे व त्यानुसार निर्णय घेणे अशी कृतिमालिका आहे. परिस्थितीचे योग्य आकलन, व्यक्तिमत्त्व विकास आणि अनुभवाच्या जोरावर अचूक निर्णय क्षमता व प्रसंगावधानता विकसित होत जाते.

५. कृतिशीलता : वरील चारही बाबतीत योग्य क्षमता विकसित झाल्यावर कृतिशील व्यक्ती अनुभवाच्या आधारे प्रसंगावधान राखतो. 'उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः। न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।।' हरीण स्वत:हून कधी सिंहाच्या जबड्यात आपली मान देत नसते तसेच फक्त कृतीनेच इच्छा पूर्ण होतात. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



विठुच्या भक्तीत । द्वैत डोले ।।

येऊ भक्ती भावे । नाम विठोबाचे ।।
हरिपाठ वाचे । नित्य गाऊ ।।१।।

पूर्व संचिताने । पुण्य साठवले ।।
त्यास आठवले । हरिनाम ।।२।।

ऐकोनिया वाणी । संतसज्जनांची ।।
गोडी अभंगाची । जीवा लागे ।।३।।

वैष्णवांची दिंडी । पंढरीच्या वाटे ।।
नामघोष उठे । अंतरात ।।४।।

टाळ-मृदुंगाचे । साधता अद्वैत ।।
विठुच्या भक्तीत । मन डोले ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

माय माझे...

अलंकृत रूप सुंदर पाहू दे निरंतर
देऊ नको अंतर माय माझे...
तूच माय तूच बाप तूच गीत माय माझे...
काळाचे वरवंटे
नशीब करंटे रूप ओखटे माय माझे...
तुझे वांड लेकरू नको दूर करू
आशा कुस्करू माय माझे...
दूर शिव थकला जीव करी कीव माय माझे...
येऊ दे करुणा
वर्षवी दयायना हा भावभीना माय माझे...
हाती धर कृपा कर ओटी भर माय माझे...
विलाप वृथा झाला आता
टेकता माथा माय माझे...
संपला वाद मिळता प्रसाद घेते
आस्वाद माय माझे...
जळो भिक्षापात्र मिळो कृपा छत्र
गेही अहोरात्र माय माझे...

शैलजा जोशी

सूर...

गवसत नाही साऱ्यांना
आयुष्यात सूर....
राहून जाते स्वप्न अनेकांचे
किती तरी योजने दूर....
प्रारब्धच्या कठोरपणामुळे येतो
अश्रूचा पूर वाढून जाते
अस्वस्थता जाते माजून काहूर....
जीवन शेवटी उडून जाणारे
कापूर काहींचे सार्थकी लागणारे
तर काहींना दाह देऊन जाणारे भरपूर

केयुर देवगडे

सेवा क्षेत्र, कोट्यधीशांची चलती

अर्थोद्योग
महेश देशपांडे

सध्या विविध क्षेत्रांमधील आर्थिक घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यासंदर्भातल्या बातम्या ऐकायला मिळत असतानाच सेवा क्षेत्र उलाढालीचा विक्रम करण्याची शक्यता पाहायला मिळत आहे. दरम्यान, देशातील कोट्यधीशांची संपत्ती अनेक देशांच्या जीडीपीपेक्षाही जास्त असल्याची माहिती पुढे आली आहे. याच सुमारास महागाई नियंत्रणात असल्याचा दावा सरकारने केला आहे.

सध्या विविध क्षेत्रांमधील आर्थिक घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यासंदर्भातल्या बातम्या ऐकायला मिळत असतानाच सेवा क्षेत्र उलाढालीचा विक्रम करण्याची शक्यता पाहायला मिळत आहे. दरम्यान, देशातील कोट्यधीशांची संपत्ती अनेक देशांच्या जीडीपीपेक्षाही जास्त असल्याची माहिती पुढे आली आहे. याच सुमारास महागाई नियंत्रणात असल्याचा दावा सरकारने केला आहे.

भारतातील सेवा क्षेत्र पुढील काही वर्षांमध्ये विक्रम करू शकते. त्यासाठी सरकारने तयारी केली आहे. यासाठी सरकारने ८३.७८ लाख कोटी रुपयांची योजनाही तयार केली आहे. सरकारने २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर म्हणजेच ८३.७८ लाख कोटी रुपये निर्यातीचे लक्ष्य ठेवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देशाच्या निर्यातीमध्ये ऑगस्ट महिन्यात सलग दुसऱ्या महिन्यात घसरण झाली आहे. या कालावधीमध्ये निर्यात ९.३ टक्क्यांनी घसरून ३४.७१ अब्ज डॉलर झाली तर व्यापार तूट १० महिन्यांच्या सर्वोच्च पातळीवर म्हणजेच २९.६५ अब्ज डॉलरवर गेली आहे.

दुसऱ्या बाजूला ८३.७८ लाख कोटी रुपयांचे निर्यातीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी सरकारने योजना आखली आहे. देशातून सेवा क्षेत्राची निर्यात वाढविण्यासाठी वाणिज्य मंत्रालय १२ प्रमुख क्षेत्रांवर अधिक लक्ष देण्याची योजना आखत आहे. यामुळे एकूण निर्यातीचे आकडे सुधारण्यास मदत होणार आहे. वाणिज्य सचिव सुनील बर्थवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत सेवा क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. सरकारचे १२ सेवा क्षेत्रांकडे विशेष लक्ष आहे. सेवा निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान (आयटी), पर्यटन, आरोग्य सेवा, शिक्षण, वाहतूक, लेखा आणि बांधकाम आणि अभियांत्रिकी सेवांचा समावेश आहे. सरकारने २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्सच्या वस्तू आणि सेवा निर्यात करण्याचे लक्ष्य समोर ठेवले आहे. हे साध्य करण्यात सेवा निर्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. जागतिक संघर्षांचा या क्षेत्रावर होतो तितका परिणाम मालावर होत नाही; किंबहुना सध्याच्या जागतिक परिस्थितीत देशाच्या वस्तू निर्यातीवर नकारात्मक परिणाम होत आहे. जागतिक आर्थिक अनिश्चिततेमुळे देशाच्या निर्यातीमध्ये ऑगस्टमध्ये १३ द्यमहिन्यांमधील सर्वात मोठी घसरण नोंदविली गेली. या कालावधीमध्ये निर्यात ९.३ टक्क्यांनी घसरून ३४.७१ अब्ज डॉलर झाली आहे. व्यापार तूट २९.६५ अब्ज डॉलरवर गेली आहे. ती १० महिन्यांच्या सर्वोच्च पातळीवर आहे. वाणिज्य मंत्रालयाने मंगळवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार सोने आणि चांदीच्या आयातीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे देशाची आयात ३.३ टक्क्यांनी वाढून ६४.३६ अब्ज डॉलरच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचली आहे.

दरम्यान, येत्या काळात भारताच्या निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार असल्याचे सांगितले जाते. याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होणार असून विकासाला चालना मिळणार आहे. याच सुमारास भारतातील करोडपतींच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये वार्षिक १० कोटी रुपयांहून अधिक कमाई करणाऱ्या भारतीयांच्या संख्येत ६३ टक्क्यांची वाढ झाली आहे. 'सेंट्रम इन्स्टिट्यूशनल रिसर्च'ने आपल्या एका अहवालात याबाबत माहिती दिली आहे. अहवालानुसार वार्षिक पाच कोटी रुपयांहून अधिक कमाई करणाऱ्यांची संख्या ४९ टक्क्यांनी वाढून ५८ हजार २०० झाली आहे. जगातील अनेक देशांच्या जीडीपीपेक्षा या कोट्यधीशांची संपत्ती जास्त आहे. 'सेंट्रम इन्स्टिट्यूशनल रिसर्च'च्या या अहवालानुसार, गेल्या पाच वर्षांमध्ये वार्षिक १० कोटी रुपयांहून अधिक कमाई करणाऱ्यांची संख्या ६३ टक्क्यांनी वाढली आहे. या अहवालात सांगण्यात आले आहे की, देशात ३१ हजार ८०० लोक वार्षिक १० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमावत आहेत. 'सेंट्रम इन्स्टिट्यूशनल रिसर्च'नुसार वार्षिक ५० लाखांपेक्षा जास्त कमावणाऱ्या भारतीयांच्या संख्येत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वार्षिक ५० लाखांपेक्षा जास्त कमाई करणाऱ्यांच्या श्रेणीमध्ये सुमारे १० लाख लोक येतात. अहवालानुसार, २०१८-१९ ते २०२३-२४ या काळात वार्षिक १० कोटी रुपयांपेक्षा अधिक कमाई करणाऱ्यांची संख्या १२१ टक्क्यांनी वाढली आहे आणि अशा लोकांची एकूण संपत्ती ३८ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. वार्षिक पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक कमाई करणाऱ्या लोकांची संख्या दरवर्षी १०६ टक्क्यांनी वाढली आहे आणि या श्रेणीत येणाऱ्या लोकांची एकूण संपत्ती ४० लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. वार्षिक ५० लाख रुपयांपेक्षा जास्त कमाई करणाऱ्या लोकांच्या संख्येमध्ये ६४ टक्क्यांनी वाढ झाली असून पाच वर्षांमध्ये त्यांची संपत्ती ४९ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. भारतातील उच्च नेट वर्थ व्यक्ती आणि अल्ट्रा हाय नेट वर्थ व्यक्तींची एकूण आर्थिक मालमत्ता २०२३ पर्यंत १.२ ट्रिलियन डॉलरवरून २०२८ पर्यंत २.२ ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढेल. २०२३-२०२८ दरम्यान या श्रेणीतील लोकांच्या संपत्तीमध्ये १३ ते १४ टक्के वार्षिक वाढ होईल, असा अंदाज अहवालात सांगितला आहे. लोकांच्या उत्पन्नामध्ये एवढी मोठी वाढ होऊनही केवळ १५ टक्के संपत्ती व्यावसायिकांकडून सांभाळली जाते तर विकसित देशांमध्ये ही संख्या ७५ टक्के आहे. दरम्यान, एका बाजूला श्रीमंत लोकांची संख्या वाढत असतानाच दुसऱ्या बाजूला देशातील गरीब लोकांच्या संख्येतही वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे गरीब- श्रीमंत दरी वाढत आहे. गरीब अधिक गरीब होत आहेत तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. या बरकतीच्या बातम्या एकीकडे लक्ष वेधून घेत असतानाच सरकारचा महागाई नियंत्रणाचा दावा महत्त्वाचा ठरला आहे. भारतात आता सणासुदीचा हंगाम सुरू होणार आहे. या काळात महागाई वाढू नये, म्हणून सरकार प्रयत्न करत आहे.

अलिकडेच सरकारने खाद्यतेल आणि इतर वस्तूंवरील सीमा शुल्क वाढविण्याचा निर्णय घेतल्याने महागाईमध्ये वाढ झाली होती; मात्र सणासुदीच्या काळात महागाई नियंत्रणात राहील, म्हणजेच देशातील सर्वसामान्यांवर बोजा वाढणार नसल्याचा दावा सरकारने केला आहे. त्यासाठी कमॉडिटी उत्पादनांचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या आणि व्यापाऱ्यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. सणासुदीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढणार नसून गहू, तांदूळ, साखर आणि खाद्यतेलाच्या किमती नियंत्रणात ठेवल्या जातील, असा दावा सरकारने केला आहे. उल्लेखनीय आहे की, अलिकडेच सरकारने खाद्यतेलांवरील आयात शुल्कात वाढ केली आहे. त्यामुळे त्यांच्या किमती वाढण्याची शक्यता बळावली आहे; पण गहू, तांदूळ, साखर आणि खाद्यतेलाच्या किमती नियंत्रणात असल्याचा अन्न ग्राहक मंत्रालयाचा दावा आहे. मंत्रालयाकडून सांगण्यात आले की, खाद्यतेल कंपन्यांनी तत्काळ किमती वाढवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नुकतेच कच्च्या आणि शुद्ध तेलावरील सीमा शुल्क वाढवले.अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत सीमा शुल्कात बदल केल्यानंतर नवीन दर १४ सप्टेंबर २०२४ पासून लागू करण्यात आले आहेत. क्रूडवर बेसिक कस्टम ड्युटी ०-२० टक्के आहे तर रिफाइंड तेलावर १२.५-३२.५ टक्के आहे. मूळ सीमा शुल्कात वाढ केल्यानंतर आता क्रूड ऑईल आणि रिफाइंड ऑईलवरील प्रभावी ड्युटी अनुक्रमे ५.५ टक्क्यांवरून २७.५ टक्के आणि १३.७५ टक्क्यांवरून ३५.७५ टक्के होईल. या उत्पादनांचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या आणि व्यापाऱ्यांना किमती वाढवू नयेत, असे निर्देश देण्यात आल्याचे मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे.

सरकारच्या म्हणण्यानुसार उद्योगात ३० लाख टन खाद्यतेल शून्य शुल्कावर आयात केले जाते. ते ४५ ते ५० दिवसांच्या घरगुती वापरासाठी पुरेसे आहे. केंद्र सरकारने खाद्यतेल संघांना मूळ ० टक्के आणि १२.५ टक्के सीमाशुल्कात आयात केलेल्या खाद्यतेलाचा साठा उपलब्ध होईपर्यंत तेलाची किरकोळ विक्री किंमत स्थिर ठेवण्याचा सल्ला दिला होता. दरम्यान, सरकार गहू खुल्या बाजारात विकणार नाही. सध्या व्यापाऱ्यांकडे १०० लाख टन गहू उपलब्ध आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक धोकादायक बनत आहे. अलिकडे पुन्हा एकवार करण्यात आलेल्या हल्ल्यातून डोनाल्ड ट्रम्प बचावले असले, तरी देशातील धोकादायक वातावरण उघड झाले आहे. दुसरीकडे अध्यक्षीय वादविवादानंतर मजबूत नेत्या म्हणून कमला हॅरिस यांची प्रतिमा उदयास आली आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कोण बाजी मारणार, याची उत्कंठता वाढली आहे

परराष्ट्रकारण

अजय तिवारी

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक नेहमीच अनागोंदीने भरलेली असते. यंदाची निवडणूक तर आणखी गोंधळाची बनली आहे. रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट्सने अमेरिकेची विभागणी केल्यामुळे ५ नोव्हेंबर रोजी होणारी महत्त्वपूर्ण निवडणूक आता 'स्विंग स्टेट्स'वर अवलंबून आहे. त्यामुळे ही निवडणूक जास्त चुरशीची होण्याची शक्यता आहे. आता अशी शक्यता आहे की, 'स्विंग स्टेट्स' जिंकेल तो देशाचा पुढचा अध्यक्ष होईल; परंतु ट्रम्प यांचा एकूण स्वभाव लक्षात घेता आणि कमला हॅरिस यांना मतदारांचा मिळत असलेला प्रतिसाद पाहता ते पराभव सहन करू शकतील का? या राज्यांमध्येच ट्रम्प यांची टीम निवडणूक लढवण्याची आणि हॅरिस यांचा विजय अवैध ठरवण्याची तयारी करत असल्याची भीती वाढत आहे. त्याचे अनेक पुरावे सापडले आहेत. रिपब्लिकन वापरत असलेल्या अनेक घाणेरड्या युक्त्यांपैकी ही एक आहे.

चर्चेपूर्वी ट्रम्प यांनी हॅरिस यांच्या विरोधात प्रभावी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी शर्यतीतून माघार घेतल्यानंतर हॅरिस यांनी लोकशाही मोहिमेला चैतन्य दिले. त्या लोकांच्या नजरेत राहण्याचा आटोकाट प्रयत्न करत असताना ट्रम्प यांनी त्यांच्यावर भयंकर वैयक्तिक हल्ले सुरू केले आणि धोरणावर लक्ष केंद्रित करण्याच्या त्यांच्या सहायकांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले. ही चूक त्यांनी गेल्या वेळीही केली होती. वादविवादाच्या वेळी ट्रम्प यांनी हॅरिस यांच्यावर वैयक्तिक हल्ले केले, तर हॅरिस यांनी ट्रम्प यांच्या कमकुवतपणावर हल्ला केला. त्यामुळे ट्रम्प अनेक वेळा विचलित झाले. ट्रम्प हे त्यांच्या विरोधकांबद्दल वैयक्तिक टिप्पण्या करण्यासाठी अनेक वर्षांपासून ओळखले जातात. त्यांच्या अनेक समर्थकांच्या मते हॅरिस यांच्यावरील हल्ल्यामध्ये त्यांनी अनेक मर्यादा ओलांडल्या आहेत. अध्यक्षपदाच्या शर्यतीमध्ये ट्रम्प आता वंशवादावर उतरले आहेत.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मर्यादाभंग करताना ट्रम्प यांनी कृष्णवर्णीय पत्रकारांच्या परिषदेत म्हटले की, हॅरिस काळ्या आहेत, हे मला माहीत नव्हते आणि आता ती कृष्णवर्णीय म्हणून ओळखली जात आहे. ती भारतीय वर्णाची आहे. त्यांच्या या टिप्पण्या आक्षेपार्ह आहेत. त्यांची टीका तमाम भारतीयांना नाराज करणारी आहे, हे वेगळे सांगायला नको. ट्रम्प निवडणूक जिंकण्यासाठी वांशिक टिप्पण्यांचा आधार घेत आहेत. यावरून त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे असा होतो. देशाचे पहिले कृष्णवर्णीय अध्यक्ष बराक ओबामा यांचा जन्म अमेरिकेत झाला नसल्याचा खोटा आरोप करण्याचा ट्रम्प यांचा वर्णद्वेषाचा मोठा आणि घृणास्पद इतिहास आहे. आता ते हॅरिस यांच्यावरही अशीच टिप्पणी करीत आहेत. ट्रम्प यांनी आठ वर्षांपूर्वीच्या निवडणुकीत अध्यक्षपदाच्या तत्कालीन उमेदवार हिलरी क्लिंटन यांच्यावरही बेफाम आरोप केले होते. चुकीच्या लैंगिकतावादी आरोपांच्या मागील रेकॉर्डची पुनरावृत्ती करून ट्रम्प यांनी तेच विधान पुन्हा पोस्ट केले. प्रतिस्पर्ध्यावर चुकीचे हल्ले करण्याची गेल्या १० दिवसांमधली त्यांची ही दुसरी वेळ. ती अशोभनीय आणि निषेधार्ह आहे.

अमेरिकनांना वांशिक टिप्पणी आणि लैंगिक हल्ले आवडत नाहीत. हॅरिस यांच्यावर वांशिक आणि लैंगिक हल्ला करणारे ट्रम्प एकटे नाहीत. त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळविल्यानंतर काही वेळातच इंटरनेटवर त्यांच्याबद्दलच्या चुकीच्या आणि लैंगिकतावादी कथांचा एक ऑनलाईन स्फोट झाला. त्यापैकी बरेच खोटे होते, हे सिद्ध झाले आहे. काही 'सोशल मीडिया' पोस्टमध्ये हॅरिस यांचे सॅन फ्रान्सिस्कोचे माजी महापौर विली ब्राऊन यांच्याशी संबंध होते, असे म्हटले गेले. हा आरोप अनेक पुराणम तवादी प्रभावकर्त्यांनी पुन्हा जागृत केला. त्यांनी हॅरिस यांचा एक मॉर्फ केलेला फोटो इन्स्टाग्रामवर पोस्ट केला. त्यात त्यांना बदनाम फायनान्सर आणि दोषी लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टाईनसोबत दाखवण्यात आले. बहुतेक चुकीच्या माहितीमध्ये लैंगिक ट्रोल्सच नाही, तर खोट्या ट्रान्सफोबिक लेखांचाही समावेश आहे. २०२० मध्ये अमेरिकन सनलाईट प्रोजेक्टच्या सहसंस्थापक, डिसइन्फॉर्मेशन वॉचडॉग, नीना जॅन्कोविझ यांनी केलेल्या एका अभ्यासात नमूद केले आहे की, निवडणुकीदरम्यान १३ महिला राजकारण्यांवर हल्ले करणारी 'लिंगभेद आणि विकृत माहिती'ची ३ लाख ३६ हजारांहून अधिक प्रकरणे नोंदविली गेली. यापैकी सुमारे ७८ टक्के प्रकरणे हॅरिस यांच्यासंबंधी आहेत. मागील निवडणुकीत ट्रम्प यांनी निवडणूक निकाल स्वीकारण्यास नकार दिला होता आणि त्यांच्या चिथावणीनंतरच समर्थकांनी अमेरिकन संसदेवर हल्ला केला. यावेळीही चर्चेदरम्यान ट्रम्प यांनी कॅपिटल हिलवरील हल्ल्याचा बचाव केला. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा पुराव्याशिवाय ठामपणे सांगितले की, गैरप्रकार करून निवडणूक जिंकण्यात आली. कॅपिटलवर हल्ला करणाऱ्या हिंसक जमावाचा त्यांनी बचाव केला. ट्रम्प यांनी स्प्रिंगफील्ड, ओहायो येथे हैतीयन स्थलांतरितांवर पाळीव प्राणी मारल्याचा आणि खाल्ल्याचा घृणास्पद आरोप केला. याबाबत पुरावा मागितला असता 'मी ते टेलिव्हिजनवर पाहिले' असे बेजबाबदार उत्तर ट्रम्प यांनी दिले. टीव्हीवरील ताज्या वादामध्ये एक मजबूत नेता म्हणून हॅरिस यांची प्रतिमा उदयाला आली आहे, तर ट्रम्प पूर्णपणे नकारात्मक आणि उदास दिसत होते. त्यामुळे संपूर्ण रिपब्लिकन पक्षात नाराजी आणि उदासीनता आहे.वादविवादानंतर घेतलेल्या मतचाचण्यांमध्ये ट्रम्प लक्षणीयरीत्या मागे पडू लागले आहेत. त्यामुळे रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक पक्षाचा प्रभाव असणाऱ्या राज्यांमध्ये फेरविभागणी झाली आहे. हॅरिस यांचा संभाव्य विजय कमकुवत करण्याच्या प्रयत्नात ट्रम्प यांची टीम निकालांना आव्हान देऊ शकते, अशी चिंता वाढत आहे. अध्यक्षपदाची निवडणूक जवळ येत असताना हॅरिस यांच्याविरोधात खोटे बोलण्यासाठी ट्रम्प यांची टीम तयार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ॲलन मस्कचे ट्विटर यामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मस्क हे ट्रम्प यांची पूजा करत आहेत. ट्रम्प आणि त्यांचे समर्थक हॅरिस यांच्याकडून पराभव सहन करू शकतील का, हीच सर्वात मोठी शंका आहे. बेलगाम बंदुका असलेल्या अमेरिकेत आजघडीला ध्रुवीकरण शिगेला पोहोचले आहे, ते गृहयुद्धाला कारणीभूत ठरू शकते, यात शंका नाही.

अमेरिकेत ५ नोव्हेंबरला होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी ताज्या सर्वेक्षणाचे निकाल समोर आले आहेत. सर्वेक्षणानुसार, ट्रम्प आणि हॅरिस यांच्यात कोण कोणाला आणि किती प्रमाणात मागे टाकत आहे, हे जाणून घेणे खूप मनोरंजक आहे. सर्वेक्षणामध्ये हॅरिस यांना ४७ टक्के तर ट्रम्प यांना ४२ टक्के मतदारांचा पाठिंबा असल्याचे दिसते. नोंदणीकृत मतदारांमध्ये केलेल्या या दोन दिवसीय सर्वेक्षणात हॅरिस यांना पाच टक्के गुणांची आघाडी मिळत असल्याचे दिसते. अध्यक्षीय वादविवाद ऐकणाऱ्यांपैकी ५३ टक्के लोकांनी हॅरिस जिंकतील, असे म्हटले तर २४ टक्के लोकांनी ट्रम्प जिंकतील, असे म्हटले आहे. ५९ वर्षीय हॅरिस यांनी ७८ वर्षीय ट्रम्प यांना अध्यक्षपदाच्या लढाईपूर्वी झालेल्या वादात बचावात्मक पवित्र्यात ढकलले आहे. डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन यांच्याकडून आलेल्या प्रतिक्रियांनुसार वारे कोणत्या दिशेने वाहात आहे, हेही स्पष्ट झाले आहे. ५३ टक्के रिपब्लिकनांनी ट्रम्प यांनी सरशी वर्तविली आहे तर ९१ टक्के डेमोक्रॅट्सनी हॅरिस यांच्या विजयाची शक्यता व्यक्त केली. अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये अशा काही गोष्टी घडत आहेत, ज्याचा आधुनिक काळात विचारही केला जात नव्हता. निवडणुका जवळ येत आहेत, तसतसे प्रचारातील विष वाढत आहे. ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा हल्ला करण्याचा प्रयत्न झाला आहे. ट्रम्प यांचा प्रचार आणि त्यांचे भाषण याला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. त्यांनी अमेरिकन समाजाला मित्र आणि शत्रूमध्ये विभागले आहे. आपल्या सोबत असणारा अमेरिकेचा मित्र आहे तर विरोधात असणारा अमेरिकेचा शत्रू आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. यापूर्वी अमेरिकन निवडणुकांमध्ये असा विचार कधीच पाहायला मिळाला नव्हता.

पान १ वरून

आईचा जोगवा मागेन...

जो समाज आई जगदंबेची पूजा करतो, तिच्यासाठी मोठमोठे मंडप उभारतो, नऊ दिवस विविध कार्यक्रमांच्या साजरीकरणातून उत्सवी वातावरण निर्माण करतो; तोच समाज महिलांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देताना कोणतीही शरम बाळगत नाही.

आजही पुरुषी वर्चस्वाचा विचार प्रमाण मानणारी अनेक घरं आहेत. त्या घरांमध्ये आजही महिलांचा आवाज दडपला जातो. तिथे त्यांचं कार्यक्षेत्र विस्तारणार नाही, याची काळजी घेतली जाते. महिलांचा मानसन्मान नाकारणारी, त्यांचं अवकाश नाकारणारी, त्यांना प्रगतीच्या संधींपासून वंचित ठेवणारी अशी अनेक घरं आजही नवरात्रौत्सव अतिशय भक्तिभावाने साजरा करतात, पण घरातल्या स्त्रियांचे हुंदके मात्र त्यांच्या कानी पडू शकत नाहीत. महिलांमधलं कौशल्य, बुद्धिमत्ता त्यांच्या झापडबंद डोळ्यांना दिसू शकत नाही. आजही अशा काही घरांमध्ये मुलीचा जन्म नाकारला जातो. खरं तर अशांना आदिमायाशक्तीची भक्ती करण्याचा हक्कही नाकारायला हवा. मात्र ते होत नाही आणि ही धेंडं अशीच जगत राहतात, स्त्रीशक्तीला पायदळी तुडवत राहतात. प्रत्येक देवतेने निर्बलांना बल दिल्याचं आणि खलांचा नि:पात केल्याचं आपल्या पौराणिक कथा सांगतात. देवीनेही सलग नऊ दिवस, नऊ रात्री चाललेल्या युद्धात महिषासुराचा वध केल्याची कथा आपण ऐकतो. पण आज किती महिलांमध्ये हे बळ आहे? आजही अनेक जणी अत्याचाराच्या बळी ठरतात. आजही तिला तिच्या न्याय्य हक्कांसाठी लढा द्यावा लागतो. प्रत्येक वेळी स्वत:ला सिद्ध करावं लागतं. अग्निदिव्य केवळ तिच्यासाठीच असतं, अग्निपरीक्षा तिचीच असते. बाहेर कितीही कर्तृत्व गाजवलं तरी तिला घरात सन्मानाची वागणूक मिळेल, याची खात्री नसते. असं असताना हा उत्सव साजरा करण्यापूर्वी समाजाला आरसा दाखवण्याची नितांत गरज असल्याचं जाणवतं. स्त्रीशक्तीची, तिच्या प्रतिमांची पूजा करण्याआधी प्रत्यक्षातल्या स्त्रीशक्तीचा सन्मान होईल तेव्हाच समाज खऱ्या अर्थानं तिचा उपासक होऊ शकेल.

... तर होईल शक्तीची पूजा

नवीन विचार मांडणारे, महिलांच्या भूमिकेतून लिहिले जाणारे चित्रपट बनत असले, तरी त्याचं प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळेच असे विचार अधिक संख्येने पुढे येण्याची इच्छाही या सणाच्या निमित्ताने व्यक्त होते. आयुष्यात स्त्रीचं स्थान काय आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. फक्त आता समाजाने ते मान्य करावं आणि त्यांना सन्मान द्यावा, इतकंच. समानतेचा हा एकच विचार स्त्रियांची स्थिती बदलू शकतो, असं खात्रीने वाटतं. घरात, कामाच्या ठिकाणी वा समाजात वावरताना तिला समान स्थान मिळायलाच हवं. घरातली सगळी जबाबदारी पती-पत्नीनं विभागून घेतली तर प्रत्येक स्त्रीचं जगणं सोपं होईल, यात शंका नाही.याची काही उदाहरणं आपल्या आजूबाजूला पाहायला मिळणं ही अत्यंत सकारात्मक आणि आशादायी बाब आहे. महिलांपुढे अशा अनेक समस्या आहेत. म्हणूनच एका वर्गातल्या महिलांच्या जगण्याचा स्तर बदलला म्हणून समाधानी न होता सगळ्यांच्याच जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी कार्यरत होण्याची गरज या सणाच्या निमित्ताने ओळखायला हवी. आज स्त्रियांना आपल्या समस्यांची जाणीव आहे. त्याविरुद्ध संघर्ष करण्याचा, योग्य त्या ठिकाणी आपली कैफियत मांडण्याचा विचार त्यांच्या ठायी आहे. फक्त त्यांच्या विचारांचा आदर करण्याची आणि कृतीला वाव मिळण्याची गरज आहे. आपल्या समाजाने स्त्रियांच्या या समस्यांचाही विचार करायला हवा. तिला आदराचं आणि सुरक्षित स्थान द्यायला हवं; हीच खरी दुर्गापूजा आहे असं नाही का वाटतं...?

चिनी सीमेवरील धुमसणारी शांतता!

भारताला स्वसंरक्षणाच्या दृष्टीने आणि चीनला आक्रमणाच्या दृष्टीने, या दोन स्थानांवर वरचष्मा ठेवणे गरजेचे वाटते. याशिवाय, गेल्या काही महिन्यांत चीनने पूर्व क्षेत्रात म्हणजेच सिक्कीम व अरुणाचल प्रदेश येथील सरहद्दीत नव्याने ९० हजार सैन्य तैनात केले आहे. चीनची सध्या चारी बाजूंनी कोंडी झाली आहे. बलुचिस्तानात पुन्हा एकदा बंडाळीसदृश वातावरण निर्माण झाले असून, तेथे बलुची टोळ्यांनी पाकिस्तानी सैनिकांचे हत्याकांड केले आहे. पाकिस्तानने चीनला आंदण दिलेले अरबी समुद्रावरील ग्वादर हे बंदर बलुचिस्तानातच आहे. या बंदराला एका महामार्गाने चीनशी थेट जोडले आहे. तेथूनच चीनमधील माल अरबी समुद्राद्वारे युरोपला जातो. त्यावर जर बलुची टोळ्यांनी ताबा बसविला, तर चीनला युरोपपर्यंत माल पाठविणे अशक्य होईल. तसेच, पख्तुनख्वा खोर्यावर तालिबानचा डोळा असून, तेथील परिस्थिती ही नेहमीच अस्थिर आणि धोकादायक असते. हा महामार्ग याच खोर्यातून जातो. दुसरीकडे भारत चीनच्या दादागिरीपुढे झुकत नसून, मोदी सरकारने चीनवर अनेक व्यापारी निर्बंधही लागू केले आहेत. दक्षिण चीन समुद्रातील तैवानचा घास घेण्यास चीन आसुसलेला असला, तरी त्याला साधा हातही लावणे शक्य होत नाहीये. अमेरिकेच्या एका आरमारी डिव्हिजनने आपला नांगर तैवानजवळ टाकला आहे. कोविडच्या उद्रेकापासून चीनबाबत अनेक देशांनी सावधगिरीचे धोरण घेतले असून, चीनच्या निर्यातीत घटच होत चालली आहे.

भारत-चीन यांच्यात संघर्ष उडणार, ही काळ्या दगडावरील रेषा आहे. सध्या तरी भारत-चीनच्या सरहद्दीवरील, म्हणजे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील स्थिती 'ऑल क्वाएट ऑन नॉर्दर्न फ्रंट' अशी असली, तरी ती धुमसणारी शांतता आहे. भारतावर आक्रमण करण्याच्या योग्य संधीची चीन वाट पाहात होता. लोकसभा निवडणुकीत फासे उलटे पडले असते, तर चीनला आपले धोरण राबविणे खूपच सोपे गेले असते. पण मोदी यांची पकड ढिली पडलेली नाही. त्यामुळेच सरहद्दीवर धुमसणारी शांतता कायम ठेवण्याचे धोरण त्याने अवलंबिले आहे.

भारतमाता की जय...

कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले. आम्ही केवळ देशभक्तीपर घोषणा देत होतो, धार्मिक भावना किंवा द्वेष भडकविण्याचा आमचा हेतू नव्हता, अशा युक्तिवाद त्या कार्यकर्त्यांच्यावतीने न्यायालयात करण्यात आला. ज्या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात आला होता, त्या संदर्भातील कसलाच पुरावा न्यायालयास आढळून आला नाही. न्या. नागप्रसन्न यांनी, 'भारतमाता की जय' ही घोषणा राष्ट्रीय ऐक्य आणि सलोखा वाढविणारी असल्याचे स्पष्ट केले. समाजात द्वेषभावना निर्माण होईल, असे काही यातून घडलेले नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. 'कलम १५३ (अ)'चा कसा गैरवापर करण्यात आला, याचे हे प्रकरण म्हणजे एक ठळक उदाहरण आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. समाजात दुही निर्माण होईल, असा कसलाच उल्लेख तक्रारीत करण्यात आलेला नव्हता, हेही न्यायालयाने नमूद केले. पंतप्रधान मोदी यांच्या शपथविधीनंतर केवळ आपली देशभावना व्यक्त करण्यासाठी या घोषणा देण्यात आल्या होत्या, असा युक्तिवाद अर्जदारांच्यावतीने करण्यात आला. कोणाला भडकविण्याचा किंवा कोणाच्या भावना दुखविण्याचा त्यामागे हेतू नव्हता, असेही न्यायालयास सांगण्यात आले. न्यायालयाने हे म्हणणे मान्य केले. 'भारतमाता की जय' अशी घोषणा दिल्याबद्दल जो खटला दाखल करण्यात आला होता, तो न्यायालयाने निकालात काढला. 'भारतमाता की जय' ही घोषणा देशभावना वाढविणारी आहे, द्वेष पसरविणारी नाही, हेही न्यायालयाच्या निकालावरून स्पष्ट झाले. 'भारतमाता की जय' या घोषणेस जाणूनबुजून आक्षेप घेणाऱ्या धर्मांध शक्तींना न्यायालयाच्या निकालाने सणसणीत चपराक बसली आहे.

'चार नगरांतले माझे विश्व' एका शास्त्रज्ञाच्या जडणघडणीतील शैक्षणिक संदर्भ

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६



जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग आणि जयंत नारळीकर यांना डम्स प्राईसचा पुरस्कार सोबतच जाहीर झाला होता. आपल्याला मुले झाल्यावर त्या मुलांवर भारतीय संस्कार व्हावे, हा विचार नारळीकर करताना दिसतात यावरून भारतीय संस्कृतीला आणि संस्काराला किती महत्त्व आहे हे आपल्या लक्षात येते. 'आमच्या मुलींना सुसंस्कृत आजी आजोबाजवळ असते हा एक निश्चितच फायदा झाला होता' हे वाक्य विचारात घेण्यासारखे आहे.

मुंबई येथे वास्तव्याला असलेल्यानी मुंबईतील आपले अनुभव 'मुंबई' या भागात व्यक्त केले आहे. केंब्रिजमध्ये असताना त्यांची मुलगी गीता इंग्रजी बोले. त्यामुळे मुंबईत आल्यावर तिला बर्यापैकी अडचण येऊ लागली. मात्र, आपल्या मुलीने इंग्रजी प्रमाणे मराठी पण बोलावे हा नारळीकरांचा विचार ज्ञान भाषा म्हणून इंग्रजी आणि अनुभवासाठी म्हणून मातृभाषा हा विचार सांगणारा आहे. गीता आणि गिरीजा या दोन्ही मुलांना शाळेत प्रवेश घेताना नारळीकरांना बऱ्याच अडचणी गेल्या. शाळा कॉलेजेस मध्ये व्याख्यानासाठी गेल्यावर जयंत नारळीकरांच्या मागे स्वाक्षरी घेणार्यांची गर्दी असेल त्यावेळी, 'इथे स्वाक्षरी मिळणार नाही, एखादा प्रश्न तुम्हाला भेडसावत असेल तर तो लिहून मला पत्र पाठवा मी त्याचे उत्तर देईल आणि त्यावर स्वाक्षरी सुद्धा असेल. असा एक सुंदर विचार जयंत नारळीकरांनी विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देण्यासाठी त्या काळात वापरला. वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सार भगवद्गीतेत सापडते. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्म यांचा परस्पर संबंध असल्याचे चिंतनही लेखक करताना दिसतात.

मुंबईमध्ये प्रायमरी शाळेत प्रवेश घेताना नारळीकरांना आलेल्या अडचणी आणि त्या तुलनेत अमेरिकेमध्ये प्रायमरी शाळेत प्रवेशाचा काहीही प्रॉब्लेम नसतो. उलट शाळेचे मुख्याध्यापक आसपासच्या सर्व घरात तुमच्या घरी पाच ते दहा वर्षे वयोगटातील मुले असतील तर त्यांना प्रवेशासाठी शाळेत आणा असे पत्रक पाठवतात. महाराष्ट्रात अनुदान असलेल्या शाळेतील तुकडीमध्ये ७० ते ८० मध्ये असतात. त्या तुलनेत कार्डीफच्या शाळेत एका वर्गात १८ ते २० मुले असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे शिक्षकाचे लक्ष चांगले राहते. भारतातील शिक्षण घेत असताना येणार्या अडचणी लक्षात घ्या. संपूर्ण भारतात अतिशय मोजक्या प्रमाणात असलेल्या शास्त्रज्ञांना त्यांच्या मुलासाठी शिक्षणाचा विशिष्ट कोटा उपलब्ध करून द्यावा, असे पत्र त्यांनी तत्कालीन शिक्षणमंत्री नरसिंहराव यांना लिहिले. मात्र, त्यांच्या दोनही पत्राची दखल घेतल्या गेली नाही. पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार समितीवरच्या शास्त्रज्ञाच्या पत्राची अवहेलना जर शासन करत असेल तर सामान्य माणसाच्या मागण्याचे काय होत असेल? असे प्रश्नचिन्ह लेखकाने उपस्थित केले आहे. विद्यापीठांचा दर्जा ढासळण्याच्या संदर्भात लेखक अतिशय परखडपणे त्या संदर्भाने म्हणतात, नेहरूंचे एक विधान आज वक्रोक्तीपूर्ण वाटते. विद्यापीठ हे मानवता, सहिष्णुता, तर्कशुद्ध विचारसरणी, कल्पनांच्या भरार्या आणि सत्याच्या शोधासाठी असते. मानवजातीची उच्चस्तर उद्दिष्टे गाठण्याच्या प्रयत्नांचे ते द्योतक आहे. जर विज्ञापीठे आपली कर्तव्ये नीट बजावत असली तर राष्ट्राचे आणि त्याच्या नागरिकांचे कुशल आहे असे समजावे. वक्रोक्तीपूर्ण उद्गार ह्या करता की, नेहरूंच्याच पाठिंब्याने स्वायत्त संस्था उभारल्या जाऊन विद्यापीठांना शह बसला. असे म्हणता येईल, की भाभा-भटनागर यांच्या तोडीचा, पण विद्यापीठांची बाजू ठासून मांडणारा कोणी शास्त्रज्ञ नेहरूंना भेटला नाही.

थोडक्यात, विद्यापीठे आपली कर्तव्ये नीट बजावू शकली नाहीत. स्वायत्त संस्था विद्यापीठाशी संलग्न ठेवता आल्या असत्या. संस्थांमधील शास्त्रज्ञांनी विद्यापीठात एक तरी कोर्स दर वर्षी द्यावा, अशी सक्ती करता आली असती. तसेच विद्यापीठातल्या शिक्षकांना संशोधन आवश्यक ठेवून त्यासाठी अनुदान, श्रेय, पुरस्कार आदींनी प्रेरित करता आले असते. तसे झाले असते तर विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांना आपल्याभोवती उच्च संशोधन होताना दिसले असते आणि त्यातील काही जण स्वतः संशोधनाकडे प्रेरित झाले असते. एकंदरीत आपल्या आत्मकथनांमध्ये जयंत नारळीकर यांनी वेळोवेळी भारतीय शिक्षण आणि परदेशातील शिक्षण यांचा तुलनात्मक अभ्यास करून आपले शिक्षण विषयक स्पष्ट विचार मांडले आहेत. आयुका या भारतातल्या पहिल्या वहिल्या वैज्ञानिक संशोधन संस्थेमध्ये विज्ञान प्रसार करणे आणि शालेय विद्यार्थ्यांना विज्ञान रुजवणे हे कार्यक्रम हाती घेतल्या गेले. शाळेतल्या निरस आणि क्लिष्ट विज्ञान शिक्षण पद्धती बाहेर जाऊन विज्ञानाच्या गमती जमती विद्यार्थ्यांपुढे मांडल्या तर वैज्ञानिक जगताकडे त्यातील काही हुशार विद्यार्थी आकर्षित होतील असेही जयंत नारळीकर म्हणतात. राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या अनौपचारिक भेटीत आयुका पाहताना आणि शाळकरी मुलांशी संवाद साधताना राष्ट्रपतींना वेळेचे भान राहिले नाही आणि त्यांची भेट ठरल्या वेळेपेक्षा दुप्पट वेळ झाली. हे सांगत असताना शिक्षणप्रेमी असलेले अब्दुल कलाम विद्यार्थ्यांमध्ये कसे गुंतून जात, आणि तशा राष्ट्रीय नेतृत्वाची भारताला गरज असल्याची जाणीव नारळीकरांनी करून दिली आहे. पु.ल. देशपांडे आणि सुनीता देशपांडे यांनी २५ लाख रुपयांची देणगी आयोगाच्या विद्यार्थीलक्षित कार्यक्रम साठी दिली. निधीतून उभ्या राहिलेल्या इमारतीला 'पुलस्त्य' असे आकाशातील सप्तर्षी मधील कार्याचे नाव आणि पु.ल. देशपांडे यांचे नाव देऊन पु. ल. देशपांडे यांची स्मृतीसमोर ठेवण्यात आली. लेखकाच्या तिन्ही मुली अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेल्या यातूनच त्यांना मुलींच्या शिक्षणाबद्दल विशेष जाणिवे होती असे दिसून येते. त्यांनी त्यांची पत्नी मंगला नारळीकर यांच्यावरही शिक्षणाबाबत स्वतःची मते लादली नाही. स्वतःची मते लादली नाहीत. प्रसिद्ध व्यक्तिबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात हिरोवर्शिप असणे साहजिक असते आणि लेखकाच्या मनात फ्रेडबद्दल ती होती. तो त्यांचा मित्र आणि गुरु सुद्धा होता. त्यामुळे त्यांच्यातील संवाद जास्त सोयीस्कर होत असे.

(पान ६ वर)

महाराष्ट्राला लाभलेला आधुनिक संतपरंपरेमध्ये गोंदवल्याचे संत ब्रह्मचैतन्य (गणपती घुगरदरे) हे 'नामयोगी' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी दासभावाने प्रभू रामाचा व नामाचा महिमा वाढविला. लाखो भक्तांची जीवने रामनाम भक्तीने उजळून टाकली. १८४५ ते १९१३ असा त्यांचा कार्यकाळ असून त्यांची 'दैनंदिन प्रवचने' आणि त्यांनी लिहिलेला 'रामपाठ' हे भाविक उपासकांचे पारमार्थिक पथदर्शक दीपस्तंभ आहेत. गोंदवलेकर महाराजांनी गोंदवले येथे बांधलेली दोन स्वतंत्र राममंदिरे आहेत. आधी रामाचे मग महाराजांच्या समाधीचे दर्शन केले जाते.

लेखांक ४०

नामयोगी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांचा 'रामपाठ'

(पूर्वार्ध)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

रामनामचि आत्मज्ञान। रामनामचि ब्रह्मपद।
रामनामचि निजसुख। रामनामचि वस्तु देख।
रामनामचि सर्वसिद्धी। रामनामेची तुटे उपाधी।

महाराष्ट्रातील आधुनिक संतांमध्ये अक्कलकोटचे स्वामीसमर्थ, शेगावचे गजाननमहाराज, शिर्डीचे साईबाबा, पावसचे स्वामी स्वरूपानंद यांच्या बरोबर गोंदवलेकरमहाराज हे एक अग्रणी, साक्षात्कारी संतसत्पुरुष होऊन गेले. त्यांचा रामभक्तीवर आणि नामभक्तीवर विशेष भर असल्याने त्यांना 'नामयोगी' म्हणूनच ओळखले जाते. किंबहुना त्यांचा जन्मच 'राम' आणि 'नाम' भक्ती प्रचारार्थ झाला.

नामयोगी गोंदवलेकरमहाराजांचा जन्म माघ शुद्ध दशमी १९ फेब्रुवारी १८४५ रोजी गोंदवले (जि.सातारा) येथे झाला. त्यांना ६९ वर्षांचे आयुष्य लाभले. मार्गशीर्ष वद्य दशमी २२ डिसेंबर १९१३ रोजी त्यांनी देह ठेवला. गणपती रावजी घुगरदरे (कुलकर्णी) असे त्यांचे पूर्ण नाव असून त्यांच्या घराण्यात सात पिढ्या 'पंढरीची वारी' चालत आलेली होती. नांदेड जिल्ह्यातील येहळेगावचे साक्षात्कारी सत्पुरुष श्री तुकामाई यांचा त्यांना अनुग्रह लाभलेला. तुकामाई हे सिद्ध पुरुष होते.

वयाच्या ९ व्या वर्षी गुरू शोधार्थ गृहत्याग करून देशभर भ्रमंती करणार्या छोट्या गणपतीची (गोंदवलेकरमहाराजांची) अखेर तुकामाईंशी भेट झाली. आजवर अनेक साधुसंत भेटले होते पण तुकामाईंना भेटताच महाराजांना गुरू भेटल्याची अंतरंग खात्री झाली. गुरुची त्यांनी अनेक खडतर परीक्षा देत नऊ महिने उत्तम सेवा केली.

अखेर रामनवमीच्या पावनदिनी दुपारी बारा वाजता गुरू तुकामाईंनी गणूला (गोंदवलेकरमहाराजांना) अनुग्रह दिला आणि 'श्रीराम जय राम जय जय राम' हा त्रयोदशाक्षरी रामनाममंत्राची उपासना दिली. या अनुग्रहानंतर त्यांना गुरुंनी 'ब्रह्मचैतन्य' असे नाव दिले. जनसामान्यांमध्ये रामोपासनेचा प्रचार, प्रसार करून नामस्मरण भक्तीने समाजाचे कल्याण करावे असा गुरू तुकामाईंनी त्यांना उपदेश केला. गुरू अनुग्रह व उपदेशानंतर भारतभर भ्रमण करून ठिकठिकाणी रामभक्तीचा, रामोपासनेचा प्रचार करीत अखेर १८७६ च्या सुमारास 'ब्रह्मचैतन्य' होऊन महाराज गोंदवले गावी परतले. ते बहुभाषिक होते. हिंदी, कन्नड, तेलगू, संस्कृत भाषा त्यांना समजत होत्या.

गोंदवलेकरमहाराज हे गृहस्थाश्रमी होते. प्रपंचात-समाजात राहून परमार्थ सफलपणे करण्याचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. काही काळ त्यांनी गावचे वडिलोपार्जित कुलकर्णीपणही केले पण पुढे सर्व जबाबदार्यांतून मुक्त होऊन अखंड रामसेवा व रामनाम भक्ती प्रचारास वाहून घेतले. गोंदवल्यामध्ये 'थोरले राम

मंदिर' आणि 'धाकटे राम मंदिर' अशी दोन स्वतंत्र राम मंदिरे बांधली.

राम एकदाता:-

संत ज्ञानदेवांच्या 'हरिपाठा' प्रमाणे महाराजांनी 'रामपाठ' लिहिला आणि नित्यपाठासाठी एक सुलभ साधन दिले. त्यांची प्रवचने म्हणजे सहज संवादाचा सुरेख वस्तुपाठच आहे.

जनी जनार्दन रामाचे चिंतन।
सत्याची ही खाण रामनाम।
गाईचे रक्षण भूतदया जाण।
अतिथीस अन्न घाला तुम्ही।।

हा त्यांच्या एकूण जीवनकार्याचा बोध आहे. रामनाम घेण्यासाठी प्रापंचिक व्यवहार, उद्योग बाजूला सारण्याची गरज नाही. तुमची प्राप्त कामे, विहित कर्तव्ये पार पाडत रामनाम घ्या, रामाचे ध्यान करा, रामनामाचे चिंतन करा. असा त्यांनी सर्वांना उपदेश केला व त्यांच्या सहवासात येणार्या प्रत्येकाला रामनामाची गोडी लावली. सोवळ्या-ओवळ्याचा बाऊ न करता शुद्ध मनाने रामनाम घेण्याचा सुलभ मार्ग त्यांनी सर्वांना दाखविला. आपल्या जीवनातील प्रत्येक क्रिया ही रामाच्या करिता व्हावी, रामाच्या सेवेसाठी जगावे, राम हाच कर्ता, करविता आहे हा भाव मनी मानसी ठेवून वर्तन करावे. असा त्यांच्या एकूण उपदेशाचा 'सार' आहे. ज्या प्रपंचात 'राम' नाही त्यामध्ये आराम, शांती, सुख नाही असे महाराज म्हणत.

'ब्रह्मचैतन्य' महाराजांची प्रवचने ग्रंथरुपाने प्रकाशित झालेली आहेत. त्या ३६५ प्रवचनांमधील जेथे नाम तेथे राम।, प्रपंचात राम कर्ता, जेथे नाम तेथे राम।, प्रपंचात राम कर्ता, जेथे नाम तेथे राम।, प्रपंचात राम कर्ता ही भावना ठेवावी, राम कर्ता हे चित्ती जाणून वर्तावे, रामाला अनन्यभावे शरण जा, रामकर्ता या भावनेने समाधान मिळते, रामापायी ठेवा मन, राम ठेवील त्यात समाधान, ठेवता रामावर एक विश्वास, रामापरते सत्य नाही, ही प्रवचने रामनामाचा अगाध अनंत महिमा कथन करणारी आहेत. त्याशिवाय श्रीरामनवमी उत्सवातील त्यांची चार प्रवचने या ग्रंथात स्वतंत्रपणे दिली आहेत ती रामनामाची गाथाच आहे. त्यातील काही वचने पहा-

देवळे सभामंडपे न येत कामा।
ज्याने नाही ठेविले हृदयी रामा।।
सर्व शास्त्रांचे सार। एक भजावा रघुवी।।
तिन्ही लोकी श्रेष्ठ रामनाम एक।
धरूनी विवेक जपे सदा।।

ब्रह्मचैतन्य' तथा 'दीनदास:-

समर्थांच्या रामभक्तीचा आदर्श 'हनुमंत' आहे. त्यामुळे त्यांनी 'रामी रामदासी','रामदास' अशा मुद्रा धारण केल्या व आपला राम दास्यत्वभाव अभिमानाने मिरवला, त्यातच धन्यता मानली. गोंदवलेकरमहाराजांना गुरुंनी 'ब्रह्मचैतन्य' नाव दिले तरी सुद्धा त्यांनी रामदासा प्रमाणेच आपणास 'दीनदास' नाममुद्रा लावण्यात धन्यता मानली. देवतेचे, गुरुचे दास्यत्व ही संतांची धन्यता आहे. सकल संतांनी दासभावाचे आपल्या साहित्यात अनुसरण केलेले आहे. तोच भाव ब्रह्मचैतन्यांच्या ठायी दिसतो. त्यांची म्हणे दीनदास, दीनदास म्हणे... अनेक पदामध्ये दिसून येते.

हनुमंते केले लंकेसी उड्डाण।
रामनाम ठाण हृदयामाजी।
दीनदास म्हणे वानर तरले।
नामी कोटी कुळे उद्धरली।।

वायुपुत्र हनुमंत लंका दहनाचा पराक्रम करण्यात यशस्वी झाला कारण त्याच्या हृदयी 'राम' होता. तसेच राम नाम व राम सेवा भक्तीमुळे कोट्यावधी वानरे-त्यांची कुळे उद्धरली असे रामनाम तारक आहे. स्वतः ब्रह्मचैतन्य महाराज हेच आधुनिक काळातील हनुमंताचा अवतार मानले जातात. या दृष्टीने त्यांनी केलेले रामायणातील हनुमंताची स्तुती ही 'ज्योतीने तेजाची आरती'च आहे.

दीनदास म्हणे स्मरा रघुनाथा।
संसाराची चिंता त्यासी नसे।
जनी-जनार्दन रामाचे चिंतन।
सत्याची खाण रामनाम।।

(प्रवचने पृष्ठ २५४) **!!जय श्री राम!!**

अमृतकुंभ

प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

द ग्रेट! प्रकाश घाटपांडे उर्फ 'पकोबा'

प्रकाश नारायणराव घाटपांडे उर्फ पक्या घराबाहेर पडला की त्याची विनोदबुद्धी अगदी वायूवेगाने चालायची. घरात गेला की हा पकोबा अगदी बिल्ली होऊन जायचा. शक्यतोवर अतिशय मोजके बोलणे, हो किंवा नाही मध्ये उत्तर देणे असा सावध पवित्रा तो घ्यायचा.'बाहर शेर और घरमे बिल्ली' अशा वागण्यातील फायदे तो विस्ताराने समजून सांगायचा. सांयकाळचे सात वाजण्याअगोदर आपल्या घराचा रस्ता तो धरायचा. बहुतेक 'सातच्या आत घरात' हे नाटक या महाशयाकडे पाहुनच त्या लेखकाला सुचलं असावं. सरप्राइज व्हिजिट द्यायला गेलो. जवळपास तासभर गप्पा मारत बसलो. तेवढ्या वेळात चहा तर सोडा आमच्या समोर साधं पाणीही आलं नाही. तेव्हा मी सहज बोलून गेलो. पकोबा तुझ्याकडे पाणी आखाती प्रदेशातून येते का? खूपच महाग असेल नाही? त्या प्रश्नावर त्याने फक्त मिश्किल हास्य केले. ते हास्य त्याच्या चेहर्यावर चमकले. त्यांनी कसेबसे पाणी आणून आमच्यासमोर टेकवले. त्याला आवाज दिल्यावर हा आज्ञाधारक प्राणी फक्त उठून आत जायचा आणि पुन्हा बाहेर यायचा. मला हे गोडबंगाल काहीच कळत नव्हते. थोडा कान लावून कानोसा घेतला तेव्हा कळाले. हा महाशय आत जातो आणि गृहमंत्र्यांने सांगितलेले काम करुन बाहेर येतो. घरी मित्र आल्यावर त्यांच्यासोबत बोलण्याच साधं स्वातंत्र्यही नाही बिचार्याला. शेवटी आम्ही बाहेरुन गेलेल्या मित्रांनी आपसात किती तो घरी निघण्यासाठी हालचाल करु लागला की आम्ही त्याची विकेट घ्यायचो. पकोबा गेटपासवरचा टाईम संपला वाटतं. त्यावर त्यांचं खूप मिश्कील उत्तर असायचं, हे पहा मित्रहो, घरी लवकर गेलं की गरम जेवण आणि थंड दिमाखाचे होममिनिस्टर भेटतात. गरम गरम जेवणासोबत मिश्कील हास्य, लाघवी संवाद, लाजवाब नयनबाण, काय तो कटाक्ष? आणि उशिरा गेल्यावर थंड जेवण अन् होममिनिस्टरचा दिमाख एकदम विस्तवाचा इंगोळ.

फार थोडक्यात सुखी संसाराची रहस्य सांगून जायचा. पण त्या महान तत्त्ववेत्यावर आम्हा पामरांचा विश्वास बसेल तेव्हा ना! आम्ही फक्त मनोरंजनापुरता त्याचा उपयोग करुन घ्यायचो. तो निघून गेल्यावर तो जोरुका गुलाम सर्वांच्या टवाळकीचा विषय व्हायचा. तो खूप आत्मविश्वासाने सांगायचा, आपलं बायकोसोबत कधीच भांडण झालं नाही. सर्व त्याच्यावर अविश्वास दाखवायचे. हे बघ पक्या हे असं 'वैश्विक असत्य' बोलू नकोस, जे जगात कधी घडलेच नाही. ते तुझ्याच बाबतीत कसे काय शक्य आहे? उगाच काहीतरी फेकत राहतो. त्यावर त्याचे भन्नाट उत्तर तयार असायचे. हे पहा मित्रहो, लग्न झाल्यावर लक्ष्मी घरात आली की पहिल्या रात्री तीचं दर्शन घ्यायचं. अगदी निःसंकोचपणे साष्टांग दंडवत घालायचा आणि म्हणायचं, बाई तू म्हणशील तसं. मी कधी एका शब्दानही तुला विरोध करणार नाही. अरे, मला गरजचं काय? विरोध करायची. तू जर पश्चिमेकडे बोट दाखवून म्हणाली, ही पूर्व दिशा तर मी लगेच म्हणतो, अरे हो! काल मी तिकडूनच सूर्य निघतांना पाहिला होता. हे पहा अशी शक्कल लढवली तर भांडण व्हायचं काही कारणं आहे का? खरंच हे शक्य आहे का? अशा साशंक नजरेने सर्वजन त्यांच्याकडे पहायला लागायचे. याचे कारण काय असेल? एवढे लवचिक राहून सर्व प्रश्न सुटतात? याविषयी सर्वांना शंका होती.

बाहेर पडल्यावर मात्र पकोबा अगदी ईरसाल वागायचा. त्याच्या डोक्यात काय भन्नाट कल्पना येतील याविषयी अंदाज काढणे शक्य नव्हते. एकदा त्याच्या घरी आम्ही त्याला बोलावं? शेवटी आम्ही उठून बाहेर आलो. तसा पकोबा आम्हाला पोहचवण्यासाठी बाहेर आला. आता याला बाहेर येण्यासाठी कशी काय संधी मिळाली? हा प्रश्न आमच्यापैकी रमश्याने उपस्थित केला. त्यावर पक्या म्हणाला, अरे काही माणूसकी धर्म आहे का नाही? यावर बबन्या लगेचं म्हणाला, अरे इतका वेळ आम्ही आपल्या दरबारी बसलो होतो. राजे, तेव्हा कुठे गेली होती आपली माणूसकी? त्यावर एकच हशा पिकला. आता यावर आणखी एक सुपर सिक्स मारण्याची माझी तिव्र ईच्छा झाली. मी म्हणालो, एक मिनिटं ऐका. हा गेट निट लावण्यासाठी आलेला आहे. जाता जाता आपण यांचे जोडे चपला घेवून गेलो तर काय करायचे हा प्रश्न आपल्या राजे पकोबा यांच्या मनात नक्कीच आला असेल आणि तो इथपर्यंत कोणाच्या आदेशावरून आला असेलं हे सांगण्याची आवश्यकता आहे का? माझ्या सोबत असेलेले आणखी तिघांनी नाही.... असा जोरात स्लोगन दिला. त्यानंतर आणखीच जोरात एकच हशा पिकला. त्यावर कडी करण्यासाठी पकोबा बिल्कुल संकोच न बाळगता म्हणाला, अगदी एकशे एक टक्का बरोबर, एवढं करेक्ट कसं काय ओळखलं रे तुम्ही. तुम्हाला मी त्यातली गंम्मत सांगतो. आमच्या पिताश्रीच्या डोक्यावर केसं नव्हते, कारण ते बायकोचं ऐकूनच सर्व निर्णय घेतं होते. माझ्या डोक्यावर केसं नाहीत. कारण मी तेचं करतो. पुढे माझा मुलगा पूर्वजांचे अनुकरण करेलं का नाही? याची शंका माझ्या मनात निर्माण झाल्यामुळं मी त्याला जन्मच दिला नाही. या पकोबाच्या विनोदावर आणखी मोठा हास्यस्फोट झाला. अपत्याशिवाय आपल्याला थांबावं लागलं हे त्याचं दुःख असलं तरी त्यानं ते त्याचं दुःख काय मिश्कीलपणे घेतलं होतं. चेहर्यावर कोणतीही दुःखाची छटा न येवू देता. त्यामुळं त्या पातळीवर जाऊन आम्ही त्याची विकेट का घेतली? त्याचा पश्चात्ताप आम्हालाच झाला. यार पकोबा स्वारी असं बोलून आम्ही आमच्या घराच्या दिशेनं निघालो. अपराधीपणाची भावना मात्र आमच्या मनात घर करुन होती.

(पान ६ वर)

थोडं मनातलं

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग १७)

रवींद्रनाथ टागोरांवर 'रवींद्रनाथ: तीन व्याख्याने' असं छोटेखानी पु.ल. देशपांडे यांचं एक पुस्तक आहे. त्याचा उल्लेख मी मागच्या एका भागात केला होता. हे पुस्तक इतकं सुंदर आहे की मोठमोठ्या ग्रंथांमध्ये देखील जो आशय आणि जे सौंदर्य क्वचितच दृष्टीस पडेल, ते केवळ या ११२ पाने असलेल्या पुस्तकात बघायला मिळतं. पु. ल. देशपांडे नावाच्या एका सिद्धहस्त लेखणीचा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा हा चमत्कार आहे. पु. ल. देशपांडे टागोरांबद्दल म्हणतात, रवींद्रनाथांची अशरीरिणी प्रतिभा मला त्यांच्या कथा कविता कादंबरी नाटक निबंध आहेत. चित्र संगीत अशा रूपाने भेटत असते.

रवींद्रनाथांसारखे महान साहित्यिक जरी देहाने आज आपल्यात नसले तरी आपल्या साहित्याच्या रूपाने ते अजरामर आहेत. प्रसंगी हयात असणाऱ्या माणसाच्या भेटी देखील दुर्मिळ होतात किंवा मोठ्या कष्टाने होतात. परंतु रवींद्रनाथांसारखी माणसे की ज्यांनी अपार असे साहित्यधन, अक्षर वाङ्मय मागे ठेवले आहे, ते त्यांच्या साहित्यातून आपल्याला हवे तेव्हा भेटू शकतात किंवा आपण त्यांना हवे तेव्हा भेटू शकतो. त्यांचे कोणतेही पुस्तक उघडावे आणि त्यांच्या सहवासात रमून जावे. हे केवळ रवींद्रनाथांच्या साहित्याबद्दलच खरे आहे असे नाही. कोणत्याही महान साहित्यिकाच्या बाबतीत ही गोष्ट तेवढीच सत्य आहे. ही माणसे जेव्हा आपल्याला त्यांच्या साहित्यरूपाने भेटतात, तेव्हा ती त्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधतात. आपल्या समस्यांवर उत्तर सांगतात, आपल्याला धीर देतात आणि आपले अनुभव अधिक समृद्ध करतात, जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळा आणि सौंदर्यवादी दृष्टिकोन प्रदान करतात. अशा व्यक्तींनी काळावर मात केलेली असते. ते आणि त्यांचे साहित्य कालातीत असते. असे साहित्य हे पिढ्यानपिढ्यांचा वारसा बनते. त्यांना मार्गदर्शन करीत राहते. रवींद्रनाथांच्या शब्दात सांगायचे तर ते म्हणतात,

मरणसागरपारे तोमरा अमर,
तोमादेर स्मरि।
रेखे गेले बानी से जे अभय अशोक,
जय होक, जय होक तारि जय होक,
तोमादेर स्मरि। (मरण सागर पार तुम्ही अमर तुमचं स्मरण करतो,अभय अशोक अशी वाणी तुम्ही मागे ठेवून गेला आहात. जय असो जय असो तिचा जय असो. तुमचं स्मरण करतो.) टागोरांनी एवढं अक्षरधन मागे ठेवलं आहे की बंगालमधील नामवंत लेखक, कवी, संगीतकार, चित्रकार या सार्यांना त्यांचा मागोवा घेत घेत, मार्गदर्शन घेत वाटचाल करावी लागते. त्यांच्या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात टागोरांच्या साहित्याचे, कलेचे संस्कार भिनलेले आहेत. रवींद्रनाथानी कलेच्या ज्या क्षेत्राला स्पर्श केला. त्या- त्या ठिकाणी आपला ठसा उमटवला. त्यांचा स्पर्श हा सुवर्णस्पर्श ठरला. रवींद्रनाथांनी आपल्या जीवनात ज्या- ज्या गोष्टींना स्पर्श केला, तो एका चैतन्याचा, एका प्रतिभावंताचा आणि एका महाकवीचा स्पर्श होता. मग त्या गोष्टी म्हणजे त्यांनी निर्माण केलेले शांतीनिकेतन, विश्वनिकेतन किंवा श्रीनिकेतन यासारख्या पार्थिव गोष्टी असो किंवा साहित्य कला यासारख्या अपार्थिव प्रांतात केलेली मुशाफिरी असो. त्यांनी जवळपास अडीच हजार गाणी लिहिली. केवळ गाणी लिहूनच ते थांबले नाहीत तर त्यांना चालीही दिल्या. चाळीशी पन्नाशीनंतर चित्र काढायला सुरुवात केली आणि दोन अडीच हजारांवर अक्षरचित्रे ते मागे ठेवून गेले. टागोरांच्या कवितेत बहुतेक सर्व विषय आलेले आपल्याला दिसतात. त्यात देशप्रेम आहे, परमेश्वराची भक्ती आहे, निसर्गाच्या सौंदर्याचे वर्णन



आहे, निर्व्याज उदात्त अशी प्रेमभावना आहे. पण त्यांच्या बहुतेक कवितांमध्ये आपल्याला निसर्ग प्रतिबिंबित झालेला दिसतो. निसर्गातील सौंदर्यामागे असणारे ईश्वराचे अदृश्य हातही त्यांना वेळोवेळी जाणवतात. त्यात त्यांना ईश्वराचा साक्षात्कार झालेला आहे. एका प्रसंगी त्यांनी पाहिले की शारदातले ढग निळ्या आभाळात विहार करताना खाली असलेल्या भाताच्या पिकावर छाया धरीत तरंगत होते. ह्या अद्भुत दृश्याचा त्यांच्या मनाने ताबा घेतला. त्यांना हे सुंदर दृश्य निर्माण करणार्या कारागिरांच्या हातांची आठवण झाली. आपल्या कवितेत ते म्हणतात,

खेळ चालिला आज लपंडावाचा
छाया आणि प्रकाशाचा भाताच्या शेतातून,
झपाट्याने जाताना, निळ्या आकाशात
तरंगणार्या पांढर्या ढगांचा, ताफा हाकणारा तो कोण आहे बरं? (शरदोत्सव)

त्या अदृश्य हातांचा शोध घेण्याची उत्कंठा त्यांच्या मनात सदैव जागृत होती. अशाच एका प्रसंगी वर्षाऋतूच्या आगमनाच्या वेळी आकाशात जमलेल्या ढगांच्या विविध रंगांमुळे रवींद्रनाथ थरारून जातात. त्या विविधरंगी आकाशाची तुलना ते मोराच्या पिसार्याशी करतात. पावसाळी ढगांच्या सौंदर्याने ते मोहित झालेले आहेत. एखाद्या लहान मुलाप्रमाणे ते आनंदी झाले आहेत. त्यातच परमेश्वराला शोधण्याची त्यांची उत्कंठा पुढील ओळीत स्पष्ट दिसते.

मयुरापरी नाचे आज मन माझे रे
शत शत रंगात उसळती मम भावना
फुललेल्या मयूर पंखापरी
मोहोरलेली मम दृष्टी आकाशी लावूनी
त्या उल्हासी कर्त्यासी मी शोधितो रे, शोधितो रे।

पुढे त्यांनी कथा, कादंबरी, नाटक असे अनेक साहित्यप्रकार हाताळले. पण त्यातही त्यांची कविता आणि कविमन प्रामुख्याने दृग्गोचर होते. त्यांच्या कवितेत रसिकांना भरभरून देण्याचे सामर्थ्य आहे. आपलीच ओंजळ घेण्यासाठी अपूर्ण पडते. आपल्या प्रत्येक रचनेत ते काहीतरी मौल्यवान संदेश देऊन जातात. त्यांची 'झोळीची गोष्ट' सांगणारी एक कविता आहे. त्या कवितेत एक भिकारी भिक्षा मागत सर्वत्र हिंडत असतो.

एकदा सकाळी तो असाच भिक्षा मागत हिंडत असताना आकाशातून एक सुवर्णरथ त्याला त्याच्या दिशेने येताना दिसतो. रथ त्याच्याजवळ येऊन थांबतो. आता आपल्याला काहीतरी मौल्यवान भिक्षा मिळणार अशा अपेक्षेत तो असताना, रथातील राजा खाली उतरतो आणि चक्क त्याच्यापुढे हात पसरून, 'ओम भवती भिक्षांदेही' म्हणतो. भिकारी एकदम बावरून जातो. ही कसली क्रूर चेष्टा असे त्याला वाटते. तरी तो आपल्या झोळीत हात घालून चिमूटभर धान्य त्या राजराजेश्वराच्या ओंजळीत टाकतो. घरी येतो आणि पाहतो तर झोळीत काही सुवर्णकण चमकत असतात.

इथे गोष्ट (कविता) संपते. पण आपले विचारचक्र सुरु करते. मनात काहीतरी पेरून जाते. प्रत्येकाकडे देण्यासारखे काहीतरी असतेच. तो विश्वाचा निर्माता रिकाम्या हाताने कोणालाच या धरेवर पाठवत नाही. ज्याने जीवनाचा हा उत्सव मांडला आहे आणि तुम्हाला त्यात सामील होण्याचे आमंत्रण दिले आहे, तो तुम्हाला या जगात भिकारी म्हणून कसे पाठवेल? भिकारी म्हणून तुम्ही या उत्सवात सामील व्हावे अशी त्याची इच्छा असेल का? त्यामुळे परमेश्वराने जर तुमच्याकडे काही मागितले तर माझ्याकडे काहीच नाही असे न म्हणता तुमच्याकडचे जे सर्वोत्तम आहे, ते त्याला देऊन टाका. तुम्ही जे द्याल, त्याचे सोने होईल, ते शतपटीने परत मिळेल.

जीवनाचा अमूल्य संदेश देणारी ही 'झोळीची गोष्ट!' कवी मंगेश पाडगावकर म्हणतात तसे 'या जन्मावर या जगण्यावर अपार प्रेम करणारा' हा कवी होता. त्यांची एक छोटीशी कविता आपल्याला सांगते,

फुल फुलले हीच फुलाची अंतिम कथा
फुलाचे साफल्य त्याच्या बहरण्यात आहे.
फुल विचारते, 'फळा, तू कुठे आहेस?'
फळ उत्तरते, 'मी तुझ्या हृदयात आहे.'

या कवितेतून ते आपल्याला सांगतात की प्रत्येक फुलाला उमलण्याच्या पूर्ण अधिकार आहे. त्याला कुणी अडवता कामा नये. आजही आपल्या अवतीभवती पाहिलं तर आपण किती फुलांना पूर्णपणे फुलू देतो? किती कळ्या अकाली तोडतो? किती कळ्यांचे निर्माल्य होते, किती फुले अकाली कुस्करली जातात? यासाठीच तर तसे संस्कार करणारी शिक्षणपद्धती हवी होती. जी 'मनुष्यधर्म' शिकविते. त्यातूनच शांतिनिकेतनची निर्मिती झाली.

(क्रमशः)

ग्रहसंकेत

(रविवार, ६ ऑक्टोबर ते शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ६ ऑक्टोबर-** विनायक चतुर्थी, चतुर्थी श्राध्द ✻ **सोमवार, ७ ऑक्टोबर-** ललिता पंचमी, चिंदरकर महाराज पुण्यतिथी दापोली, पंचमी श्राध्द ✻ **मंगळवार, ८ ऑक्टोबर-** श्री जनार्दनस्वामी जयंती, बेटकोपरगाव जि. नगर, पंचरात्रोत्सवारंभ, सेवादास महाराज यात्रा आष्टा जि.नांदेड, भारतीय वायुसेना दिन, श्री त्र्यंबोली यात्रा करवीर ✻ **बुधवार, ९ ऑक्टोबर-** सरस्वती आवाहन, जागतिक टपाल दिन, रांजणगावदेवी यात्रा नेवासा जि.नगर, वीर जीवा महाला जयंती, गोविंदराव टेंबे पुण्यदिन, आयंबिल ओळी प्रारंभ (जैन) ✻ **गुरुवार, १० ऑक्टोबर-** महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), त्रिरात्रोत्सवारंभ, सरस्वती पूजन, चित्रा रवि (वाहन म्हैस), ज्योतिर्लिंग जागर कोल्हापूर, अण्णा महाराज केळकर पुण्यतिथी सांगली ✻ **शुक्रवार, ११ ऑक्टोबर-** दुर्गाष्टमी, महाष्टमी उपवास, महानवमी उपवास, मन्वादी, सरस्वती बलिदान, आयुध नवमी, एकरात्रोत्सवारंभ, अंबाबाई यात्रा देशिंग जि.सांगली, घोडेकर यात्रा, करूकली ✻ **शनिवार, १२ ऑक्टोबर-** विजयादशमी (दसरा), देवीला बलिदान, पारणा, महानवमी, सरस्वती विर्सजन, सीमोल्लंघन, अपराजिता, शमीपूजन, विजय (मुहूर्त १४:२२ ते १५:९) दशमी श्राध्द, धम्मचक्र व्रवर्तन दिन, रा. स्व. संघ स्थापना दिन. साईबाबा पुण्यतिथी शिर्डी, एकविरा महानवमी पूजा, खंडे नवमी

मुहूर्तः- ✻ साखरपुडा- ७ (१० नंतर), ९,११, १२ ऑक्टोबर ✻ **डोहाळ जेवण-** ७ (१० नंतर), ९ ऑक्टोबर ✻ **बारसे-** ७, १२ ऑक्टोबर ✻ **गृहप्रवेश-** ७ (१० नंतर), ९, ११ (१२ पर्यंत), १२ ऑक्टोबर.

मेष :- नव्या योजनांचा शुभारंभ

जीवन पुन्हा मिळत नाही. दुःख, राग, द्वेष, भांडणे यात हे वर्ष बर्बाद करू नये. मंगळवारचा बुध- गुरू त्रिकोण योग नवरात्रात आनंद द्विगुणित करणारा ठरेल. नोकरी, व्यवसायात अनुकूलता वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. विजया दशमीच्या मुहूर्तावर नव्या योजनांचा शुभारंभ करावा. शुभ ता. ७, १२

वृषभः- सुख स्वास्थ लाभेल

ज्ञानानंतर अंगी नम्रता आली तर ते ज्ञान अमृत आहे, अन्यथा विष. राशीतील गुरूचा बुधाशी होणारा त्रिकोण योग सुखस्वास्थ वाढविणारा आहे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. यांत्रिक, वैद्यकिय क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. श्री शक्तीदेवीची उपासना करावी. अपेक्षीत फलप्राप्ती होईल. सरकारी कामे होतील. शुभ ता. ११, १२

मिथुनः-नव्या संधी स्वीकाराव्यात

पाण्याच्या थेंबा एवढे माणसाचे जीवन असते, पण अहंकार समुद्रापेक्षाही मोठा असतो. राशी स्वामी बुधाचा गुरूशी होणारा त्रिकोण योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. नवरात्रात नव्या वाहनाचा योग आणाल. धडाडिने विविध कामे मार्गी लागतील. कमिशनवर चालणार्या व्यवसायात मनासारखी प्रगती घडेल. नव्या संधी स्वीकाराव्यात. लाभदायक ठरतील. शभ ता. १०, १२

कर्कः- आर्थिक प्रगती

जे जोडले जाते ते नाते, जी जडती ती सवयं, जी थांबते मी ओढ, जे वाढते ते प्रेम. शनि, मंगळ प्रतिकुल असल्याने फार दगदग करू नका. बुध-गुरू त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. उपजत कला-गुणांचा विकास होत जाईल. नियोजनपूर्वक वाटचाल करावी. अनावश्यक खर्च टाळावा. गुंतवणूक विचाराने करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. ९, १२

सिंहः- प्रगतीचे मार्ग

जे आपले आहे ते आपल्याला निश्चित मिळेल, सारे जग एक झाले तरी ते हिसकावून घेऊ शकत नाही. धनस्थ बुधाचा गुरूशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कौटुंबिक जीवनात आनंदायी घटना घडतील. श्री शक्तीदेवीची उपासना करावी. प्रगतीचे मार्ग लाभतील. सरकारी कमे करून घ्यावीत. अडचणी सुटतील. शुभ ता. ९, १२

कन्याः- अडचणींवर मात

कुणाकडूनही अपेक्षा ठेवून नाराज राहू नका. जे आहे त्यात समाधानी रहावे. राशी स्वामी बुधाचा भाग्यातील गुरूशी होणारा त्रिकोण योग लाभदायक ठरेल. नव्या कामांना गती मिळाल्याने समाधान वाटेल. धार्मिक, सामाजिक कार्य घडतील. कलेचा गौरव होईल. दगदग वाढली तरी अपेक्षित कार्यसिध्दी होईल. सुसंधी लाभतील. शुभ ता. ७, १२

तुलाः- अपेक्षित संधी लाभतील

आईची जात, दिव्यातली वात सारखीच असते. ती परिवारासाठी जळतच असते. राशीत बुध येत आहे. जनसंपर्क वाढेल. सरकारी कामासाठी अधिक पाठपुरावा करावा. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. आवडत्या वस्तुंची, वस्त्रप्रारणाची खरेदी होईल. अपेक्षित संधी लाभतील. दुष्टांत, साक्षात्कार घडतील. शुभ ता. १२

वृश्चिकः- आनंददायी घटना

कमजोर कोणीच नसतो, परिस्थिती कमजोर बनवित असते. वाईट लोक याचा फायदा उठवित असतात. लाभातील बुधाचा गुरूशी होणारा त्रिकोण योग नवरात्रात आनंददायी घटना घडविणारा आहे. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नव्या ओळखी पारखून घ्या. राशीतील शुक्र सौख्य देईल. शुभ ता. ९, १२

धनुः- अपेक्षित कामे होतील

पूर्वीच्या काळात कुटुंबात लोक उत्साह वाढवत होते. आता रक्तदाब वाढवितात. मिळून मिसळून, आनंदात राहावे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. कार्यक्षेत्रात समाधानकारक घटना घडतील. प्रतिक्षा केल्याने चांगले फल आता मिळणार आहे. अपेक्षित कामे होत जातील. चिंता नको. शुभ ता. ११, १२

मकरः- मनासारख्या घटना

आयुष्यात काही माणसे अशी असतात, दिसतात वेगळी, असतात वेगळी, वागतात तर खूपच वेगळी. बुध-गुरूचा त्रिकोण योग भाग्योदयकारक घटना घडविणार आहे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावा. प्रथम आपल्यांची विशेष काळजी घ्यावी. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. कलेचा विकास होईल. अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. १२

कुंभः- कालापव्यय करू नका

जीवनात कधीच कोणाशी तुलना करू नका. आपण जसे आहात सर्वश्रेष्ठ आहात. राशी स्वामी शनि राशीत असल्याने आपण आपले राजे आहात. जे काही करणार आहात, ते विचारपूर्वक करावे. कोणात्याही गोष्टीत गोष्टीत कालापव्यय करू नका. जे जुणे येणे वसूल होईल. नव्या कामांना गती देता येईल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाटेल. व्यर्थ चिंता करू नका. शुभ ता. १०, १२

मीनः- मनासारखी प्रगती

माणूस घर बदलतो, वस्त्र बदलतो, संबंध बदलतो तरी दुःखी राहतो. कारण तो आपला स्वभाव बदलत नाही. राशी स्वामी गुरूचा सप्तमातील बुधाशी होणारा त्रिकोण योग सणासुदिच्या दिवसात प्रगती करणारा आहे. उद्योग, व्यवसायात आता मनासारखी प्रगती होईल, द्विधा मनःस्ति टाळावी. नोकरीत सहकार्यांचे चांगले सहकार्य लाभेल. अडचणींवर मात कराल. दैवीशक्ती लाभेल. शुभ ता. १०, ११

!! शुभ भवतु !!

आपण रोज ज्वारीची भाकरी खातो, गव्हाची पोळी खातो, भातही खातो. तसेच विविध कडधान्ये, तेलबिया यांचाही आहारात उपयोग करतो पण या धान्यात, कडधान्यात आहाराच्या उपयुक्ततेबरोबरच त्यांचे औषधी उपयोगही आहेत, हे अलीकडे फारच थोड्या जणांना माहीत आहे. म्हणूनच आयुर्वेदाचे ज्ञान जनतेला मिळणे आवश्यक वाटते. आजच्या लेखात काही धान्यांच्या औषधी उपयोगाची माहिती घेऊ या...

धान्यांचे औषधी उपयोग

आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

धान्ये हा आपल्या आहारातील एक महत्त्वाचा घटक आहे. धान्यांचे विविध प्रकार असले तरी आपल्याकडे मुख्यतः गहू, ज्वारी तसेच तांदूळ याच धान्याचा आहारात विशेषतः वापर केला जातो. मागास, आदिवासी भागात नाचणी, बाजरी या धान्यांचा वापर केला जातो. आता गावोगावी शासनमान्य स्वस्त धान्य दुकाने झाल्याने सर्वत्र गव्हाचे तसेच तांदळाचे वाटप होते. त्यामुळे जनतेच्या आहारात ज्वारी बरोबर गहू, तांदूळ यांचेही प्रमाण वाढले आहे.

गव्हाची पोळी (चपाती) आता फक्त सणासुदीलाच होत नसून उच्चवर्गीयाप्रमाणेच आता अनेकांच्या आहारात गव्हाचा सर्रास वापर होत आहे. तांदळाचा भातही आहारात असतो. ग्रामीण भागात अजून मोठ्या प्रमाणात साक्षरता नाही. महिला जेमतेमच शिकलेल्या असतात. आहारासंबंधी स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज आहे. सहजासहजी ज्या वस्तू नित्य उपयोगात येतात त्यांचे गुणधर्म त्यांना कळले तर त्या माहितीमुळे आपले स्वास्थ्य मिळेल, त्या वस्तुतून आरोग्य कसे टिकवावे ते त्यांना सहज समजेल.

'आजीबाईचा बटवा' या सदरात वनौषधींची माहिती घेतली आहे. जनतेपर्यंत हे ज्ञान गेले तर त्याचा आवश्य उपयोग होईल, ह्या हेतूनेच वनौषधी प्रचाराचे हे कार्य मेहता ट्रस्टच्या सहकार्याने शक्य होत आहे. स्व. हरिचंद एल. मेहता यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी वनौषधी प्रसारार्थ ट्रस्ट स्थापन केला व वनौषधी प्रदर्शने शिबिरे, ग्रंथाद्वारे हे ज्ञान जनतेपर्यंत नेण्याच प्रयत्न केला. त्यांच्या आशीर्वादानेच हे कार्य वृत्तपत्राद्वारे यथाशक्ती करीत आहे. समाजात एखादे कार्य रुजवायला आणि त्याचे फळ यायला काही वर्षे जावी लागतात. वनौषधीचे हे ज्ञान विविध मार्गाने जनतेपर्यंत गेले तर 'खात्रीने 'घरोघरी धन्वंतरी' निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

गहूः- गहू हे एक सकस धान्य आहे. त्यात पौष्टिकपणा जास्त असून आपल्याकडे गव्हाच्या पोळी, पुऱ्या तसेच घरोघरी गव्हापासून बनविलेल्या रव्याचे लाडू, शिरा, उपीट, तसेच गव्हाची खीर, मैद्यापासून बनविलेले विविध प्रकारचे ब्रेड, टोस्ट आदी पदार्थ बनविले जातात. काळ्या जमिनीत चांगले येणारे गहू हे पीक असून शेतगहू, जोडगहू या प्रकारात गव्हाच्या शरबती गहू, बन्सी गहू आदी विविध जाती आहेत.

औषधी उपयोगः- बदावर गव्हाच्या पीठात कांद्याचा कीस घालून पोटीस करून बांधावे. म्हणजे बद पक्व होऊन फुटतो. ताकद येण्यासाठी गव्हाचे पीठ, तूप आणि गुळाचा पाक १० ग्रॅम याप्रमाणे द्यावा. नाकातून रक्त वाहते, त्यावर गव्हाचे पीठ तुपात भाजून साखर व दूध टाकून १०० ग्रॅम द्यावे. प्रमेहावर गहू व सोयाबीनचे पीठ समभाग एकत्र करून त्याची भाकरी करून द्यावी. गहू उगवून १४-१५ दिवसांच्या झालेल्या रोपाला 'जव्हारा' म्हणतात. त्याचा रस सर्व रोगावर उपयोगी पडतो. त्यात 'बी' व्हिटॅमीन आहे. ते घेतल्याने कोणतेही नुकसान होत नाही. गहू पौष्टिक व वीर्यवर्धक आहे. संपूर्ण गव्हाचा उपयोग आवश्यक आहे. पिठातून कोंडा काढून उपयोग केल्यास गव्हातील व्हिटॅमिन व खनिज नष्ट किंवा कमी होतात.

तांदूळः- तांदूळ हे एक आहारातील महत्त्वाचे अन्न आहे. विशेषतः दक्षिण भारतात तांदळाचा मुख्य अन्न म्हणून उपयोग केला जातो. तांदळाच्या बासमती (पंजाब), कमोद (गुजरात) तसेच आंबेमोहर, चंपाकली आदी असंख्य जाती आहेत. डोंगर उतारावर व अधिक पर्जन्य असलेल्या प्रदेशातच तांदळाचे पीक येते. तांदळाचा जसा भात केला जातो तसेच तांदळाची खिचडी, भरडून इडली आदी विविध पदार्थ केले जातात.

औषधी उपयोगः- पावसाळ्यात पायात चिखल्या होतात त्यावर भाताचा कोंडा जाळून पायांना घुरकट रंग येईपर्यंत धुरी द्यावी. अग्निदग्ध वृणावर भाताचा कोंडा जाळून त्याची राख तुपात खलून लावावी. अर्धे डोके दुखीवर सूर्योदयाच्या अगोदर सुमारे मूठभर भाताच्या लाह्याचे पीठ, साखर व तूप घालून द्यावे. तृष्णेवर तांदळाच्या धुपणात साखर घालून १०- १० ग्रॅम पिण्यास द्यावे, ज्वरावर (ताप) किंचित भाजलेले तांदूळ व मूग समान घेऊन त्यात आठपट पाणी घालून शिजवावे. शिजतेवेळी त्यात हिंग, सुंठ, सैंधव, धने, मिरे, पिंपळी घालून पेज करून द्यावी. तांदळाच्या धुपणाचा उपयोग प्रदररोगात अनुमान म्हणून होतो. कुठलेही औषध तांदळाच्या चुपणातून देता येते. तांदळाच्या कोंड्यात जीवनसत्व आणि खनिज असल्याने तांदूळ शक्यतो हातसडीचे वापरावेत ते आरोग्यास उपयोगी ठरतात. दोन भाग तांदूळ व एकभाग मुगाची डाळ थोडे सैंधव, आले, हिंग, तिखट, तूप घालून केलेली खिचडी रुग्णांना पथ्यकारक आहे.

ज्वारी (जोंधळा) :- आपल्याकडे ज्वारीचे मोठ्या प्रमाणात पीक घेतले जाते. या भागातील जनतेचे मुख्य अन्न ज्वारीच असून ज्वारीच्या भाकरी करतात. सोलापुरी ज्वारी सर्व ज्वारीत चांगली मानली जाते. पौष, माघ मासात ज्वारीचा हुरडा आवडीने खाल्ला जातो. ज्वारीच्या पिठाची थालपीठेही चांगली होतात. ज्वारीच्या विविध संकरित जाती तयार करण्यात आलेल्या आहेत. गव्हापेक्षा ज्वारी पचनास हलकी आहे. पिष्टमय पदार्थांचे प्रमाण जास्त आहे.

औषधी उपयोगः- आमातिसार विकारावर ज्वारीची गरम भाकरी दह्यात कुस्करून ५ ग्रॅम सुंठेची पूड टाकून द्यावी. पित्तावर ज्वारीच्या ताटाचा (कोवळ्या कांडयांचा) रस द्यावा आणि हा रस अंगासही लावावा. लहान मुले ज्वारीची ताटे आवडीने खातात ती उसाप्रमाणे गोड लागतात खरजेवर ज्वारीची राख, शेळीच्या लेड्यांची राख खोबरेल तेलात खलून लावावी. दंतरोगावर ज्वारी जाळून त्याची राख करावी व त्यात मीठ टाकून. दाताला लावावे याने दात हलणे थांबते. हिरड्यांची सूज उतरते. संधीवातावर ज्वारीच्या पिठात एरंडेल तेल चमचाभर घालून भाकरी करून द्यावी. घाम येण्यासाठी ज्वारीच्या लाह्यांचा काढा करून ५ तोळे द्यावा. पोट साफ होण्यासाठीही याचा उपयोग होतो. ज्वारी गरिबांचे मुख्य अन्न असून ज्वारीचा कडबा जनावरांना वरदान आहे.

मकाः- मक्याचे कणीस भाजून अथवा उकडून खाल्ले जाते ते रूचकर लागते. मक्याच्या पिठाच्या भाकरीही करतात. एकंदरी धान्यापैकी मका हे एक प्रसिध्द धान्य असून मक्याची उन्हाळी व पावसाळी अशी दोन पिके घेतली जातात.

औषधी उपयोगः- मका हे एक पौष्टिक अन्न असून मक्याच्या कणसाचे केस हे वेदनाशामक आहेत. पाणथरीवर त्याचा काढा देतात. या केसापांसून सत्व काढून मुत्राशयातील विकार दूर करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. ओकारीवर- मक्याचे वुरकुंड (सोललेले कणीस) जाळून त्याची राख मधात एक ते दोन ग्रॅम घ्यावी. मक्याचे कणीस मीठ व तूप लावून खाल्ल्यास चवदार लागते. तशीच शक्तीही वाढते. मक्यापासून स्टार्च बनवितात. तसेच मक्याची उसळ, लाह्या बनविल्या जातात.

बाजरीः- थोड्या पावसात व सामान्य जमीनीत येणारे बाजरी हे पीक असून हे उष्ण धान्य आहे. बाजरीचा भाकरीसाठी मुख्यत्वे उपयोग केला जातो.

वातज डोकेदुखी या विकारात- बाजरी एका फडक्यात बांधून तव्यावर गरम करून त्याने दुषित भागावर शेकावे. बाजरीच्या भाकरीसोबत लसूण आणि उडिदाची डाळ व गूळ व तूप असल्यास पौष्टिकपणा व चव वाढते. मधुमेहाच्या रुग्णांना बाजरी उपयुक्त आहे. बाजरी भरडून मीठ हळद, मिरे टाकून दिल्यास आजारी माणसालाही ती देता येते. बाजरीची भाकरी पचनास हलकी असून कफनाशक आहे. कोठा साफ राहातो. मेद असलेल्यांनी बाजरीची भाकरी कांदा, लसूण याच्या चटणीबरोबर खावी. बाजरी उष्ण असल्याने गर्भवती भगिनींनी ती खाऊ नये.

नाचणीः- नाचणी कोकणात व डोंगराळ भागात येणारे हे पीक आहे. अदिवासी लोक असूनही आहारात आहारात नाचणीचा सर्रास वापर करतात. गरिबांना हे धान्य परवडते. नाचणी पचणास हलकी असून मधुमेहाच्या रुग्णांना नाचणीची भाकरी दिल्यास शरीरातील साखरेचे प्रमाण कमी होते. नाचणीची पेज आजारी लोकांना देतात. कारण त्यात शरीराला आवश्यक असे खनिज असते. अशक्तास व लहान मुलास शक्ती येण्यासाठी नाचणीचे सत्व दिले जाते.

पान २ वरून

एका हौसिंग सोसायटीची शंभरी

पुढची पिढीही अत्यंत यशस्वी ठरली. त्याचीही अनेक उदाहरणे देता येतील, पण काही मोजकी इथे मांडतो. डॉ नेनेंचा मुलगा डॉ. अतुल अगदी मोठ्या सरांच्याच अनुरूप उत्तम आरोग्यसेवा देत आहे. त्याच्या मुलीने अनेस्थेशियामध्ये दिल्लीतून मास्टर्स केले आहे. डॉ. ए. व्ही. कुलकर्णी सरांचा मुलगा डॉ. अतुल बालरोगतज्ञ आहे. त्याचा मुलगा आर्शीन यावर्षी १९ वर्षाखालील भारतीय क्रिकेट संघातून खेळला आहे. डॉ. गोडबोले सरांचा मुलगा शिरीष याने त्याचा भागीदार प्रदीप पिंपरकर याच्या साथीत 'नाथ डेव्हलपर्स' या नावाने यशस्वी व्यवसाय उभा केला आहे. आता त्याने वाडिया हॉस्पिटलच्या पुनर्स्थापनेचे मोठे कार्य हाती घेतले आहे. संदीप रानडे अत्यंत यशस्वी शेतकरी आहे. प्रसिद्ध चित्रकार व्यंकटेश सपार याने स्वतःचे मोठे स्थान निर्माण केले आहे. उमाकांत डंके यांचा मुलगा मयुरेश, मानसशास्त्र अभ्यासक आहे. अजूनही अनेक उदाहरणे देता येतील. खर, तरं हि वाटचाल शंभर वर्षांची आहे ती शब्दात बंदिस्त करणे हे माझ्या कुवतीचे कार्य नाही. अनेक प्रसंग, आठवणी आहेत, त्यातले काही मोजके आपल्यासाठी मांडले आहेत. आता या शंभरीतही सोसायटी तरुण आहे. आता त्याची जबाबदारी अध्यक्ष मुरली अयंगार आणि सचिव संदीप रानडे यांनी स्वेच्छेने स्वीकारली आहे. या सोसायटीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सोसायटीने तिचा ऑडीट वर्ग 'अ' कधीही सोडला नाही आणि या सोसायटीत गेल्या शंभर वर्षात सर्व निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत. अशा या सोसायटीत मी आयुष्याची सत्तावीस वर्षे आनंदात व्यतीत केली. आजही मी या सोसायटीत रहात होतो हे सांगताना अभिमान वाटतो.

पान ४ वरून

चार नगरांतले माझे विश्व...

आकलनावर भर देण्यासाठी शाळेचे माध्यम मातृभाषेचे असावे आणि इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून शिकवली जावी अशा वाक्यातून त्यांनी मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. एकंदरीत चार नगरांतले माझे विश्व हे हे जयंत नारळीकर यांचे आत्मकथन त्यांच्या वैयक्तीक आणि कौटुंबिक शैक्षणिक संदर्भाचा उलगडा करत एका शास्त्रज्ञाच्या व्यक्तिमत्व जडणघडणीची प्रक्रिया सांगणारे ठरते. त्याशिवाय भारत आणि परदेश यात असलेला वावर अनुलक्षून भारत आणि परकीय शिक्षण यातील तुलनात्मक विवेचनही ते करतात. जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ असूनही सर्वसामान्य माणसाला पाल्याच्या शिक्षणासाठी या अडचणी येतात ते सांगून प्रभावी शिक्षण प्रणाली कशी वापरता येईल. याबाबत सुद्धा जयंत नारळीकर भाष्य करताना दिसून येतात. माझ्या मते स्वतःच्या, स्वतःच्या सभोवतालच्या, स्वतःच्या कुटुंबातील अशा सर्व संबंधित असलेल्या व्यक्तींच्या शिक्षण विषयक घडामोडीचे इतके सूक्ष्म वर्णन जगाच्या पाठीवरील कोणत्याही कीर्तीवंत शास्त्रज्ञाने जयंत नारळीकर यांच्याप्रमाणे सखोल आणि सविस्तरपणे केले नसेल. म्हणूनच जयंत नारळीकर यांचे चार नगरांतले माझे विश्व हे आत्मकथन एका शास्त्रज्ञाचे आत्मकथन न राहता एका शास्त्रज्ञाचा शिक्षण विषयक दृष्टिकोन दर्शवणारे ठरते. **(उत्तरार्ध)**

पान ५ वरून

द ग्रेट! प्रकाश घाटपांडे उर्फ 'पकोबा'

आमचे राजे पकोबा त्यांच्या घरी बिल्ली होऊन राहत असले तरी आम्हाला ते जीवं की प्राण होते. ते एक दिवसही आमच्या सोबत नसले तरी आम्ही सर्व कासावीस व्हायचो. आमच्या मित्र परिवारातील रमेश ओझे उर्फ रमश्या त्याला डिवचण्यासाठी एकदा मुद्दाम म्हणाला, साल्या पक्या आमच्या वहिणीचा एक शब्द खाली पडू देत नाही. तिच्या समोर नुसता बैलासारखा राबत असतो. बैलात आणि तुझ्यात किती अंतर आहे रे.. त्यावर तो म्हणाला, रमेशराव आपण आहात तीथेच उभे रहा. लगेच त्याने आपल्या हाताने अंतर मोजायला सुरुवात केली आणि म्हणाला, चार हात! आम्ही सर्वच हसायला लागलो. त्यानंतर तो म्हणाला. दुर्जनापासून चार हात दूर राहावे, पण बैलाच्या जवळ जायला काहीचं हरकत नाही. याचे कारण बैल आपला मित्र आहे. असं म्हणून त्याने रमश्याच्या पाठीवर थाप मारली.

आमचा परममित्र बबनराव बिबेवाडीकर उर्फ बबन्याच्या गावी आम्ही एकदा गेलो होतो. बबन्याच्या शेतातील विहिरीला काठोकाठ पाणी होते. त्यामुळे पोहण्याची ईच्छा सर्वांनाच झाली. बबन्या म्हणाला या विहिरीच्या पाण्याचं एक वैशिष्ट्य आहे. बुडी मारुन वर आल्यावर 'माकड' हा शब्द म्हणताच येतं नाही. आमचे पकोबा म्हणाले हे कस कायं शक्य आहे? त्यावर बबन्याचे उत्तर तयारच होते. हीच तर या पाण्याची जादू आहे. आमचे पकोबा कपडे काढून उडी मारायला तयार झाले. तो खोल पाण्यात गेल्यावर बबन्या म्हणाला, तुझा बाप कोण? ठरल्याप्रमाणं पकोबा पाण्याच्या बाहेर आल्यावर म्हणाला, माकड या प्रसंगाने उपस्थिताना हास्य मेजवानी दिल्याचा आनंद बबन्याच्या चेहर्यावर झळकला. बबन्या लगेच म्हणाला, तू माकड शब्द कसातरी म्हणू शकला पण 'डुक्कर' हा शब्द अजिबातच म्हणता येतं नाही. वाटल्यास खात्री करुन घे. त्यावर पक्याची आव्हान स्विकारण्याची तयारी होतीच. तो म्हणाला, 'माकड' शब्द म्हणता येतो म्हणजे 'डुक्कर' म्हणता आलाच पाहिजे. लगेच खात्री करुन घेण्यासाठी त्याने उडी मारली. तो पाण्यात गेल्यावर बबन्या पुन्हा ओरडला. तुझा बाप कोण? ठरल्याप्रमाणे पक्या बाहेर आल्यावर म्हणाला, डुक्कर परत हशा पिकला. या विनोदावर आम्ही खूप मनमुराद हसलो. पकोबाला म्हणाला, मी पाण्यात बुडी मारल्यावर तू काय म्हणाला, हे मला माहित आहे. बबन्या लगेच वरमाला आणि म्हणाला, मी कुठे काय म्हणालो? तो म्हणाला, बबनराव आचार्य अत्रेंचे 'कहेंचे पाणी' मी फार पूर्वीच वाचले आहे. सासवडला आलेल्या नव्या पाहुण्याची ते आणि त्यांचे मित्र कशी गंम्मत करत होते. ते मला माहित होते पण माझी फसवणूक केल्याचा आनंद तुम्हाला मिळावा आणि तुमचं भरपूर मनोरंजन व्हावं हाच माझा हेतू होता.

आम्हा सर्वांच्या मनात असलेली शंका मी त्या निमित्ताने बोललो, अरे पकोबा तू एवढा कलाकार, विद्वान आणि समंजस, मग तुझी घरात अशी अवस्था का? या माझ्या प्रश्नांनं त्याचं मन भरुन आलं. तो म्हणाला, आतापर्यंत मी माझं दुःख कधीच कोणाला सांगीतलं नाही. मला ते सांगायचही नव्हतं. भेटेलं त्याला फक्त आनंद देईलं. हे ब्रिद घेवूनच मी जगतं आलो. यापुढेही जगणार आहे. माझ्या दुःखात मला कोणालाच सहभागी करायचं नाही. त्यामुळे मी माझं कौटुंबिक दुःख तुमच्यापासून सुद्धा लपवून ठेवलं. मित्रहो, तुमच्या वहिनीला कॅन्सर आहे. तीच्या सेवेत मला जास्तीत जास्त राहावे लागते. तुम्ही माझ्याकडे आलात तेव्हा घरात एकही वस्तू ठिकाणावर नव्हती. मी घरी येण्यापूर्वी नळ येवून गेले आणि तुम्ही मला सरप्राइज व्हिजिट दिली. काय करणार? माझ्या सर्व ओढाताणीचं प्रदर्शन तुम्हाला पहावं लागलं. तुमच्यासाठी मी काहीच करु शकलो नाही. आईवडील सोडून गेले, मुलबाळ नाही. हे तुम्हाला माहिती आहे. ते आता होण्याची शक्यताही नाही. त्याला खूप गलबलून आलं. आम्ही त्याचं कोणतंच दुःख समजून न घेता. त्याची फक्त टिंगल उडवत राहीलो. आम्ही मनातून खूप खजिलं झालो होतो. मी त्याला एकच प्रश्न केला. अरे पकोबा तू तुझे दुःख आम्हाला कधीचं का सांगितले नाही. आम्हाला एवढं परकं का समजलं. त्यावर तो लगेच म्हणाला, जीथे जाईलं तीथे फक्त आनंद देईलं. हे ब्रिद घेवून मी जगतोय. दुःख उगाळतं बसल्यानं ते वाढतच जातं. आपल्या दुःखाच भांडवल करणारा माणूस सर्वत्र अप्रिय होतो. आपण सर्वांना हसवत ठेवलं तर थोडा वेळ तरी आपण आपलं दुःखही विसरतो. ते विसरण्याचा मंत्र सर्वांना देणं हे खरे मानवी कार्य.

एवढे बोलून त्याने लांब सुस्कारा घेतला. मी म्हणालो. द ग्रेट पकोबा. सर्वांच्याच डोळ्यात पाणी आले. आमच्या जीवलग मित्राला ओळखण्यासाठी आम्हाला एवढा वेळ लागावा? मनात अपराधीपणाची भावना घेवून आम्ही बिबेवाडी वरुन निघालो. तो प्रसंग आम्हाला खूप काही देऊन गेला हे मात्र निश्चित.

चिंता करतो (स्वत:च्या) विश्वाची !

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २३६

चिंता करितो विश्वाची हे समर्थांचे वचन प्रसिद्ध आहे. पण आपल्यासारखे जन मात्र स्वतःच्याच विश्वाची सतत काळजी करीत असतात. त्याने साध्य काही होत नाही कारण हे एक नकारार्थी संवेदन, जाणीव असते आणि ते आपल्याला आतून पोखरत असते. केव्हा त्याच्याशी ओळख होते, केव्हा ते सवयीचे होते कळतही नाही. पण ते आवडायला लागेपर्यंत त्याचे त्रास मात्र सुरु होतात.

एकीकडे मन चिंती ते वैरी ना चिंती असतं, तर दुसरीकडे चिंता सोडा, जीवन पूर्णतया उपभोगा असं स्व-मदत करणारे लेखनही असतं. वयाच्या टप्प्यांनुसार काळजीचे स्वरूप आणि तीव्रता बदलत जाते. लहानपणी- शाळेत परीक्षेत काय होईल, मोठेपणी मंदीच्या कालखंडात नोकरी जाईल कां टिकेल आणि वृद्धपणी आर्थिक/आरोग्याच्या चिंता झोप उडवत असतात. या दरम्यान अनेक रूपांमध्ये, अवतारांमध्ये चिंता डोकावत असतेच आणि वाळवीसारखे चांगल्या क्षणांचे भक्षण करीत असते.

आपल्या परिघापलीकडील गोष्टींचे आपण अट्टाहासाने नियमन करू पाहतो तेव्हा चिंता नकळत आपल्या आयुष्यात डोकावते. ताणतणावांना नैसर्गिक प्रतिसाद असतो चिंता/काळजीचा. पण तोही एका मर्यादेपलीकडे वाढला तर आपली दिनचर्या प्रभावित होते. या चक्रामध्ये भीती आणि भविष्याविषयी विनाकारण रवंथ करणे याचा समावेश होतो. अशी चिंतेची, काळजीची पूर्वकल्पना माणसाचा आनंद हिरावून घेते. चिंतेची समस्या सर्वांनाच भेडसावत असली तरी लहानगी मुले आणि वृद्धांना त्याचा पराकोटीचा त्रास होतो. बांडेलो आणि मिचएलीस यांचे २०१५ चे अनुमान असे आहे (जे अजूनही बऱ्यापैकी स्थिर आहे) की जगातील ३३. ७ टक्के लोकसंख्येला जन्मभरासाठी चिंताग्रस्तता वेढत असते. यात मानसिक विकारांचा समावेश असतो.

क्वचित काळजी करण्याची वृत्ती उपयुक्त असू शकते विशेषतः संभाव्य धोक्यांसाठी, दुर्घटनांसाठी पण प्रमाणाबाहेरील चिंताग्रस्तता मानवाची कार्यशक्ती कमी करते हे एक्र्स आणि डॉडसन यांनी सर्वप्रथम १९०८ साली सिद्ध केलं. नैराश्य/औदासीन्याने घेतलेली माणसे भूतकाळात वास्तव्य करीत असतात तर चिंताग्रस्त माणसे भविष्यातील घटनांनी (ज्या अजून घडायच्या आहेत किंवा कदाचित घडणारच नाहीत) बेचैन असतात. जर काळजी करण्याच्या प्रवृत्तीने वैद्यकीय चिकित्सेची वेळ आणली तर आयुष्य जगण्याच्या क्षमतेत ती हस्तक्षेप करते आणि त्याचा सामाजिक आणि पेशाशी संबंधित बिघाडांशी संबंध येतो. काळजी /चिंता अनेक परिघांना स्पर्शते-

चिंता हा असा एक शब्द आहे जो आपण तणावपूर्ण, धोक्याच्या किंवा कठीण परिस्थितीत असताना किंवा एखाद्या समस्येला तोंड देत असताना आपल्या मनात येणाऱ्या अप्रिय भावनांचे वर्णन करण्यासाठी वापरतो. ही स्वतः मानसिक आरोग्याची स्थिती नाही. जरी चिंता आपल्याला अस्वस्थ करू शकत असली, तरीही ती काही विशिष्ट परिस्थितींमध्ये आणि मर्यादित कालावधीसाठी उपयुक्त ठरू शकते:

मानसिकदृष्ट्या- कठीण परिस्थितीमध्ये चिंता आपल्याला सांगते की काहीतरी चुकीचे आहे आणि आपल्याला सतर्क ठेवते जेणेकरून आपण योग्य प्रतिक्रिया देऊ शकू आणि ती परिस्थिती हाताळू शकू.

शारीरिकदृष्ट्या- चिंतेमुळे येणाऱ्या शारीरिक संवेदना आपल्या शरीराला धोक्यापासून दूर पळण्यासाठी किंवा स्वतःचे संरक्षण करण्यासाठी तयार करू शकतात. याला ' लढा अथवा पळ काढा (फाईट ऑर फ्लाइट)' प्रतिसाद म्हणतात. चिंता असंख्य कारणांमुळे असू शकते, उदाहरणार्थ:

दैनंदिन घटना- कामाच्या ठिकाणी एखादे तणावपूर्ण ईमेल येणे किंवा एखाद्या अशक्य ग्राहकाला हाताळणे

जीवनातील ठळक घटना - घटस्फोट, एखादा शारीरिक आजार किंवा एखाद्या ओळखीच्या व्यक्तीच्या मृत्यूची बातमी.

कधी कधी काहीतरी चांगले घडत असताना देखील आपण चिंता अनुभवतो. उदाहरणार्थ, जर आपण संभाव्य भावी जोडीदाराला भेटायला जाणार असलो किंवा नोकरीसाठी मुलाखत देणार असलो. या काही वाईट गोष्टी नाहीत, परंतु त्या आपल्या शरीरात चिंतेचे शारीरिक आणि मानसिक परिणाम निर्माण करू शकतात.

चिंता ही समस्या बनू शकते जेव्हा:

ती तीव्र रूप धारण करते आणि म्हणून असह्य होते. चिंता वाटण्याचा कालावधी अधिक असतो. चिंता वाटण्यामागील कारण अज्ञात असते. दैनंदिन जीवनावर नकारात्मक परिणाम होत असतो. जेव्हा असे घडते तेव्हा चिंता तुम्हाला सतत अस्वस्थ करू शकते, तुम्हाला हव्या त्या गोष्टी करण्यापासून थांबवू शकते आणि जीवनाचा आनंद घेणे तुमच्यासाठी कठीण होऊ शकते.

तुमच्या मनात आणि शरीरात बऱ्याच वेगवेगळ्या गोष्टी जाणवू शकतात, जसे की:

मनाबाबतीत लक्षणे-

सतत काळजी. भावनांवर ताबा न राहणे,

विनाकारण हळवे होऊन अश्रू ढाळणे. थकल्यासारखे वाटणे किंवा निद्रेसंदर्भात समस्या. लक्ष केंद्रित न करता येणे. चिडचिड किंवा उदास वाटणे. तणाव जाणवणे. भारावून गेल्यासारखे वाटणे. काहीतरी भयंकर घडेल याची भीती वाटणे.

शरीराच्या बाबतीत लक्षणे-

जलद किंवा अनियमित हृदयाचे ठोके (धडधडणे). घाम येणे. तोंड कोरडे होणे. स्नायूंचा ताण आणि वेदना. डोके दुखणे. थरथरणे/ कापणे. हाताच्या/ पायाच्या बोटांमध्ये किंवा ओठांमध्ये सुन्नपणा जाणवणे किंवा मुंग्या येणे. जलद श्वासोच्छवास. गरगरल्यासारखं वाटणे किंवा चक्कर येणे. पोटाच्या समस्या जसे अपचन, मुरडा किंवा मळमळल्यासारखं वाटणे. वारंवार शौचालयात जाणे. आपल्यापैकी बहुतेकांना वेगवेगळ्या कारणांमुळे आपल्या जीवनात कधीतरी चिंता जाणवते. हा एक सामान्य प्रतिसाद असू शकतो आणि सामान्यतः जेव्हा परिस्थिती बदलते किंवा जेव्हा तुम्हाला चिंताग्रस्त बनवणाऱ्या परिस्थितीपासून तुम्ही दूर जाता तेव्हा तो कालांतराने कमी होतो. चिंतेचे विकार बघता बघता भावविश्व वेढून टाकतात.

त्याचे सर्वज्ञात प्रकार-

१) सर्वसामान्य
२)पॅनिक
३)आघाताच्यानंतरच्या ताणाचा विकार (पीटीएसडी)
४)विशेष प्रकारचे भयगंड
५)सामाजिक चिंता विकार
६)अत्याग्रही- छांदिष्ट विकार (ओसीडी)

चिंता वाटण्याचे झटके रुग्णाला भयावह वाटू शकतात कारण त्यामुळे शारीरिक, आकलनात्मक आणि भावनिक लक्षणे उदभवू शकतात हे हार्ट यांनी १९९९ साली सिद्ध केलेले आहे.

बव्हंशी त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागते कारण मनोमन आपण मरतोय अशी त्यांची तीव्र भावना होते. खिन्नमनस्कता असेल तर त्याच्याबरोबर आलेले चिंतेचे ढग अधिक घातक आणि जीवघेणे असतात.

चिंतोपचार :-

मानसिक अवस्थेची व्याधी किंवा काळजीचा विकार उपचारांनी बरा होऊ शकतो. नव्या आधुनिक जगण्याची एक देणगी म्हणजे असंख्य तणाव आणि त्यांना यशस्वीपणे हाताळणे ही जशी कला आहे तसेच ते एक शास्त्रही आहे. चिंता म्हणजे स्वतःला शांत ठेवण्यासाठी लागणाऱ्या सुखद संदेशांची गैरहजेरी. अशा शांततेची पुनर्बांधणी करणे अनेक मानसिक उपचारपद्धतींनी साध्य केलेले आहे.

एपिक्टेटस म्हणतात- माणसांना खऱ्या समस्या भेडसावत नाहीत तर त्या समस्यांशी संबंधित काल्पनिक चिंतांमुळे ते नक्कीच भेदरतात.

तीव्र चिंतेचे कारण बहुधा काळजी असते, आणि त्याखाली दडलेली समस्या नसते. उदा- भाषण सुरु करण्यापूर्वी प्रेक्षकांसमोर जाऊन उभे राहणे हीच एखाद्या वक्त्यासाठी भयावह परिस्थिती बनू शकते. मग हात चोळणे, घाम पुसणे, देहबोलीत आत्मविश्वासाचा अभाव अशी दृश्य लक्षणे संभवतात. म्हणजे ही बोलण्याची भीती नसून त्याच्याशी संलग्न ताणतणावामुळे उत्पन्न होणाऱ्या काळजीची असते. तिच्याशी दोन हात केल्यावरच सुटका झाल्याची भावना जागृत होते. उपचार बरेचदा रुग्णकेंद्रित असतात, तरीही काही उपचारपद्धती सर्वसामान्यपणे प्रभावी ठरताना दिसतात.

१) **संज्ञानात्मक उपचार-** विचारांचे सदोष साचे बदलण्यावर येथे भर दिला जातो.

२) **आकलन-वर्तन उपचार-** एक प्रकारचा मानसोपचार ज्यामध्ये स्वतःबद्दल आणि जगाबद्दल विचार करण्याच्या नकारात्मक पद्धतींना, वर्तनाचे अवांछित स्वरूप बदलण्याचे किंवा नैराश्यासारख्या मूड विकारांवर केले जातात.

३) **लक्ष विचलित करण्याचे उपचार-** सामाजिक चिंता असण्याचे एक कारण म्हणजे अंमली पदार्थांचे व्यसन असलेल्या व्यक्तीचे लक्ष व्यसनांवरून हटविणे. त्या व्यक्तीला/समूहाला संमोहित करून त्यांना बरे करण्यावर इथे भर दिला जातो.

तुलनेने ही उपचार- पद्धती नवीन असून त्यांवर अधिक संशोधन अभिप्रेत आहे.

४) **संमोहन/मोहनिद्रा-** हा प्रकार ध्यानाच्या जवळ जातो. ज्या व्यक्तीवर उपचार सुरु आहे तिला एकाग्र व्हायला लावायचे आणि परिघावरील सतर्कता घालवायची. मग दिलेल्या सूचनांना ती व्यक्ती सकारात्मक प्रतिसाद देते. चेतनेच्या/जाणिवेच्या विविध पातळ्यांवर उपचार केले जातात. मुख्य म्हणजे या प्रक्रियेवर उपचारकर्त्याचे संपूर्ण नियमन असते. दातांवरील, शस्त्रक्रियेच्या वेळी भूल देतात तसा हा प्रकार. उपचार घेणारी व्यक्ती पूर्ण शुद्धीवर, भानावर असते.

५) **सुप्त मनोयंत्रणांवर उपचार-** गतिशील मनोविज्ञान म्हणून ओळखले जाणारे मनोविज्ञान हे मानसशास्त्राचा एक दृष्टिकोन आहे ज्यामुळे मानसिक वागणूक, भावना आणि भावनांचा अंतर्भाव असलेल्या मनोवैज्ञानिक प्रेरणांचा अभ्यास संभवतो. चेतना आणि अचेतन प्रेरणा यांच्या दरम्यान असलेला संबंध बहुधा मनातील संघर्षावर अवलंबून असतो. या दडलेल्या भावना उलगडल्या की अनेक कोडी सुटतात. मात्र हे उपचार वेळखाऊ असतात. मात्र स्वास्थ्य संदर्भातील समस्यांवर हे उपचार प्रभावी असतात.

६) **वेगस मज्जातंतूंना उत्तेजन देणे-** वेगस नर्व्ह म्हणजे शरीरात मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या फायबरचे दोन गट्ठे असतात. ते मेंदूपासून सुरू होऊन मानेच्या दोन्ही बाजूंनी शरीराच्या खाली जातात आणि अंतर्गत अवयवांशी जोडतात. वेगस नर्व्ह अवयवांच्या कार्याची माहिती मेंदूपर्यंत आणि मेंदूपासून अवयवांपर्यंत माहिती घेऊन जातात. याच आधारावर पचन, हृदय गती, आ-वाज, मूड आणि रोगप्रतिकारक शक्ती नियंत्रित केली जाते. १८८० मध्ये वेगस नर्व्हवर संशोधन सुरू झालेले आहे. वेगस नर्व्हची क्रियाशीलता वाढवल्यास मधुमेह, नैराश्य, पोस्ट ट्रॉमॅटिक डिसऑर्डर, संधिवात यांसारख्या आजारांमध्ये त्याचा फायदा होतो. जलद श्वासोच्छ्वासाचे व्यायाम, शारीरिक हालचाली आणि स्वतःला संतुलित ठेवून या मज्जातंतूंना सक्रिय करता येते.

इतरही तंत्रांचा सखोल विचार, विशेषतः बालवयातील काळजी /चिंता पुढील लेखात करू या, मात्र एक सत्य ध्यानी ठेवावे लागते- काळजी हा कर्तव्याचा भाग होऊ शकत नाही. जर काळजीवर मात करायची असेल तर मनानुभूती आणि श्वसन नियंत्रण हे महत्वाचे घटक असतात, त्यांचा सराव करायला हवा.

उत्तम लेखिका, दिग्दर्शिका असलेली, चित्रपती डॉ. व्ही. शांताराम यांची कन्या, पद्मविभूषण संगीत मार्तंड पं. जसराज यांची पत्नी, सर्जनशील संगीतकार शारंगदेव आणि अष्टपैलू कलाकार दुर्गा जसराज यांची आई. अशी पदोपदी गर्व करता येऊ शकेल अशी पार्श्वभूमी लाभलेली ही माऊली मधुरा जसराज म्हणजेच मधुताई. त्यांच्या निधनाने अनेकांचे कृपा छत्रच हरपले आहे. त्याच्या कार्यावर ही शब्द सुमनांची श्रध्दांजली...

कृपा छत्र हरपले!

श्रद्धांजली
महेश दुर्वे

मधुरा जसराज म्हणजेच मधुताई गेल्याचं कळलं नी मी सुन्न झालो, एक दोन नव्हे तर, तब्बल एक तप मी या माऊलीच्या घरी, जसराज कुटुंबियांकडे राहायला होतो. कोणाचा कोण? ना नात्याचा ना गोत्याचा, पण कुटुंबाचा सदस्य असल्यासारखा झालो होतो. मी राहायला लागलो तेव्हा एस. एस. सीच्या प्रमाणपत्रावर मी सरकारी परीक्षा देऊन मंत्रालयात लागलो होतो. पण मी किमान पदवीधर झालंच पाहिजे, असा धोशा मधुताईंनी लावला होता. मी खर्चाची अडचण काढली. तीही त्यांनी सोडवली. माझा नाईलाज झाला. मी चर्चगेट, बी रोडला युनिव्हर्सिटी क्लब हाऊसला, कोरस्पॉन्डन्स कोर्सला ॲडमिशन घेतले. दर वर्षी पास झालो. चवथ्या वर्षी पदवीधर झालो, तेव्हा मधुताईंना काय आनंद झाला होता म्हणून सांगू...त्या घरात मी सोडलो तर सर्व संगीताचे शागीर्द होते. मी एकटाच साहित्याचा, म्हणजे मधुताईंचा लेखनिक होतो. साक्षात सरस्वती मधुताईंच्या नुसती जिभेवर नव्हे तर रोमारोमात भिनली होती.

किती तरी प्रोजेक्ट आम्ही लिहिले. मधुताईंची एक हिंदी कादंबरी होती. टंकलिखीताचं बाड तयार होतं. पण, बरंच जुनं झालं होतं. मी ते वाचायला घेतलं आणि त्यात इतका रमलो की, काही विचारु नका. इतकी सुंदर व ओघवती भाषा होती ती. मी मधुताईंना म्हटलं, ताई ही छापत का नाही. त्या म्हणाल्या, छापू या. आता तुझ्या अक्षरांत नव्याने लिहून काढशील का. मी नाही म्हणणं शक्यच नव्हतं. त्या कादंबरीचं नाव होतं, रज्जो! नंतर या हिंदी कादंबरीचं मराठी भाषांतर झालं. अर्थात मधुताईंनीच केलं होतं. ती मराठी 'रज्जो' कोल्हापुरच्या मेहता प्रकाशनाने छापली होती. प्रसिद्धीपासून दूर राहण्याच्या त्यांच्या सवयीमुळे ही कादंबरी छापण्यास खूपच विलंब झाला होता. छापा, छापा असा सततचा लकडा मी लावल्यामुळे त्या तयार झाल्या आणि ती छापली गेली. कादंबरीच्या मनोगतात, माझा सहकारी महेश दुर्वे याने लावलेल्या सततच्या लकड्यामुळे ही छपाई झाली असं स्पष्ट त्यांनी म्हटलं आहे.

मधुताई या काळाच्या किमान तीसेक वर्षं पुढे होत्या. कल्पनातीत प्रकल्पांची कल्पना करायची आणि ती कागदोपत्री पुर्णत्वास न्यायची हा त्यांचा आवडीचा छंद. अशाच छंदातून निर्माण झालेला प्रकल्प म्हणजे आलोकगंगा. आलोकगंगा प्रोजेक्टवरती त्यांनी घेतलेल्या मेहनतीचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे, मेहनतीला लाजायचं



नाही, हा धडा मी त्यांना पाहूनच शिकलो. आलोकगंगा प्रकल्प खूप नावाजला गेला पण प्रत्यक्षात उतरला नाही याची सल त्यांच्या मनात कायम होती. साधारण १९८२-८३ च्या सुमारास भारत सरकारच्या सांस्कृतिक उपक्रमांतर्गत त्या चेकोस्लाव्हाकियाला गेल्या होत्या. लँटर्नामँजिका हा रंगभूमी आणि चित्रपट कला यांचा मेळ साधणारा असा अफलातून करमणुकीचा प्रकार तिथून त्या शिकून आल्या होत्या. हा प्रकार नक्की काय आहे हे समजावून सांगणारा लेख त्यांनी लिहिला होता. याचं हस्तलिखित मीच केलं होतं. गंमतीने त्या म्हणाल्या होत्या, माझं इतकं शांतपणे ऐकून घेणारा भारतात तू एकमेव माणूस आहेस. हा कला प्रकार ज्या काळात त्या शिकून आल्या होत्या, आपल्याकडे त्या काळाच्या पचनी पडणं खूप अवघड होतं. म्हणून म्हणतो, त्या काळाच्या खूप पुढे होत्या.

कान कहानी सुन्यो करे आणि सुर लय और छंद ह्या दोन संगितिका त्यांनी निर्माण व दिग्दर्शित केल्या होत्या. त्यांचं सांगितिक व सांस्कृतिक मुल्य हे शब्दातीत होतं. चित्रपतींचीच मुलगी असल्यामुळे उपजतच मिळालेल्या चित्रपट कौशल्यामुळे त्यांची रंगमंचावरील पात्रेदेखील तरल वाटायची. मी त्यांना एकदा म्हणालो होतो, ताई तुमचे हे प्रयोग कसे आहेत हे सांगणे मला शक्य नाही, पण प्रेक्षक तन्मयतेने पाहत असतात म्हणजे चांगले असावेत हे नक्की. त्यांनी यावर मंद स्मित केल होतं. या नाटकांचे प्रयोग जर रिव्हाईव्ह झाले तर मधुताई कदाचित अनंतातून पुन्हा परततील, इतकी प्रिय त्यांना त्यांची निर्मिती होती. फास्टर फेणे ही दूरदर्शन मालिका म्हणजे मधुताईंच्या मेहनतीचा, कलागुणांचा व बुद्धीमत्तेचा कस होता. बरेच दिवसांनी एकदा त्यांचा फोन आला. मला म्हणाल्या, महेशा तुझं डोकं अजून चालतं का रे, की बथ्थड झालास सरकारी नोकरीत राहून. मी म्हटलं, नाही ताई. तुम्हाला पाहून, ऐकून, जगाच्या बाजारात कसं वागावं हे शिकलो असल्याने इथेही माझ्या कामाचं कौतुक होतं. सांगा नं काय हवंय...अरे, मी सातार्याला निघालेय. एका संस्थेच्या कार्यक्रमाची अध्यक्ष आहे मी. मला स्नेह या विषयावर बोलायचंय. काय बोलू.. सांग.. काही तरी खरडून दे...माझं डोकं चालत नाही. मी म्हटलं, ठिक आहे. मला थोडा वेळ द्या. पोचायला मला किमान चारेक तास लागतील. बघ, काय जमतंय ते! माझ्यावरचा मधुताईंचा हा विश्वासच मला विश्वरुपी विश्वविद्यालयाने दिलेलं प्रमाणपत्र होतं. मी पुढच्या दहा मिनिटातच खालील ओळी लिहिल्या व ताईंना पाठवल्या...

स्नेह या जगाशी, स्नेह ईश्वराशी!
स्नेह माणसाचा, दूजा माणसाशी!
स्नेहात माणसांच्या, चिंब नाहतो मी!
स्नेहच नजरेतून, ओथंबून पाहतो मी!
स्नेहामुळेच माझे, दुःख सारले मी!
स्नेहामुळेच माझे, सौख्य तारले मी !
स्नेहासाठीच माझा, देह हा झिजावा!
स्नेहासवेच माझा, वंशही फुलावा!

...आणि त्यांना म्हटलं, क्रियापदं स्त्रीसुलभ करुन घ्या... तिथला कार्यक्रम संपल्यावर त्यांचा फोन आला, म्हणाल्या, अरे मी भाषणाच्या शेवटी, याविषयावरची माझ्या सहकार्याची एक कविता ऐकवते आणि थांबते, असं म्हटलं आणि तुझीच कविता वाचली. खूप टाळ्या मिळाल्या. हे ऐकून मी आनंदलो. छोट्याछोट्या गोष्टींसाठी दुसर्याचं श्रेय हिसकावून घेणार्या जगात, ज्याचं श्रेय त्यालाच देण्याची ही वृत्ती किती विरळी आहे नं! माझा साखरपुडा, माझं लग्न, माझ्या मुलीचं बारसं, तिचे सुरुवातीचे वाढदिवस, माझ्या घरचे धार्मिक कार्य या सर्व प्रसंगी मधुताई आवर्जून हजर असायच्या. एवढंच नाही तर, माझ्या भावाने त्याच्या लग्नानंतर ठेवलेल्या पूजेलाही त्या आल्या होत्या. समृध्द पार्श्वभूमी लाभलेली ही माऊली इतकी मनमिळावू, सहिष्णू आणि निगर्वी कशी होती, हे तिलाच ठाऊक. नियतीने माझ्या जीवनाचा आखलेला समृद्धी महामार्ग म्हणजे मधुरा पंडीत जसराज.. माझ्या मधुताई..यांत प्रत्यवाय नाही. मधुताई, तुमचे विस्मरण माझ्या हयातीत मला होणार नाही. मधुताई, निःसंशय तुमच्या आत्म्यास सद्गती मिळेल. जिथे असाल तिथे तुम्हाला शांती लाभो, ही प्रभूचरणी प्रार्थना!

पंडित दिनदयालजींच्या आठवणी



स्मरण
अंबरीश पुंडलिक

भारतीय जनता पार्टी (आधीचे भारतीय जनसंघ) सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय हे एक हिंदुत्ववादी विचारवंत आणि भारतीय राजकारणी होते. त्यांनी राजकारणाशिवाय भारतीय साहित्यात योगदान दिले. पन्नासच्या दशकात सुरू झालेल्या आरएसएसच्या राजकीय संघटनेचे जनसंघाचे ते नेते होते. भाजप ज्या एकात्म मानवतावादाचे समर्थन करते, तो पंडित दीनदयाल यांचाच विचार आहे. देशभर दीनदयाळ उपाध्याय यांना मानणारे नागरिक आहेत. अनेक घटनांनी पंडित दिनदयालजींचे आयुष्य घडलेले आहे. त्यांच्या जीवनातील काही प्रसंग...

सासाराममधली एक दुपार! रणरणते ऊन!

* भारतीय जनसंघाच्या अध्यक्षांची सर्व जमलेले कार्यकर्ते वाट पाहत आहेत. त्यांची शोभायात्रा आहे आज. एकदाचे दीनदयालजी आले. आल्या आल्या शोभायात्रा सुरू झाली. कुठेही पाणी पिण्याची व्यवस्था नाही, उन्हापासून संरक्षण नाही 'भारतीय जनसंघ जिंदाबाद', 'दीनदयाल उपाध्याय जिंदाबाद' च्या गजरात तीन-साडेतीन तास त्या रणरणत्या उन्हात कार्यकर्ते दीनदयालजींना चालवत होते. शोभायात्रा संपल्यावर दीनदयालजींनी विचारलं, अरे भाई सासाराम की कोई गली छुटी तो नहीं?

रेल्वेचा प्रवास!

दीनदयालजींच्या डब्यात एक बूटपॉलिश वाला मुलगा येतो. समोर बसलेले 'साहेब' पोर्याला बूट पॉलिश करायला सांगतात. पोर्या खाली बसून शांतपणे पॉलिशचे साहित्य बाहेर काढतो. काम सुरू होणार इतक्यात साहेब विचारतात, ये लडके, तेरे पास कपडा नही है क्या, जूता चमकाने के लिये? नहीं साब, लेकीन मै ब्रशसे अच्छे से चमका दूंगा, नहीं नहीं! पॉलिश नहीं करानी है. जाओ! समोर बसलेले दीनदयालजी आपल्या गळ्यातले उपरणे काढून त्याचा एक तुकडा फाडतात. त्या मुलाच्या हातात देऊन म्हणतात, अरे, बाबू! कपडा नहीं लाया? ग्राहक छुट जाता ना?

'राष्ट्रधर्म' चे कार्यालय!

अंक लिहून तयार आहे पण अजून मशीनमन आलेला नाही. तो येईल, खिळे जुळवेल, कंपोझिंग करेल. मग ट्रेडल मशीन चालवून अंकाची छपाई होईल. बराच उशीर झाल्यावर शेवटी दीनदयालजी उठून उभे राहिले. यंत्राची जुळवाजुळव केली आणि स्वतःच पायांनी ट्रेडल मशीन चालवू लागले. पहाटे केव्हातरी काम संपले. सकाळी उठून सायकलवर गठ्ठे मारून वितरकांकडे पोहोचवायला धोतराला काचा मारून निघाले.

जनसंघ का काम थोडी है?

जनसंघाचा कार्यकर्ता रस्त्याने जात आहे. त्याला समोरून येणारे दीनदयालजी दिसतात. हातात केळीची पानं, भाजीच्या, किराण्याच्या पिशव्या वगैरे. दीनदयालजी आप कब आये? और ये सब क्या है? कल ही आया. घर मे श्राद्ध है इसलीये बाजार से जरुरी समान ले जा रहा हूं! तो हमे बोल देते. पहुचा देते, जो सामान चाहीये था, आपने तकलीफ क्यूं की? लाइये मेरे पास ये थैला! अरे नहीं बाबा. ये कोई जनसंघ का काम थोडी है? ये तो मुझेही करना पडेगा असं म्हणून पिशव्या सांभाळत दीनदयालजी निघाले.

दिल्लीतील जनसंघाचे कार्यालय

तिकीट न मिळाल्याने चिडलेला कार्यकर्ता तणतणत कार्यालयात पोहोचला. त्याने समोरच्या मळक्या कपड्यातल्या माणसाला विचारले, वो दीनदयाल उपाध्यायजी कब मिलेंगे? उत्तर आले, मिलेंगे. आप बैठीये, असं म्हणून त्या माणसाने बराच वेळ लिखापढीची, साफसफाईची कामे केली. तोपर्यंत जेवणाची वेळ झाली. आप बाहरसे आये है; भोजनकी क्या व्यवस्था है? जी कुछ तय नहीं है! तो हमारे साथ भोजन करिये! जेवण झाल्यावर तो मळक्या कपड्यातला माणूस म्हणतो, तो अब बताईए कैसे आना हुआ? मै ही दीनदयाल उपाध्याय! आणि तो कार्यकर्ता तक्रारीचा एक शब्दही न बोलता परत जातो.

आयटी कंपन्यांमध्ये एवढा ताण कशाचा?

नोंद
प्रसाद देशपांडे

बड्या तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील नोकरीभोवतीचे वलय गेल्या काही वर्षांमध्ये काहीसे फिकट झाले आहे. कामाचा अतिताण आणि त्यामुळे होणाऱ्या मानसिक-शारीरिक त्रासाच्या घटनांमुळे खळबळ माजली आहे. अलिकडेच एका मोठ्या कंपनीत काम करणाऱ्या ॲना सेबेस्टियन या मुलीचा अतिकामाच्या ताणाने मृत्यू झाला. कर्मचाऱ्यांना हृदयविकाराचा झटका यावा, इतका ताण या कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांवर का असतो?

कोणताही कर्मचारी नोकरी करतो ते कारकीर्द घडवण्यासाठी आणि पैसा कमावण्यासाठी. काम केल्याबद्दल मिळणारा पगार त्याला काम करण्यासाठी प्रोत्साहित करतो. अधिक काम करण्याबद्दल अधिक पैसे मिळणार असतील तर तो आनंदाने तयार होतो. मग ती आयटी कंपनी असो, मॅन्युफॅक्चरिंग किंवा सरकारी कंपनी असो अथवा सेवा देणारी कंपनी असो. काम करण्यासाठी आलेली व्यक्ती स्वत:हून कंपनीत अर्ज करते, मुलाखत देते, सर्व अटी मान्य करते आणि स्वेच्छेने काम स्वीकारते.

एक कर्मचारी म्हणून तुम्ही कंपनीला उत्कृष्ट संख्यात्मक आणि गुणात्मक आऊटपूट दिले पाहिजे, ही वरिष्ठांची अपेक्षा असते. पण, आपल्या हाताखालच्या कर्मचाऱ्यावर, त्याच्या प्रकृतीवर वाईट परिणाम व्हावा इतका कामाचा ताण असेल तर ते नक्कीच गैर आहे. इतर सर्व कंपन्यांप्रमाणेच आयटी कंपन्यांमध्येही दोन प्रकारच्या जबाबदाऱ्या असतात. एचआर, फायनान्स किंवा सपोर्ट डिपार्टमेंटमध्ये काम करणारे लोक आणि मार्केटिंगसाठी किंवा ग्राहकांसाठी प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी. अर्थातच बाहेर सेवा पुरवणाऱ्यांना कंपनीकडून टारगेट्स दिली जातात. ती पूर्ण करण्यासाठी वेळेची मर्यादाही दिली जाते. अशा विभागांमध्ये नक्कीच कामाचा ताण असू शकतो. कधी कधी आयटी कंपन्यांमध्ये एखाद्या प्रोजेक्टवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा पगार ग्राहक कंपनीकडून दिला जातो. अशा वेळी ती ग्राहक कंपनी वेळेची मर्यादा घालून ताण वाढवू शकते. मोठ्या कंपनीत काम भरपूर असते आणि कालमर्यादेमुळे ताणही असतो, पण तरीही वर्षभर रात्रंदिवस सातत्याने काम करावे लागेल, अशी स्थिती कोणत्याही कंपनीत कधीही नसते. क्वचित एखादा अर्जंट प्रोजेक्ट असू शकतो. पण ३६५ दिवस असे काम नक्कीच नसते आणि तसे असेल तर कंपनीच्या प्लॅनिंग शेड्यूलमध्ये नक्कीच काहीतरी गोंधळ असतो. कारण अनेक कंपन्या सेवा पुरवताना पुढे आणखी कुणाला तरी सेवा देत असतात. उदाहरणार्थ, बँकिंग, इन्शुरन्स, सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी संस्था. त्यात हॉस्पिटल्स असतात, हेल्थ केअर सेवा संस्था असतात, एनजीओ असतात किंवा आणखी कुणीही असू शकते. मात्र, त्या क्लायंट कंपन्यांना घाई असेल तर त्याचा ताण संबंधित कंपनीवर येतो, पण तरीही सतत अशी स्थिती नक्कीच नसते.

कर्मचाऱ्यांवर ताण येण्याची कारणे ही काही प्रमाणात कंपनीच्या कामाच्या स्वरूपावर आणि कामाच्या पद्धतीवर अवलंबून असतात. त्यासाठी आजकाल 'वर्क कल्चर' असा शब्द वापरला जातो. प्रत्येक कंपनीची कार्यपद्धती, व्यवस्थापन प्रणाली आणि त्या विभागाच्या व्यवस्थापकांचा कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यासंदर्भात मोठी भूमिका बजावतो.

सर्वसामान्यत: व्यवस्थापन तीन पातळ्यांवर काम करते. उच्च, मध्यम आणि निम्न पातळी. कामाचा ताण सर्वांनाच असतो; किंबहुना मॅनेजमेंटमध्ये पद जितके उच्च, तितका ताण अधिक. कामाचा ताण वरच्या लोकांकडून हाताखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे आणि त्यांच्याकडून कर्मचाऱ्यांकडे ढकलला जातो.

अनेकदा कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी किंवा प्रमोशन मिळविण्यासाठी काही मॅनेजर्स आपल्या कर्मचाऱ्यांवर १० दिवसांचे काम ५ दिवसात पूर्ण करण्यासाठी सक्ती करतात. अशा वेळी प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर ताण येतो. त्यातच कामाच्या पूर्ततेसंबंधी सतत पाठपुरावा करणे, अपमानास्पद भाषेचा उपयोग करणे यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची होते आणि ताण वाढू लागतो. एखाद्या कर्मचाऱ्याचा कामाचा वेग कमी असतो. कधी तरी कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे कामाचे ओझे वाढते किंवा काही लोकांना लहानसहान गोष्टींचा ताण येतो. अशा प्रत्येक वेळी कर्मचाऱ्यांचा ताण वाढत राहतो. त्या ताणाचा त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे तो ताण वरच्या अधिकाऱ्यांकडे सरकत जातो आणि पुन्हा वाढून खाली येतो. या विषारी चक्राचा कंपनीवर, कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर, उत्पादकतेवर आणि पर्यायाने कंपनीच्या प्रतिमेवर होतो.

कधी कधी विशिष्ट प्रकारच्या कामासाठी एखाद्या कर्मचाऱ्याची कौशल्ये उपयोगी नसतात. परंतु तो हट्टाने ते काम स्वीकारतो आणि ते नीट जमत नाही. त्यामुळे त्याच्यावर आणि अधिकाऱ्यांवर ताण येतो. ताण वाढवणाऱ्या घटना घडतच नाहीत किंवा घडणारच नाहीत, असे आपण म्हणू शकत नाही. परंतु असे घडू नये यासाठी सगळ्या मोठ्या कंपन्या सजग असतात. सगळ्या मोठ्या आणि ब्रँड कंपन्यांमध्ये हजारोलाखो कर्मचारी विविध पातळ्यांवर काम करीत असतात. कंपन्यांनाही चांगल्या कर्मचाऱ्यांची गरज असतेच. त्यामुळे बहुतेक कंपन्यांमध्ये 'रिटेनिंग पॉलिसी' राबविली जाते. कर्मचाऱ्यांनी कंपनी सोडून जाऊ नये यासाठी प्रयत्न केले जातात.

किंबहुना, या मोठ्या कंपन्यांमध्ये कर्मचारीकेंद्रित धोरणेच राबविली जातात. विशेषत: स्त्री कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. बरेच वेळा कर्मचारी या बाबतीत जागरूक नसतात. त्यांना याची माहिती नसते आणि ते करूनही घेत नाहीत. बहुतेक सर्व बड्या किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये व्हिसल ब्लोअर फंक्शन अस्तित्वात आहे. कंपनी अत्यंत तत्परतेने या तक्रारीची शहानिशा करून निर्णय घेते. ठरावीक काळानंतर त्याचा रिव्ह्यू घेतला जातो. एकही तक्रार दुर्लक्षित राहणार नाही, याची काळजी घेतली जाते.

विशेष म्हणजे कंपनीने काढून टाकलेले किंवा कंपनी सोडून गेलेल्या तक्रारींचीदेखील रीतसर चौकशी केली जाते आणि अधिकारी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाईही केली जाते. अर्थात हे अहवाल सार्वजनिकरीत्या जाहीर करणे- न करणे ही कंपनीची पॉलिसी असते. पण सर्व कायदेशीर नियमांचे आयटी कंपन्या अत्यंत काटेकोरपणे पालन करतात. अगदीच वेळ आली तर पोलिसांनादेखील पूर्ण सहकार्य करतात. कारण तसे न केल्यास त्यांच्यावर सरकारी कारवाई होण्याचा आणि कंपनीच्या प्रतिमेला धक्का लागण्याचा धोका असतो.

बड्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना हिताचे रक्षण करणाऱ्या सर्व नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. आपले वरिष्ठ आणि त्या साखळीतले सर्वात वरिष्ठ अधिकारी कोण आहेत याविषयी कर्मचाऱ्याला माहीत असणे आवश्यक आहे. तरच त्याला योग्य व्यक्तीबद्दल योग्य त्या मार्गाने तक्रार करता येईल. विशेष म्हणजे गेली अनेक वर्षे बहुतेक सर्व बड्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या या व्हिसल ब्लोअर फंक्शनची माहिती प्रत्येक कर्मचाऱ्याला व्हावी, यासाठी एक ऑनलाईन कोर्स पूर्ण करावा लागतो. त्यात कर्मचाऱ्यांचे हक्क आणि अधिकार याविषयी माहिती दिली जाते. त्या विषयाची लेखी परीक्षा घेतली जाते आणि ८० पेक्षा अधिक गुण असतील तर प्रशस्तिपत्रक दिले जाते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अन्याय होत असेल तर त्याची तक्रार कर्मचाऱ्याने नि:संकोचपणे करणे अपेक्षित आहे. तसे न घडल्यास त्यामागच्या कारणांची बारकाईने चौकशी व्हायला हवी.

अर्थात करीअरच्या आणि स्पर्धेच्या जगात असे मॅनेजर्स असू शकतात, जे स्वत:च्या प्रगतीसाठी हाताखालच्या लोकांना दिलेल्या वेळेपेक्षाही लवकर कामे पूर्ण करण्यासाठी मागे लागतात. काही जण स्वत:च प्रचंड काम करतात. त्यामुळे कर्मचाऱ्याकडूनही त्यांच्या तशाच अपेक्षा असतात. परंतु आपल्यावर असहनीय ताण येत असेल तर तक्रार करायलाच हवी. सहन करण्याची काहीही गरज नाही. याव्यतिरिक्त अनेक आयटी कंपन्यांमध्ये एचआर विभाग यासाठी सतत काम करीत असतो. माझं प्रमोशन झालं नाही, माझा मॅनेजर वेडेवाकडे बोलतो इथपासून चहा-कॉफीचे मशीन बिघडले आहे इथपर्यंत तक्रारी केल्या जातात आणि त्यांचा गंभीरपणे विचार केला जातो. काही कंपन्यांमध्ये '३६० फीडबॅक' सिस्टिम वापरली जाते.

मॅनेजर्सविषयी तीन लेव्हलचे लोक फीड-बॅक देतात. त्याचा बॉस, त्याच्याच पातळीवर काम करणारा दुसऱ्या विभागाचा सहकारी आणि त्याच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी. त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्याचे वागणे, बोलणे, त्याची तत्त्वे याविषयी माहिती मिळविली जाते आणि ती त्याच्यापर्यंत पोहोचविली जाते. त्यामुळे संबंधित मॅनेजर स्वत:मध्ये सुधारणा करू शकतो.

शेवटी एक गोष्ट नक्की की ताण असणार, पण तो किती आणि कसा सहन करायचा हे त्या कर्मचाऱ्याने स्वत: ठरवायला हवे. तुमच्या मदतीसाठी अनेक जण आहेत. अनेक मार्ग आहेत, पण तुम्हाला मदतीची गरज आहे हे त्यांच्यापर्यंत पोहोचायला हवे आणि ते तुम्हीच सांगायला हवे. (लेखक पुण्यातील एका मोठ्या आयटी कंपनीमध्ये उच्चपदस्थ आहेत.)

पूर्वीच्या साध्या बल्ब आणि ट्यूबपासून सीएफएल आणि एलईडीकडे आपण प्रवास केला. वीज बचतीच्या एका बाजूचा विचार करताना दुसरी बाजू मात्र विचारात घेतली नाही. आज सर्वत्र झगमगत्या, कृत्रिम दिव्यांच्या प्रकाशात दृश्यमानता कमी होत असून आगामी दोन दशकांमध्ये आपण जीवनशैलीमध्ये बदल न केल्यास आकाशातील तारे दिसणार नाहीत, अशी भीती तज्ज्ञांना वाटते.

आकाशातील तारे गायब होणार?

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

रात्री गच्चीवर झोपताना आकाशाकडे पाहताना सगळीकडे फक्त तारेच दिसायचे. अनेकांना लहानपणी हा अनुभव आला असेल; परंतु आता तसे राहिले नाही. भारतातील कोणत्याही मोठ्या शहरात राहणाऱ्या लोकांसाठी रात्री तारे पाहणे जवळजवळ अशक्य आहे. विशेषत: दिल्ली एनसीआर, मुंबई, पुण्यात राहणाऱ्या लोकांसाठी आता तारे गायब होत आहेत. खेड्यापाड्यातही पूर्वीसारखे रात्रीचे तारे दिसत नाहीत. अशा स्थितीत प्रश्न पडतो की, हे तारे जातात कुठे? भविष्यात आपल्याला आकाशात एकही तारा दिसणार नाही का, असेही वाटून जाते. मात्र, आकाशातून तारे दूर जात आहेत असे वाटत असेल, तर ते चुकीचे आहे.

तारे शेकडो वर्षांपूर्वी होते, तिथेच आहेत. वास्तविक, हे सर्व प्रकाश प्रदूषणामुळे होत आहे. यामुळे रात्री आकाशात तारे दिसत नाहीत. प्रकाश प्रदूषण हा मानवाने निर्माण केलेला प्रकाश आहे. तो आकाशाला रात्री प्रकाशित करतो आणि ताऱ्यांचा प्रकाश लपवतो. खरे तर शहरीकरण आणि औद्योगिक विकासामुळे जगभरातील मोठ्या शहरांमध्ये प्रकाश प्रदूषण झपाट्याने वाढले आहे. याच कारणामुळे आज मोठ्या शहरांमध्ये तारे दिसत नाहीत. एका अहवालानुसार, जगातील सुमारे ८० टक्के लोकसंख्या अशा ठिकाणी राहते, जिथे आकाशातील तारे स्पष्टपणे दिसणे कठीण झाले आहे. शास्त्रज्ञांना वाटते की, प्रकाश प्रदूषण असेच वाढत राहिले तर भविष्यात आपण पृथ्वीवरून उघड्या डोळ्यांनी तारे पाहू शकणार नाही. प्रकाश प्रदूषणामुळे केवळ तारेच कमी दिसत नाहीत, तर अवकाश संशोधन आणि खगोलशास्त्रीय अभ्यासावरही परिणाम होत आहे. शास्त्रज्ञांच्या मते प्रकाश प्रदूषण अशाच प्रकारे वाढत राहिल्यास भविष्यात उल्का वर्षाव, ग्रहांची दृश्यमानता आणि आकाशगंगेची स्पष्ट दृश्यमानता यासारख्या अनेक खगोलीय घटना जवळजवळ नाहीशा होतील. 'नासा'च्या माहितीनुसार, अलिकडच्या काही वर्षांमध्ये शहरी भागातून निघणारा कृत्रिम प्रकाश झपाट्याने वाढला आहे.

रस्त्यावरील दिवे आणि इमारतींमधून येणारा हा प्रकाश 'स्कायग्लो' नावाचा प्रभाव निर्माण करतो. यामुळे रात्रीचे आकाश इतके तेजस्वी होते की, नैसर्गिकरीत्या चमकणारे तारे आणि इतर आकाशीय पिंड आपल्याला दिसत नाहीत. प्रकाश प्रदूषणाने रात्रीचे आकाश उजळल्यामुळे तारे २० वर्षांच्या आत अदृश्य होऊ शकतात. शास्त्रज्ञांच्या मते, प्रकाश प्रदूषणानंतर आकाशाचा रंग काळा नसून हलका राखाडी दिसतो. येत्या २० वर्षांमध्ये लोकांना तारे दिसणार नाहीत, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. ब्रिटनमधील खगोलशास्त्रज्ञ मार्टिन रीस यांनी सांगितले की, प्रकाश प्रदूषणामुळे आकाशाचा रंग अस्पष्ट होत आहे. सोप्या शब्दात आकाशाचा रंग आता काळ्याऐवजी हलका राखाडी दिसतो. त्यामुळे फक्त काही तारे दिसतात. कृत्रिम प्रकाश, मोबाईललॅपटॉपसारखी गॅझेट, शोरूमच्या बाहेर लावलेले एलईडी, कारचे हेडलाईट्स किंवा होर्डिंग्जच्या आकर्षक प्रकाशामुळे प्रकाश प्रदूषण होते. खगोलशास्त्रज्ञांच्या मते गेल्या काही वर्षांमध्ये प्रकाश प्रदूषणात वाढ झाली आहे. रात्रीच्या आकाशाची चमक दर वर्षी १० टक्क्यांनी वाढत आहे.

प्रकाश प्रदूषणामुळे जगातील एक तृतीयांश लोकसंख्या आकाशगंगा पाहू शकत नाही. हे सोप्या शब्दात समजावून सांगताना 'जर्मन सेंटर फॉर जिओसायन्स'चे क्रिस्टोफर किबा म्हणाले, ''२५० तारे दिसणाऱ्या भागात जन्मलेल्या मुलाला १८ वर्षांनंतर फक्त १०० तारे दिसतील. याचा अर्थ असा की, मूल १८ वर्षांचे होईपर्यंत आकाशात फक्त १०० तारे दिसतील. प्रकाश प्रदूषणामुळे कीटकांचा अकाली मृत्यू होत आहे.'' शांघायच्या 'रुइजिन हॉस्पिटल'चे डॉ. युजू म्हणतात, अमेरिका आणि युरोपमधील ९९ टक्के लोक प्रकाश-प्रदूषित आकाशाखाली राहतात. पृथ्वीचे दिवस-रात्र घड्याळ २४ तासांचे असते. हे सूर्यप्रकाश आणि अंधाराने निश्चित केले जाते. हे या ग्रहावरील प्रत्येक सजीवाला लागू होते; परंतु मानवाने त्याच्याशी छेडछाड केली आहे. प्रकाश प्रदूषणामुळे कीटक, पक्षी आणि अनेक प्राण्यांचे जीवनचक्र बदलले आहे. त्यामुळे त्यांचा अकाली मृत्यू होत असून जगभरातील जैवविविधतेचेही मोठे नुकसान होत आहे. चीनमधील एक लाख लोकांवर केलेल्या एका संशोधनात दिसून आले आहे की, पथदिवे आणि स्मार्टफोनसारख्यांचे प्रकाश मधुमेहाचा धोका २५ टक्के वाढवू शकतात. किंबहुना रात्रीच्या वेळीही दिवसाची अनुभूती देणारे हे दिवे माणसाचे शरीर घड्याळ अर्थात बॉडीक्लॉक बदलू लागले आहेत. यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्याची शरीराची क्षमता कमी होत आहे. प्रकाशामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढते. सतत कृत्रिम दिव्यांच्या संपर्कात असणाऱ्यांच्या शरीरातील ग्लुकोजची पातळी काही न खाताही वाढू लागते. यामुळे आपल्या शरीरातील बीटा पेशींची क्रिया कमी होते. या पेशीच्या सक्रियतेमुळे स्वादुपिंडातून इन्सुलिन हार्मोन बाहेर पडते. कृत्रिम प्रकाशाचा जास्तीत जास्त संपर्क ही जगभरातील आधुनिक समाजाची समस्या आहे आणि ते मधुमेहाचे आणखी एक प्रमुख कारण बनले आहे. मोठमोठ्या शहरात राहणाऱ्या लोकांना उघड्या डोळ्यांनी तारे पाहणे आता दुर्मिळ झाले आहे. गेल्या दशकात उघड्या डोळ्यांनी आकाशात दिसणाऱ्या ताऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. नवीन संशोधनातून दिसून आले आहे की, जगभरातील वाढत्या प्रकाश प्रदूषणामुळे हे घडत आहे. प्रकाश प्रदूषण ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्या अंतर्गत कृत्रिम प्रकाशामुळे आकाश खूप तेजस्वी होते आणि त्यामुळे तारेही दिसत नाहीत. एका अहवालानुसार, हौशी खगोलशास्त्रज्ञ आणि नागरिक शास्त्रज्ञांच्या गटाने या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी गेली १२ वर्षे आकाशाचा अभ्यास केला आहे. संशोधकांच्या मते मानव आकाशात एवढा प्रकाश टाकतात की, एलईडी दिव्यांमुळे प्रकाश प्रदूषणाचा धोका वाढत आहे.

'युरोपियन स्पेस एजन्सी'ने गेल्या वर्षी केलेल्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, एलईडी लायटिंगमुळे जगभरात प्रकाश प्रदूषणाची समस्या वाढली आहे. वीज जितकी स्वस्त आणि चांगली, तितकी ती वाया जाते. सजावटीचे दिवे, जाहिरातींचे फलक, पथदिवे, उंच इमारतींवरील दिवे यामुळे आपले आभाळ उजळले असून प्रकाश प्रदूषणाची समस्या बिकट झाली आहे. प्रकाश प्रदूषणामुळे केवळ चंद्र आणि ताऱ्यांची दृश्यमानता कमी होत नाही, तर त्याचा झोपेच्या चक्रावरही गंभीर परिणाम होतो. जास्त प्रकाश हे केवळ मानवांमध्येच नव्हे, तर प्राण्यांच्या झोपेच्या पद्धती आणि खराब आरोग्याचेही कारण आहे. एका अभ्यासात असेही समोर आले आहे की, जास्त प्रकाशामुळे स्थानिक कीटकांची संख्यादेखील कमी झाली आहे. त्याचा परिसंस्थेवर खोल परिणाम होत आहे. प्रकाश प्रदूषणामुळे ऊर्जा वाया जात आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार आकाशात पसरलेली चमक पाहिल्यास आपण दररोज किती ऊर्जा वाया घालवत आहोत हे स्पष्टपणे दिसून येते; मात्र सर्वसामान्य आणि सरकारचे याकडे अजिबात लक्ष जात नाही. अजूनही सुधारणेला खूप वाव आहे. प्रकाशाचा काळजीपूर्वक वापर केल्यास प्रदूषण न करता जमिनीवर प्रकाश पडू शकतो. गेल्या दशकात वाढत्या कृत्रिम प्रकाशामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांवर बरेच अभ्यास केले जात आहेत. यासाठी जगभर नियम बनवले जात आहेत. वातावरणातील प्रकाशाच्या प्रमाणावर चर्चा केली जात आहे; जेणेकरून आपण आकाश पाहू शकू; परंतु कृत्रिम प्रकाश ज्या वेगाने वाढत आहे. ते प्रदूषण आहे, विकास नाही. २०१७ मध्ये केलेल्या अभ्यासानुसार, मानवाने तयार केलेल्या प्रकाशाची चमक दर वर्षी दोन टक्क्यांनी वाढत आहे. ती कमी केली, तरच आपल्याला आकाशातील तारे नीट दिसू शकतील.(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)